१९३७-२०२६ वर्ष ९०

कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

साई इन रिसॉर्ट चोंढी
अलिबाग येथे रुमबॉय व गार्डनसाठी व्यक्ती पुरुष/स्त्री पाहिजेत.
(अपंग व्यक्ती चालेल)
अर्जासह भेटा.

रायगड सोमवार । दि. २ नोव्हेंबर २०२६ । अंक १४७ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

दुचाकी अपघातात तरुणीचा मृत्यू

माणगाव : ताम्हिणी घाटात रविवारी (दि.१) सकाळी १० वाजताच्या सुमारास दुचाकीचा अपघात झाला. या अपघातात पूजा गोरे (२७) या तरुणीचा मृत्यू झाला. तसेच, दुचाकीवर सोबत असलेले मंजीत शर्मा (३२) हे जखमी झाले आहेत. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पूजा गोरे आणि मंजीत शर्मा हे पुण्याहून दुचाकीने माणगावच्या दिशेने प्रवास करत होते. ताम्हिणी घाटात सकाळी त्यांच्या दुचाकीचा अपघात झाला. या दुर्घटनेत पूजा गोरे यांना गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा मृत्यू झाला, तर मंजीत शर्मा जखमी झाले. या अपघाताचा पुढील तपास माणगाव पोलीस करीत आहेत.

वेधक

नागपुरातील ८ सराफांना धमकीचे पत्र

नागपूर : एकीकडे बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफ याच्यावर हल्ल्याच्या प्रकरणानंतर चर्चेत असलेल्या गँगस्टर लॉरेन्स बिश्नोई याची गँगचा नवा प्रताप समोर आला आहे. नागपूरातील आठ सराफांनी त्यांना लॉरेन्स बिश्नोईच्या नावाने खंडणीसाठी पत्र आल्याची तक्रार ऑल इंडिया ज्वेलरी असोशिएशनने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. या खंडणी पत्रात सोने व्यापाऱ्यांकडून प्रत्येकी १० लाख रुपयांची खंडणी मागण्यात आली आहे. खंडणी न दिल्यास जीवे मारण्याची, गोळी घालण्याची आणि कापून टाकण्याची भाषा या पत्रात करण्यात आली आहे. टायगर श्रॉफ याच्यावर ज्याप्रमाणे हल्ला करण्यात आल्या, त्याप्रमाणे तुमच्यावर हल्ला करू अशी धमकी या पत्रात करण्यात आली आहे. हे पत्र पोस्टाने आले असून त्याची सत्यता आता पटवण्याचे काम सुरु आहे.

मणिपूरमध्ये दोन गटांत भीषण गोळीबार

इम्फाल : मणिपूरमध्ये पुन्हा एकदा हिंसाचाराच्या घटना समोर आल्या आहेत. नोनी जिल्ह्यात दोन गटांमध्ये झालेल्या भीषण गोळीबारात तीन जणांचा मृत्यू झाला आहे. तर दुसरीकडे, काही दिवसांपासून बेपत्ता असलेल्या दोन तरुणांचे मृतदेहही सुरक्षा दलांना सापडले आहेत. पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी (दि.३१) सकाळी नोनी जिल्ह्यातील केकडू नागा गावात दोन गटांमध्ये गोळीबार सुरू झाला. या घटनेत थांगलेंसंग सिंगसन, थांगखोसेई हाओकिप आणि लम्मिनसंग किपजेन यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर कुकी इनपी मणिपूर या संघटनेने हत्येचा तीव्र निषेध केला आहे. या हत्यांमागे नागा बंडखोर गटांचा हात असल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

शरद पवारांचा दुष्काळी दौरा

पुणे : राज्यात यंदाच्या दिवाळीवर दुष्काळाचे सावट असून, दुष्काळी दौऱ्याच्या निमित्ताने सरकारकडून शेतकऱ्यांना ५ हजार रुपयांची अग्रीम मदतही करण्यात आली. त्याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी दुष्काळी दौरा सुरू केला असून, दोन दिवस ते सोलापूर जिल्ह्यात आहेत. या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर माध्यमांशी संवाद सादताना शरद पवारांनी दिल्लीतील इंडिया आघाडीचे आंदोलन, दुष्काळ परिस्थिती, सरकारची भूमिका, उजनीतील एआय डेटा सेंटरसंदर्भातील विविध प्रश्नांना उत्तरे दिली. यावेळी बोलताना ते म्हणाले की, मी दुष्काळाची प्रत्यक्ष माहिती घेत आहे. येथील शेतकऱ्यांना पाणी, •➤पान २ वर

रामलीलावर 'इंडिया'चा एल्गार

ज्ञानेश कुमार मतचोर; त्यांच्यामुळेच मोदी पंतप्रधान

काँग्रेस नेते राहुल गांधींचा केंद्र सरकारवर घणाघात

मुख्य निवडणूक आयुक्तांना हटवण्याची जोरदार मागणी

। नवी दिल्ली । प्रतिनिधी ।

मतांची चोरी, ईव्हीएममधील कथित घोटाळे आणि मतदार याद्यांतील फेरफारावरून इंडिया आघाडीने केंद्र सरकारविरोधात रणशिंग फुंकले. रविवारी (दि.१) दिल्लीतील रामलीला मैदानावर इंडिया आघाडीतील २० घटक पक्षांनी एकत्र येत महारॅलीतून मोदी सरकार आणि निवडणूक आयोगाला थेट आव्हान दिले. 'ज्ञानेश कुमार यांच्यामुळेच मोदी पंतप्रधान झाले,' असा गंभीर आरोप करत राहुल गांधी यांनी मुख्य निवडणूक आयुक्तांना हटवण्याची मागणी केली. तर, ममता बॅनर्जी, मल्लिकार्जुन खरगे, एम.ए. बेबी, तेजस्वी यादव, अखिलेश यादव, फारुख अब्दुल्ला, मेहबूबा मुफ्ती आणि अखिलेश यादव यांनीही मतदारांच्या अधिकारांवरून सरकारवर जोरदार हल्लाबोल केला.



काँग्रेस नेते तथा लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवण्याची मागणी करताना, 'ज्ञानेश कुमार यांच्याशिवाय नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले नसते,' असा गंभीर आरोप केला. देशाला दोन-तीन लोकांच्या मालकीचा बनवू देणार नाही, संविधान सर्वांत मोठे आहे आणि त्यापेक्षा कोणीही मोठे नाही, असा निर्धार व्यक्त करत विरोधकांनी मोदी सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली.

राहुल गांधी यांनी ईव्हीएम आणि मतदार •➤पान २ वर

ज्ञानेश कुमारांना हटवणारच : मल्लिकार्जुन खरगे

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे जमिनीत लपले असले तरी, त्यांना बाहेर काढल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असा आक्रमक इशारा काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी दिला. मोदी सरकारला सत्तेतून हटवण्यासाठी विरोधकांनी एकजुटीने लढा देण्याचे आवाहन त्यांनी केले. पंतप्रधान मोदी आपल्या मर्जीतील व्यक्तींना महत्त्वाच्या पदांवर बसवून जनतेच्या मताधिकारावर गदा आणण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप त्यांनी केला. आम्ही एकत्र येऊन लढू, मोदींना हटवू आणि संविधानाचे रक्षण करू,' असे ते म्हणाले. महाराष्ट्र, बिहार आणि उत्तर प्रदेशातील सरकारांवरही टीका करत ही सरकारे जनतेच्या मतांवर निवडून आलेली नसून चोरीची सरकारे असल्याचा आरोप त्यांनी केला.

> निवडणूक आयोगाने एसआयआर प्रक्रिया राबविली. त्यामध्ये अनेक त्रुटी आहेत. मतदानाचा हक्कच नष्ट करण्याचे काम करण्यात आले आहे. ज्ञानेशकुमार यांचा राजीनामा नक्की होणार आहे. संविधान व गरीबांच्या विरोधात निर्णय घेण्याचे काम मोदी सरकार करीत आहे. त्याविरोधात प्रचंड संताप जनतेमध्ये आहे. योग्य पध्दतीने काम होत नाही. जनतेच्या डोळ्यावर पट्टी बांधण्याचे काम करून मतचोरी करण्याचा प्रयत्न भाजप सरकार करीत आहे. – **जयंत पाटील**, सरचिटणीस, शेतकरी कामगार पक्ष



पराभव घडवून आणला : बॅनर्जी

पश्चिम बंगालमध्ये आमचा पराभव घडवून आणण्यात आला. आम्ही हरलो नाही, तर आम्हाला हरवण्यात आले. ईव्हीएम लुटले, मते लुटली आणि संविधानाचीही लूट केली, असा आरोप तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्ष ममता बॅनर्जी यांनी केला. दिल्लीतील रामलीला मैदानावर इंडिया आघाडीच्या सभेत त्या बोलत होत्या. पश्चिम बंगाल हा ईव्हीएम आणि निवडणूक आयोगाच्या कथित संगनमताचा बळी ठरल्याचा आरोप त्यांनी केला. एसआयआर प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित करताना संविधानिक मूल्यांचे उल्लंघन होत असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि मतदारांच्या अधिकारांचे संरक्षण झाले पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

पाच कोटींच्या जमिनीसाठी तोतयांचा डाव

■ तलाठी वल्लभ म्हस्के यांच्या निलंबनासाठी आमरण उपोषण

■ २५ लाखांची मागणी केल्याचा शेकापचे अनिल ढवळे यांचा आरोप

। पनवेल । प्रतिनिधी ।

नावातील साधर्म्याचा गैरफायदा घेत तोतया व्यक्ती उभ्या करून तब्बल ५ कोटी रुपये किमतीची जमीन हडपण्याचा प्रयत्न झाल्याचा खळबळजनक आरोप पनवेल तालुक्यातील मालढुंगे सजा तलाठी वल्लभ म्हस्के यांच्यावर करण्यात आला आहे. मूळ वारसदाराकडे २५ लाख रुपयांची मागणी केल्याचाही गंभीर आरोप असून, महसूल यंत्रणेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून तलाठ्यांना निलंबित करावे, या मागणीसाठी १ डिसेंबरपासून आमरण उपोषण छेडण्याचा इशारा शेतकरी कामगार पक्षाच्या रायगड जिल्हा शेतकरी सभेचे जिल्हाध्यक्ष अनिल ढवळे यांनी दिला आहे.

पनवेल तालुक्यातील देहरंग येथील सर्व्हे क्रमांक १/य/२३ या मिळकतीबाबत •➤पान २ वर

तडीपार गुन्हेगाराकडून गांजा विक्री

। पनवेल । प्रतिनिधी ।

हद्दपारीचा आदेश असतानाही पनवेल तालुक्यात वास्तव्य करणाऱ्या गुन्हेगाराला पनवेल तालुका पोलिसांनी गांजासह अटक केली आहे. बावंजे गावातील हाजी मलंग रोड परिसरात ही कारवाई करण्यात आली. सुभाष दत्तू माळी असे अटक करण्यात आलेल्याचे नाव असून, त्याच्याकडून ६२३ ग्रॅम गांजा, तीन चिलीम आणि एक माचिस असा एकूण ३२ हजार १५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुभाष माळी याला यापूर्वी ठाणे शहर, मुंबई, बृहन्मुंबई, नवी मुंबई, रायगड आणि पालघर या परिसरांतून •➤पान २ वर

महासत्तांना ७२ तासांचा हाय अलर्ट

जीवनावश्यक वस्तूंचा साठा करण्याचा सल्ला

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

जगभरातील महासत्ता आपल्या नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीसाठी तयार राहण्याचा सल्ला देत आहेत. त्यांनी ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, जपान आणि युरपीय महासंघासह अनेक देशांनी आपल्या नागरिकांना किमान ७२ तास पुरेल इतका अन्न, पिण्याचे पाणी, औषधे आणि जीवनावश्यक वस्तूंचा साठा करून ठेवण्याचा सल्ला दिला आहे. त्यामुळे ज्या देशात अत्याधुनिक शस्त्रसाठा, शक्तीशाली सैन्य आणि प्रगत तंत्रज्ञान आहे त्या देशांना आपल्या नागरिकांना संकटांना तयार राहण्याचा सल्ला का देत आहेत? काहीतरी मोठं घडणार आहे का? जग पुन्हा एकदा महायुद्धाच्या दिशेने जात आहे का? की एका मोठ्या सायबर हल्ल्याची, नैसर्गिक आपत्तीची किंवा जागतीक पुरवठा साखळी कोलमडण्याची भिती जगाला सतावत आहे का? आणि असे असेल तर त्याचा भारतावर काय परिणाम होणार, असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहे.

जगात सध्या •➤पान ३ वर



भारतावरही संकट?

भारतीय प्रशासनाने किंवा सरकारने नागरिकांना असा ७२ तासांचा विशेष साठा करण्याबाबत कोणताही मोठा आदेश दिलेला नाही. जर जागतिक स्तरावर पुरवठा साखळी विस्कळीत झाली, कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या किंवा सायबर हल्ल्यांमुळे जागतिक बाजारपेठेत अस्थिरता आली, तर भारतात आयात-निर्यात प्रभावित होऊन महागाई किंवा ऊर्जा संकटाचा सामना करावा लागू शकतो. तसेच, भारताच्या डिजिटल पायाभूत सुविधांवरही सायबर हल्ल्यांचे धोके कायम असतात, यामुळे बँकिंग आणि इंटरनेट सेवांवर परिणाम होऊ शकतो.

कर्जतमध्ये ठाकरे सेना आक्रमक

कर्जत तालुका बंद ठेवण्याचे आवाहन

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यात पाली सायडोंगर येथे प्रस्तावित असलेल्या टोरंट हायड्रॉलिक पॉवर प्रकल्प रद्द करण्यात यावा, तसेच झाडे तोडणाऱ्यांविरुद्ध १५ दिवसांत गुन्हा दाखल करण्यात यावा, या मागणीसाठी सोमवारी (दि.२) कर्जत तालुका बंद ठेवण्याचे आवाहन शिवसेना ठाकरे गटाने केले आहे.

कर्जत तालुक्यातील पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील परिसरात आणि सह्याद्री पर्वतरांगेत प्रस्तावित टोरेन्ट पॉवरच्या ३ हजार मेगावॅट पंप्ड स्टोरेज प्रकल्पावरून संघर्ष पेटला आहे. या प्रकल्पामुळे येथील जंगलावर अवलंबून असलेल्या कुटुंबांना रानमेवा, मध, औषधी वनस्पती आणि विविध रानभाज्यांमधून मिळणारे उत्पन्न बाधित होईल, असा दावा पर्यावरणप्रेमींकडून करण्यात आला आहे. तसेच ग्रामसभा, वनहक्क आणि आदिवासींच्या सहभागासंदर्भातील कायदेशीर प्रक्रियेचे काटेकोर पालन झाले आहे का, याचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात येत आहे. साय डोंगर परिसरातील जंगलात बिबट्या, शेकरू, मोर, यांसह विविध वन्यजीवांचा अधिवास असल्याचे सांगत, वृक्षतोडीमुळे जैवविविधतेवर गंभीर परिणाम •➤पान २ वर



पाटणसईत मटका अड्ड्यावर छापा

। नागोठणे । प्रतिनिधी ।

नागोठण्याजवळील वाकण नाक्यालगतच्या पाटणसई स्टॉपवरील एका टपरीवजा दुकानात सुरू असलेल्या मटका मटका अड्ड्यावर धाड टाकून सुमारे ५ हजारी ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही धडक कारवाई नागोठणे पोलीसांनी शुक्रवार दि.३० ऑक्टोबर रोजी केली. याप्रकरणी महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यांतर्गत बाळसई येथील टपरी चालक व विनापरवाना मटका चालविणारा परशुराम तेलंगेसह मटका खेळणाऱ्या अन्य दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे मोबाईल व्हॉट्स ॲप द्वारे चोरीछुपे मटका खेळणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. या •➤पान २ वर

आगीत घर भस्मसात



• (छायाचित्र: शैलेश पालकर)

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील साखर बोरज येथील एका घराला आग लागल्याची घटना घडली. या आगीत ते घर ८० टक्क्यांहून अधिक जळाले आहे. तसेच, या घरात वास्तव्यास असलेल्या कुटुंबाचे देखील मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

पोलादपूर तालुक्यातील बोरज गावातील अशोक झाडाणे हे सध्या ठाणे येथे वास्तव्यास आहेत. त्यामुळे त्यांच्या घराशेजारी नवीन घर बांधणाऱ्या उषा झाडाणे या त्यांच्या घरामध्ये राहत आहेत. दरम्यान, सकाळच्या सुमारास अशोक झाडाणे यांच्या घराच्या छपरातून मोठ्या प्रमाणात धूर निघत होता. या धुराचे आगीच्या ज्वाळांमध्ये रुपांतर झाले. त्यानंतर लगेचच घरातील व्यक्ती बाहेर पळाले. त्यामुळे कोणतीही जिवीतहानी झालेली नाही. परंतु, या आगीत उषा झाडाणे यांच्याकडील रोख रक्कम, दागिने, कपडे आणि धान्यसाठा भस्मसात झाला. दरम्यान, ही आग विझविण्यासाठी ग्रामस्थांनी शर्तीचे प्रयत्न केले. परंत, तो पर्यंत सर्वच जळून खाक झाले.

टेम्पोच्या धडकेत महिलेचा मृत्यू

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव तालुक्यातील गोरेगाव-मोर्बा मार्गावरील वडवली गावानजिक रविवारी (दि.१) सकाळच्या सुमारास भरधाव टेम्पोने एका ५२ वर्षीय महिलेला धडक दिली. या धडकेत या महिलेचा जागीच मृत्यू झाला असून, वडवली गावासह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कैसर जुल्फिकार येलूकर असे अपघातात मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. त्या रविवारी सकाळी घरातील कचरा रस्त्यापलीकडे टाकून पुन्हा आपल्या घराकडे परतत होत्या. त्याचवेळी गोरेगाव बाजूकडून मोर्बाकडे जाणाऱ्या टेम्पोने त्यांना जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी •➤पान २ वर

सरकारी कार्यालयांकडून मालमत्ता कर थकीत

२१ लाख रुपयांच्या कराची पालिकेला प्रतीक्षा

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

अलिबाग नगर परिषदेच्या हद्दीत असलेल्या नऊ सरकारी कार्यालयांकडून २१ लाख ४३ हजार १९७ रुपयांचा मालमत्ता कर थकीत असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामध्ये जिल्हा सामान्य रुग्णालय आणि नगररचना कार्यालय, पंचायत समिती, जिल्हा नियोजन समिती जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा उद्योग आणि अपर जिल्हाधिकारी कार्यालयांचा समावेश आहे. या कार्यालयांकडून ३१ हजार रुपयांपासून साडेपाच लाख रुपयांपर्यंतचा कर प्रलंबित असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

अलिबाग हे जिल्ह्याचे ठिकाण असून या ठिकाणी जिल्हा व तालुकास्तरावर वेगवेगळे सरकारी कार्यालये आहेत. या कार्यालयांच्या माध्यमातून शासनाच्या वेगवेगळ्या योजनांची कामे केली जातात. अलिबागमधील जिल्हा नियोजन कार्यालयाचा यावर्षीचा वार्षिक विकास आराखडा ५०० कोटीपर्यंत पोहचला •➤पान २ वर

मालमत्ता करावर दृष्टीक्षेप

कार्यालये	कराची रक्कम
जिल्हा नियोजन समिती जिल्हाधिकारी कार्यालय	३,०८,१४७
नगररचना कार्यालय	२,५३,९१६
गटविकास अधिकारी कार्यालय	१,९२,६११
जिल्हा शल्यचिकित्सक	२,४०,९३७
उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग	७८,९०६
कुलाबा जिल्हा मुलकी सेवा वर्ग कल्याण निधी	७५,३४०
सरचिटणीस संघटना कार्यकारी सदन	४७,५७५
अपर जिल्हाधिकारी कार्यालय	३१,८६९

> अलिबाग नगरपरिषद हद्दीतील सरकारी कार्यालयांना आवाहन करण्यात येत आहे की, लवकरात लवकर मालमत्ता कर भरून नगरपरिषदेला सहकार्य करावे.
> – प्रशांत नाईक, बांधकाम सभापती, अलिबाग नगरपरिषद

सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानचा एल्गार | **मुरूडमध्ये भव्य रॅलीद्वारे जनजागृती**

जंजिऱ्यावर कायमस्वरूपी भगवा फडकवा

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरूड-राजपुरी येथील ऐतिहासिक जंजिरा किल्ल्यावर कायमस्वरूपी भगवा ध्वज फडकविण्यासाठी शासनाने अधिकृत परवानगी द्यावी, अशी मागणी सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानच्यावतीने करण्यात आली. यासंदर्भात बाल छत्रपती शिवाजी महाराज यांच्या माध्यमातून मुरूडचे तहसीलदार आदेश डफळ यांना निवेदन सादर करण्यात आले.

जंजिरा किल्ल्यावर कायमस्वरूपी भगवा ध्वज फडकविण्याच्या मागणीसाठी रविवारी (दि.१) मुरूड शहरातील श्री काळभैरव मंदिरापासून एकदरा येथील खोरा बंदरापर्यंत भव्य रॅली काढण्यात आली. यावेळी सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानचे संपर्कप्रमुख गौरव शेवाळे, अलिबाग अध्यक्ष शुभम नखाते, रायगड जिल्हा प्रशासक विलास सुर्वे, अपर्णा माळी, पुणे अध्यक्ष आरती गायकवाड, सिंहगड विभागाचे सुशांत मोकाशी, पेण विभाग अध्यक्ष रोहित केनी, पुणे विभागाचे गिरीश झगडे, पिंपरी-चिंचवड विभागाचे गणेश राजपूत, रत्नागिरी विभागाचे विनय कातळकर, पुणे विभाग अध्यक्ष आकाश तुपे यांच्यासह शेकडो पदाधिकारी व दुर्गसेवक उपस्थित होते. त्यानंतर खोरा बंदर येथे आयोजित कार्यक्रमात जंजिरा किल्ल्याचा ऐतिहासिक वारसा, भगव्या ध्वजाचा विषय आणि गड-किल्ल्यांच्या संवर्धनाबाबत मान्यवरांनी आपली मते मांडली. यावेळी डोंबिवलीचे नगरसेवक महेश पाटील यांनी, छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांनी जंजिरा किल्ला जिंकण्यासाठी प्रयत्न केले होते. त्यामुळे या ऐतिहासिक किल्ल्यावर भगवा ध्वज फडकविण्याची मागणी शासनाने सकारात्मकतेने विचारात घ्यावी, असे सांगितले. तसेच, पुरातत्त्व विभागाच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त करत गड-किल्ल्यांच्या संवर्धनासाठी आवश्यक कामांना परवानगी मिळावी. तसेच, जंजिरा किल्ल्यावर शासनाच्या अधिकृत परवानगीने भगवा ध्वज फडकवून त्याच्या संरक्षणासाठी चोवीस तास पोलीस बंदोबस्त ठेवावा, अशी मागणीही त्यांनी केली.

सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. श्रमिक गोजमगुंडे यांनी, जंजिरा किल्ल्याच्या •➤पान २ वर



• (छायाचित्र: गणेश चोडणेकर)

जगाने नाकारलेले डेटा सेंटर कर्जतमध्ये आणण्याचा डाव

■ टोरेंट प्रकल्पावरून प्रकाश आंबेडकरांची सरकारवर टीका

। नेरळ । प्रतिनिधी ।

सह्याद्रीचे जंगल उद्ध्वस्त करून कर्जत तालुक्याला वाळवंट बनवण्याचा घाट घातला जात आहे. जगभरात नाकारले जाणारे डेटा सेंटर आणि प्रकल्प कर्जतमध्ये आणण्याचा डाव सुरू आहे. याबाबत राज्य आणि केंद्र सरकारने आपली भूमिका आधी स्पष्ट करावी, असे आव्हान वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी दिले. टोरेंटच्या पंप्ड स्टोरेज प्रकल्पाविरोधातील कर्जतकरांच्या लढ्याला पाठिंबा देण्यासाठी ते कर्जत तालुक्यात आले होते.



पाली येथे आयोजित सभेत बोलताना आंबेडकर यांनी, विकासाच्या नावाखाली निसर्गाचा विनाश खपवून घेतला जाणार नाही, अशी ठाम भूमिका मांडली. टोरेंटच्या साईडोंगर-१ आणि साईडोंगर-२ प्रकल्पांमुळे सह्याद्रीचे जंगल, जलस्रोत, जैवविविधता आणि आदिवासींच्या पारंपरिक जीवनपद्धतीवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

आदिवासींचे वनहक्क, ग्राम सभांचे अधिकार, वनजमिनीचे वळवणे, पाण्याची उपलब्धता आणि पर्यावरणीय परिणामांचा अभ्यास याबाबत सरकारने सर्व माहिती जनतेसमोर जाहीर करावी. सरकारने या विषयात लपवाछपवी करू नये, असेही त्यांनी सुनावले. जंगल ही कोणत्याही कंपनीची मालमत्ता नसून पुढच्या पिढ्यांची ठेव आहे. आज आपण जंगल वाचवले तर उद्या जंगल आपल्याला वाचवेल, असे सांगत त्यांनी कर्जतकरांना संविधानिक मार्गाने एकजुटीने संघर्ष करण्याचे आवाहन केले.

या सभेमुळे टोरेंटविरोधी आंदोलनाला राजकीय आणि सामाजिक पाठबळ मिळाले. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश सदस्य दीपक मोरे, जिल्हाध्यक्ष दीपक गायकवाड, सरचिटणीस धर्मेंद्र मोरे, संघटक सुनील गायकवाड, तालुकाध्यक्ष प्रदीप ढोले, उषा कांबळे, अनंता गायकवाड, प्रकाश गायकवाड, उल्हास जाधव, सचिन सरोते यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच कर्जत पर्यावरण बचाव समितीचे समन्वयक ॲड. कैलास मोरे हेही उपस्थित होते.

दुर्मिळ उदमांजराचा मृत्यू

■ पर्यावरण प्रेमी संतप्त

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील पाली सायडोंगर येथील जंगलातील झाडे कापली जात आहेत. त्यामुळे पशुपक्षी आपला नवीन निवारा शोधात आहेत. त्यात या झाडावरून त्या झाडावर उद्या मारणाऱ्या उदमांजर या दुर्मिळ प्राण्याचा मृत्यू झाला आहे. त्याबद्दल पर्यावरण प्रेमी हळहळ व्यक्त करीत असून प्राण्यांचे अधिवास नष्ट झाल्याने सरकारच्या भूमिकेविषयी येथील स्थानिक संतप्त झाले आहेत.

कर्जतच्या पाली तर्फे कोतवाल खलाटी ग्रामपंचायत मधील सायडोंगर येथ टोरंट कंपनीला धरण बांधण्याची परवानगी दिली आहे. त्यानंतर वन विभागाने आपले ६४० एकर क्षेत्र धरणासाठी देण्याचा निर्णय घेतला आहे. वर्षभरात टोरंट कंपनीला वन विभागाची जमीन देखील मिळाली असून, दसऱ्याच्या मुहूर्तावर टोरंट कंपनीसाठी वन विभागाने झाडे तोडून जमीन मोकळी करून देण्याचा निर्णय घेतला आहे.

त्यानंतर बेसुमार जंगलतोड सायडोंगर मध्ये झाली असून, वन विभागाकडून तोडण्यात आलेल्या झाडांचा मोठा फटका पशु-पक्षी आणि प्राणी यांना बसला आहे. प्राणी जंगल सोडून नवीन अधिवास शोधात असून दुर्मिळ समजले जाणारे उदमांजर हा प्राणी मृत अवस्थेत आढळून आल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

झाडांच्या फांद्यावर खेळणारे उदमांजर सतत या झाडावरून त्या झाडावर उड्या मारत बागडत असते. अशी सवय असलेले उदमांजर जंगलातील झाडे तोडल्याने तेथे उभ्या असलेल्या झाडावरून उडी मारत असताना समोरचे नेहमीचे झाड कापले गेले होते. त्याचा फटका त्या उदमांजराला बसला आणि ते उदमांजर झाडांऐवजी जमिनीवर कोसळले. त्यात त्या उदमांजराचा मृत्यू झाला असून या दुर्मिळ प्राण्याचा मृत्यू झाल्याने पर्यावरण प्रेमी संतापले आहेत.

वाढदिवसानिमित्त शैक्षणिक साहित्याचे वाटप

। पिरकोन । प्रतिनिधी ।

वाढदिवसाचा खर्च अनावश्यक बाबींवर न करता सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांसाठी मदतीचा हात देत शेतकरी कामगार पक्षाचे शहर चिटणीस ॲड. शेखर पाटील यांनी आपला वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा केला. त्यांच्या वाढदिवसानिमित्त रायगड जिल्हा परिषद पिरकोन शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या व खाऊचे वाटप करण्यात आले, तर शाळेला पंखा भेट देण्यात आला.

यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका नीलिमा म्हात्रे यांनी ॲड. शेखर पाटील यांचे औक्षण करून त्यांना शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविकात जेएनपीटी शाळेचे प्राचार्य गिरीश पाटील यांनी त्यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. सेवानिवृत्त शिक्षक संघटनेचे अध्यक्ष विलास गावंड यांनीही त्यांच्या कार्याचा गौरव करून समाजसेवेचे व्रत असेच



■ पिरकोन जिल्हा परिषद शाळेला पंख्याची भेट

■ विद्यार्थ्यांना वह्या, खाऊ

सुरू राहावे आणि त्यांना शतायुषी आयुष्य लाभावे, अशी सदिच्छा व्यक्त केली.

यावेळी मनोगत व्यक्त करताना ॲड. शेखर पाटील यांनी गावाने वाढदिवसानिमित्त केलेल्या सत्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. समाजसेवेचे व्रत कायम जोपासणार असल्याची ग्वाहीही त्यांनी दिली. या कार्यक्रमाला सामाजिक संस्थेचे विभागप्रमुख दिलीप पाटील, ग्रामपंचायत सदस्य अंकित पाटील, निखिल गावंड, विद्यालयाचे व्हाईस चेअरमन अनंत गावंड, सहशिक्षिका ज्योती बामणकर, स्कूल कमिटीच्या अध्यक्षा आयुष्या गावंड, ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

बच्चेकंपनीकडून किल्ले उभारणीची लगबग

। खांदेश्वर । प्रतिनिधी ।

दिवाळीचा सण जवळ येताच बालमावळ्यांमध्ये किल्ले उभारणीचा उत्साह संचारला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याची आणि स्वराज्याच्या इतिहासाची प्रेरणा देणारे किल्ले साकारण्यासाठी मुलांनी पुढाकार घेतला आहे. नवीन पनवेल सेक्टर १३ येथे बालमावळ्यांकडून ऐतिहासिक किल्ल्याची प्रतिकृती उभारण्याचे काम सुरू झाले असून, परिसरात दिवाळीपूर्वीच शिवकालीन वातावरण निर्माण झाले आहे.

दिवाळी आणि किल्ले उभारणी हे मराठी संस्कृतीचे जुने नाते आहे. माती, दगड, विटा आणि विविध सजावटीच्या साहित्याचा वापर करून मुले किल्ल्यांची निर्मिती करतात. यातून त्यांना छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, गड-किल्ल्यांचे महत्त्व आणि स्वराज्याच्या लढ्याची ओळख होते.

नवीन पनवेल सेक्टर १३ मधील मुलांनी एकत्र येत किल्ला उभारणीला सुरुवात केली आहे. किल्ल्याची तटबंदी, बुरुज, प्रवेशद्वार आणि ऐतिहासिक वास्तू साकारण्यासाठी बालमावळ्यांची लगबग सुरू आहे. किल्ल्याला ऐतिहासिक स्वरूप देण्यासाठी मुले विशेष मेहनत घेत आहेत. मोबाइल आणि संगणकाच्या युगातही नव्या पिढीकडून किल्ले उभारणीची परंपरा जपली जात असल्याचे समाधानकारक चित्र पाहायला मिळत आहे. बालमावळ्यांच्या या उत्साहाचे परिसरातील नागरिकांकडून कौतुक होत आहे.



रानडुकराच्या मादीसह पिल्लांना जीवदान



। खोपोली । प्रतिनिधी ।

खोपोली जवळील सायमाळ येथील वनक्षेत्रात वन विभागाचे कर्मचारी राजेश खांडेकर आणि विकी घुटे यांना रानडुकराची मादी आपल्या पिल्लांसह जुन्या पाणी साठवणटाकीतपडलेलीआढळली. त्यानंतर वन कर्मचाऱ्यांनी तातडीने हेल्प फाऊंडेशनची मदत घेतली. हेल्प फाऊंडेशनच्या पथकाने सुरुवातीला रोपच्या साहाय्याने मादीला बाहेर काढण्याची तयारी केली. मात्र, ती आक्रमक झाल्याने तिला बेशुद्ध करून बाहेर काढण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, परिस्थितीचा विचार करून मादीला बेशुद्ध करण्याऐवजी वापरात नसलेल्या टाकीची भिंत तोडून बाहेर पडण्यासाठी मार्ग तयार करण्यात आला. दरम्यान, परिसरात रान डुकरांचा एक मोठा कळपही त्याठिकाणी वावरत होता. बचाव पथकाने जाळीच्या साहाय्याने पिल्लांना बाहेर काढले, तर टाकीची भिंत तोडून तयार केलेल्या मार्गातून मादीही सुखरूप बाहेर पडून आपल्या अधिवासाच्या दिशेने निघून गेली. या मोहिमेत हेल्प फाऊंडेशनच्यावतीने गुरुनाथ साठेलकर, अमोल कदम, अमोल ठकेकर, निलेश यादव, पंकज बागुल, निखिल ढोले, सुनील पुरी, भक्ती साठेलकर, साईश सुनील पुरी आणि धनंजय शिद आणि पेट फोर्स, पुणे येथील सदस्यांनीही बचावकार्यात सहकार्य केले.

पान १ वरुन

रामलीलावरून 'इंडिया'चा एल्गार

यांमधील कथित गैरप्रकारांचा मुद्दा उपस्थित करत केंद्र सरकार, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर जोरदार टीका केली. देशाला पुन्हा योग्य मार्गावर आणण्याचे पहिले पाऊल म्हणजे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवणे होय. त्यांना जावेच लागेल, अशी ठाम मागणी त्यांनी केली.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर मतदार यादीतून १३.५ कोटी मतदारांची नावे वगळण्यात आली. प्रत्येक सात मतदारांमागे एका मतदाराचे नाव कमी झाले असून, देशातील १५ टक्के मतदारांची नावे हटवण्यात आली. लोकसभा निवडणुकीत एनडीए आणि विरोधकांच्या मतांमधील फरक अवघा तीन टक्के होता. त्यानंतर मोठ्या प्रमाणात मतदारांची नावे वगळण्यात आली. त्यामुळे २०२४ ची निवडणूक बेकायदेशीर होती, असा दावा राहुल गांधी यांनी केला. मतदार याद्यांमधील कथित फेरफार ही साधी चोरी नसून देशद्रोह आहे. ज्ञानेश कुमार यांच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे, असेही ते म्हणाले.

देशातील शेतकरी कष्ट करत असेल तर त्याला त्याच्या कष्टाचे फळ मिळाले पाहिजे. विद्यार्थी १८ तास अभ्यास करत असेल तर त्याला रोजगार मिळाला पाहिजे, असा भारत आम्हाला हवा आहे. देश दोन-तीन लोकांच्या मालकीचा होऊ देणार नाही. आम्ही संविधान नष्ट होऊ देणार नाही, असे सांगत त्यांनी केंद्र सरकारवर हल्लाबोल केला. पंतप्रधान मोदी आणि अमित शाह यांच्याविरोधात कायदेशीर कारवाई करण्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला.

भाजपच्या विदाईची वेळ आली : यादव

उत्तर प्रदेशात एक कोटी २७ लाख मतदारांची नावे कमी झाल्याच्या मुद्द्यावरून समाजवादी पक्षाचे अध्यक्ष आणि माजी मुख्यमंत्री अखिलेश यादव यांनी भाजपला लक्ष्य केले. सव्वा कोटी मतदारांची संख्या राज्यातील ४०३ विधानसभा मतदारसंघांत विभागली, तर प्रत्येक मतदारसंघातील सुमारे ३१ हजार मते कमी झाल्याचे चित्र समोर येते, असे ते म्हणाले. निवडणुकीतील पराभव दिसू लागल्यानंतर भाजपकडून मतदारांची नावे कमी झाल्याचा मुद्दा उपस्थित केला जात आहे. भाजपला केवळ त्यांच्याच पक्षाचे सदस्य मतदार म्हणून हवे आहेत, असा आरोप त्यांनी केला. उत्तर प्रदेशातील पोटनिवडणुकांमध्ये मतदारांना धमकावण्यात आल्याचा दावाही त्यांनी केला. लोकसभा निवडणुकीत भाजपची थोडी विदाई झाली असून, आगामी काळात आणखी विदाई होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

महासत्तांना ७२ तासांचा हाय अलर्ट

वेगळ्या घडामोडी पाहायला मिळत असून, युरोपपासून आशियापर्यंत तब्बल १७ देशांनी आपल्या नागरिकांना सद्यस्थितीत घरात किमान तीन दिवस पुरेल इतका अन्नधान्य आणि जीवनावश्यक वस्तूंचा साठा ठेवण्याचे आवाहन अनेक सरकारांनी केले आहे. काही देशांनी तर सात ते दहा दिवसांचा साठा ठेवण्याचा सल्ला दिला आहे. त्यामुळे जग एखाद्या मोठ्या संकटाच्या तयारीत आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. ब्रिटनने नागरिकांना किमान तीन दिवस पुरेल इतका अन्न आणि पाण्याचा साठा ठेवण्यास सांगितले आहे. जपाननेही तीन दिवसांचा साठा ठेवण्याचा सल्ला दिला असून, शक्य असल्यास तो एका आठवड्यापर्यंत वाढवण्याचे आवाहन केले आहे. बेल्जियम, फ्रान्स, नेदरलँड्स आणि फिनलंड या देशांनी किमान ७२ तासांची तयारी ठेवण्यास सांगितले आहे. तर, स्वीडन आणि नॉर्वेने नागरिकांना सात दिवस स्वतःच्या गरजा भागवता येतील, अशी व्यवस्था करण्याचा सल्ला दिला आहे. तैवानमध्येही नागरिकांना एका आठवड्याच्या गरजेपुरत्या वस्तू घरात ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मात्र, या सूचनांचा अर्थ जगात युद्ध सुरू होणार आहे किंवा एखादी मोठी आपत्ती येणार आहे, असा होत नाही. सरकारांनी कोणत्याही युद्धाची अधिकृत घोषणा केलेली नाही. परंतु, भविष्यात अचानक संकट निर्माण झाल्यास मदत पोहोचण्यास वेळ लागू शकतो, याची जाणीव सरकारांना झाली आहे. त्यामुळे सुरवातीचे किमान ७२ तास नागरिकांनी स्वतःची आणि कुटुंबियांची काळजी घेता यावी हा या सल्ल्यामागची उद्देश असल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, वीजपुरवठा अनेक दिवस खंडित झाला तर एटीएम बंद पडू शकतात. ऑनलाइन पेमेंट सेवा ठप्प होऊ शकतात. मोबाईल नेटवर्क बंद पडू शकते. पाणीपुरवठा विस्कळीत होऊ शकतो. वाहतूक आणि पुरवठा व्यवस्था कोलमडल्यास सुपरमार्केटमधील वस्तूही मिळणे अवघड होऊ शकते. अशावेळी नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागू शकतो. युक्रेनमधील युद्ध, कोरोना आणि जगभरात वाढणाऱ्या नैसर्गिक आपत्तींचा अनुभव लक्षात घेऊन अनेक देशांनी ही खबरदारी घेतली आहे.

नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन

पिण्याचे पाणी, खाद्यपदार्थ, आवश्यक औषधे, टॉर्च, अतिरिक्त बॅटरी, पॉवर बँक, रेडिओ आणि काही रोख रक्कम घरात ठेवण्याचा सल्ला देण्यात आला आहे. या वस्तू एकाच वेळी खरेदी करण्याऐवजी हळूहळू साठवून ठेवाव्यात. घाबरून जाऊन मोठ्या प्रमाणात खरेदी करण्याची गरज नाही. हा इशारा घाबरवण्यासाठी नसून नागरिकांना सतर्क करण्यासाठी आहे. संकट कधी आणि कोणत्या स्वरूपात येईल, हे सांगता येत नाही. मात्र, अशा वेळी किमान काही दिवस स्वतःच्या गरजा भागवता येतील, एवढी तयारी असणे गरजेचे आहे.

टेम्पोच्या धडकेत महिलेचा मृत्यू

होती की, टेम्पोने महिलेला काही अंतरापर्यंत फरफटत नेले. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या कैसर जुल्फिकर येलूकर यांचा मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. याप्रकरणी गोरेगाव पोलीस ठाण्यात टेम्पो चालकाविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला.

पाटणसई येथील मटका अड्ड्यावर छापा

कारवाईदरम्यान, दुकान चालक परशुराम तेलंगेकडून ९३० रुपये रोख रक्कम, ५ हजार रुपये किंमतीच्या मोबाईलसह इतर वस्तू असा एकूण ५ हजार ९५० रुपये किमतीचा मुद्देमाल आढळून जप्त करण्यात आला. या सर्व साहित्याचा वापर करून परशुराम तेलंगे कल्याण ओपन नावाचा मटका जुगार चालवित होता. यावेळी दोघेजण कल्याण ओपन नावाचा मटका जुगार मोबाईल व्हॉटस्ॲप मेसेजद्वारे खेळताना सापडले. त्यामुळे या तिघांविरोधात नागोठणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तडीपार गुन्हेगाराकडून गांजा विक्री

एक वर्षासाठी हद्दपार करण्यात आले होते. मात्र, हद्दपारीचा आदेश असतानाही तो पनवेल तालुक्यात वास्तव्यास होता. दरम्यान, बावंजे येथील हाजी मलंग रोड परिसरात संशयित हालचालींची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी कारवाई केली. यावेळी आरोपीकडे गांजा आणि त्याच्याशी संबंधित साहित्य आढळून आले. यावेळी जप्त केलेला गांजा ओडिशा येथील नारायण नावाच्या व्यक्तीकडून आणल्याचे त्यानी सांगितले.

जंजिऱ्यावर कायमस्वरूपी भगवा फडकवा

ऐतिहासिक पार्श्वभूमीवर सविस्तर भाष्य केले. ३० मार्च २०१६ रोजी किल्ल्यावर भगवा ध्वज लावल्यानंतर निर्माण झालेला वाद, पद्मदुर्ग येथे उभारलेला भगवा ध्वज आणि दुर्गसेवकांनी अनेक वर्षांपासून जपलेली ध्वजाची परंपरा याबाबत त्यांनी माहिती दिली. तसेच, जंजिरा किल्ला हा कोणत्याही एका धर्माचा नसून, देशाचा ऐतिहासिक वारसा आहे. त्याकडे राष्ट्रीय आणि ऐतिहासिक दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. दरम्यान, जंजिरा किल्ल्यावर कायमस्वरूपी भगवा ध्वज फडकविण्याच्या मागणीचे निवेदन तहसीलदारांना देण्यात आल्याने आता शासन आणि पुरातत्त्व विभाग याबाबत काय भूमिका घेतात, याकडे इतिहासप्रेमी आणि दुर्गसेवकांचे लक्ष लागले आहे.

पाच कोटींच्या जमिनीसाठी तोतयांचा डाव

हा प्रकार घडल्याचा आरोप आहे. १९६५ मध्ये ईरीनमेरी प्रोन्सेका यांनी मुलांसाठी एक एकर पाच आर क्षेत्रातील आठ प्लॉट खरेदी केले होते. या जमिनीचे गुंतवणूकदार मुंबई-पुण्यात राहात असल्याने फेरफार नोंदी झाल्या नव्हत्या. याचाच फायदा घेत नावातील साधर्म्य असलेल्या व्यक्तींना पुढे करून जमीन हडपण्याचा प्रयत्न झाल्याचे ढवळे यांनी निवेदनात म्हटले आहे. मुग्धा सातारकर यांनी २२ सप्टेंबर २०२५ रोजी तलाठी वल्लभ म्हस्के यांच्याकडे वारस नोंदीसाठी अपूर्ण कागदपत्रांसह अर्ज केला होता. मात्र, सुमारे चार महिने त्यावर कार्यवाही झाली नाही.

दरम्यान, वेरनॉन सिसिलीया प्रोन्सेका यांच्या वारस रेखा सदर यांनी पनवेल दिवाणी न्यायालयात सीए क्र. १०५४/२४ अंतर्गत वारस दाखल्यासाठी अर्ज केला. न्यायालयाने ५ जानेवारी रोजी त्यांच्या नावे वारस दाखला दिला. त्यानंतर रेखा सदर यांनी २७ जानेवारी २०२६ रोजी प्रतिज्ञापत्रासह तलाठ्यांकडे वारस नोंदीसाठी अर्ज केला. यावेळी तलाठी म्हस्के यांनी त्यांच्याकडे २५ लाख रुपयांची मागणी केल्याचा आरोप आहे. पैसे देणे शक्य नसल्याचे सांगितल्यानंतर १६ फेब्रुवारी रोजी तलाठ्यांनी अपर तहसीलदारांना पत्र देऊन या मिळकतीबाबत दोन अर्ज प्राप्त झाल्याचे कळविले. तसेच, मृत्युपत्र क्रमांक ३/४४/४४/२००८ च्या आधारे नोंद घेण्याबाबत मत व्यक्त केले.

३ जून रोजी तलाठ्यांनी मुग्धा सातारकर आणि रेखा सदर यांना फेरफार क्रमांक २०७ ला आव्हान देण्यास सांगितले. त्यानंतर २८ सप्टेंबर रोजी मुग्धा सातारकर यांच्याकडून पुन्हा अर्ज दाखल करण्यास सांगितल्याचा आरोप आहे. या अर्जाची मंडळ अधिकाऱ्यांनी चौकशी करून मृत्युपत्रातील तारीख व वेळेच्या त्रुटींचा उल्लेख करत प्रकरण वरिष्ठांकडे पाठविण्याचा अहवाल दिला. मात्र, ७ सप्टेंबर रोजी तलाठ्यांनी टिपणी सादर करून जमीन महसूल अधिनियम १९५५ नुसार फेरफार दुरुस्तीचे आदेश देण्याची विनंती केली. न्यायालयाने रेखा सदर यांना दिलेला वारस दाखला मान्य नसल्याची भूमिका घेत त्यांनी न्यायालयात अपील करावे, असे मतही तलाठ्यांनी मांडल्याचा आरोप आहे.

या प्रकरणातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, दोन वेगवेगळ्या महिलांच्या दस्तांवरील सह्यांचा आहे. २४ नोव्हेंबर १९६५ रोजी ईरीनमेरी प्रोन्सेका यांनी केलेल्या खरेदीखतावर त्यांच्या सह्या आहेत, तर २००८ मध्ये नोंदणीकृत मृत्युपत्रावर आयरीन अल्बर्ट प्रोन्सेका यांच्या सह्या आहेत. दोन्ही दस्तांवरील सह्या वेगवेगळ्या व्यक्तींच्या असल्याचा दावा ढवळे यांनी केला आहे. आयरीन अल्बर्ट प्रोन्सेका यांचा मृत्यू २४ ऑगस्ट २०१० रोजी पुणे येथे झाला, तर ईरीनमेरी प्रोन्सेका यांचा मृत्यू २४ डिसेंबर २००२ रोजी दिल्ली येथे झाला होता. दोघींच्या नावातील साधर्म्याचा फायदा घेऊन सुमारे ५ कोटी रुपयांची जमीन हडपण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणाविरोधात शेतकरी कामगार पक्षाने १६ ऑक्टोबर रोजी अपर तहसीलदार कार्यालयावर मोर्चा काढला होता. त्यानंतर अपर तहसीलदारांनी तलाठी वल्लभ म्हस्के यांना मालढुंगे सजा येथून हटवून पुढील निर्णय होईपर्यंत सुंदरे सजेतील तलाठ्यांकडे मालढुंगे सजाची जबाबदारी सोपविली. दरम्यान, रेखा सदर यांनी २५ लाखांची मागणी केल्याबाबत अपर तहसीलदारांकडे सत्यप्रतिज्ञापत्र सादर केले आहे. पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील अवसारी खुर्द येथील नवनाथ शिंदे यांनीही यासंदर्भात प्रतिज्ञापत्र दिल्याचे निवेदनात म्हटले आहे.

तलाठी वल्लभ म्हस्के यांची सखोल चौकशी करून त्यांना निलंबित करावे, जमीन हडपण्याच्या कथित प्रयत्नाची चौकशी करावी आणि मूळ मालकांना न्याय द्यावा, या मागणीसाठी अनिल ढवळे हे १ डिसेंबर रोजी पनवेल येथील नवीन प्रशासकीय भवनातील अपर तहसीलदार कार्यालयाजवळ आमरण उपोषणाला बसणार आहेत. याबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी रायगड आणि अपर तहसीलदार पनवेल यांना देण्यात आले असून, महसूल मंत्री, कोकण विभागीय आयुक्त, उपविभागीय अधिकारी पनवेल आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक पनवेल शहर यांनाही प्रत पाठविण्यात आली आहे.

सरकारी कार्यालयांकडून मालमत्ता कर थकीत

असून, नगररचना कार्यालयाद्वारे शहराच्या विकासासाठी विकास आराखडे तयार करणे, इमारतीच्या बांधकामासाठी वेगवेगळ्या परवानग्या देणे, अशा अनेक प्रकारची कामे केली जातात. त्यामुळे या कार्यालयाद्वारे कराच्या स्वरुपात लाखोच्या उलाढाली होतात. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत वेगवेगळी बांधकामे केली जातात. त्यामध्ये सरकारी कार्यालयासंह रस्ते व पुलांचा समावेश आहे. त्यासाठी शासनाकडून करोडोचा रुपयांचा निधी या विभागाकडे दिला जातो. अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयामार्फत वेगवेगळ्या आरोग्य सेवा पुरविल्या जातात. रुग्णांना चांगल्या सेवा देण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या योजना राबविल्या जातात. त्यासाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणात निधी या कार्यालयाला प्राप्त होतो. जिल्हा उद्योग केंद्राद्वारे व्यावसायिक संबंधित वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. जिल्ह्यातील तरुणांमध्ये रोजगार निर्मिती करण्याबरोबरच त्यांना व्यावसायिक बनविण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्राचा मोठा वाटा असतो. उद्योगासंबंधीत वेगवेगळ्या योजनांसाठी जिल्हा उद्योग केंद्राला निधी शासनाकडून दिला जातो. अलिबागमधील गटविकास अधिकारी कार्यालयामार्फत ग्रामीण भागाचा विकास साधला जातो. ग्रामीण भागातील रस्ते, घरकूल योजना, पाणी आरोग्य, शिक्षण अशा सर्वच विभागाशी संबधित योजनांची कामे गटविकास अधिकारी कार्यालयाद्वारे केली जातात. सरकारी विभागांकडून कराची रक्कम भरण्यासाठी शासनाकडून विशेष निधी मंजूर होतो. त्यातून वेगवेगळ्या प्रकारचे कर भरण्याचे काम कार्यालयांकडून केला जातो.

मात्र, लाखो करोडोची उलाढाल होणाऱ्या या कार्यालयांकडून २१ लाख ४३ हजार रुपयांचा मालमत्ता कर थकीत असल्याची माहिती समोर आली आहे. मालमत्ता कर हा स्थानिक स्वराज्य संस्थाच्या महसूलाचा मुख्य स्त्रोत असतो. मात्र, तो कर अनेक शासकीय कार्यालयांकडून थकीत असल्याचा परिणाम थेट नागरी सुविधांसह विकासांवर होतो. कर थकीत रकमेमध्ये जिल्हा नियोजन, गटविकास अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयांचा आकडा लाखात असल्याची माहिती समोर आली आहे. मार्च महिन्यात आर्थिक वर्ष संपणार असून आर्थिक वर्ष संपणार आहे. त्यामुळे या तीन महिन्यात सरकारी कार्यालयांकडून लाखो रुपयांचा मालमत्ता कर मिळण्याची प्रतिक्षा पालिकेला लागून राहिली असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

दरम्यान, जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाकडून सांगण्यात आले की, मालमत्ता कर साडेपाच लाखहून अधिक रुपयांचा शिल्लक राहिला आहे. त्यासासाठी शासनाकडून निधी मंजूर झाला असून, दोन दिवसांत कर भरण्याचे काम केले जाईल, अशी माहिती देण्यात आली आहे. तसेच, मागील काही वर्षापासून मालमत्ता कर थकीत आहे. तो कर लवकरच भरला जाईल असे, संघटना कार्यकारी सदन कार्यालयाकडून सांगण्यात आले. तर, जिल्हा नियोजन अधिकारी व बांधकाम अधिकारी इत्यादींशी कृषीवलच्या प्रतिनिधींनी संपर्क करण्याचा प्रयत्न केला; परंतु, होऊ शकला नाही.

कर्जतमध्ये ठाकरे सेना आक्रमक

होण्याचा इशारा पर्यावरणप्रेमींनी दिला आहे.

तसेच, या प्रकल्पामुळे उल्हास-पेज नदी जलस्रोतांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. कर्जत तालुक्यातील अनेक गावांना आधीच पाणीटंचाईचा सामना करावा लागत असताना मोठ्या प्रकल्पासाठी पाण्याचा वापर वाढल्यास भविष्यातील पाणीप्रश्न गंभीर होऊ शकतो, असा दावा करण्यात येत आहे. सह्याद्रीच्या संवेदनशील भूभागात अशा प्रकल्पासाठी भूगर्भशास्त्रीय, जलवैज्ञानिक आणि आपत्ती जोखीम यांचे अहवाल सार्वजनिक करावेत, अशी मागणी करण्यात येत आहे.त्याविरुद्ध शिवसेना ठाकरे पक्षाने सोमवारी कर्जत तालुका बंद ठेवण्याचे आवाहन केले आहे. या बंदमध्ये सर्व राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि व्यापारी संघटना यांनी सहभागी व्हावे, अशी विनंती शिवसेना पक्षाने पत्रव्यवहार करून केली आहे.

शरद पवारांचा दुष्काळी दौरा

चारा याची अत्यंत गरज आहे. उदाहरण द्यायचे झाले तर सोलापूरमध्ये १३९ गावे आहेत, १३५ टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. माढा तालुक्यात ११० टँकर आहेत, हे एका जिल्ह्याचे आहे, असे म्हणत शरद पवारांनी दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य सांगितलं. लोकांना मी प्रत्यक्ष भेटणार असून, त्यांना लागणाऱ्या गरजा उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न राहील. मला खात्री आहे, मी राज्य सरकारला विनंती करेल, सरकारची मदत मिळेल. माझी दिल्लीत आणि मुख्यमंत्र्यांशी बैठक झाली आहे, शेतकऱ्यांच्या मदतीसाठी काहीतरी मार्ग काढला जाईल अशी खात्री आहे, असेही पवारांनी म्हटले.

श्रेयखोरांना जनताच 'बायपास' करेल!

■ नगराध्यक्षा भावना घाणेकरांचा आ. बालदींवर घणाघात ■ गोपाळ पाटील यांचा सत्कार

| चिरनेर | प्रतिनिधी |

कुणाचे बाळ कडेवर घेतले म्हणून मूल त्याचे होत नाही, असा टोला लगावत ५३ कोटी रुपये खर्चाच्या उरण बायपास रस्त्याचे श्रेय उपटू पाहणारे भाजप आमदार महेश बालदी आणि त्यांच्या समर्थकांना नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी चांगलेच धारेवर धरले. १८ वर्षांच्या संघर्षातून साकारलेल्या बायपासचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना २०२९ च्या विधानसभा निवडणुकीत उरणची जनताच बायपास करेल, असा घणाघात त्यांनी केला. उरण बायपासचे संकल्पक आणि १८ वर्षे सातत्याने पाठपुरावा करणारे उरण उत्कर्ष समितीचे अध्यक्ष गोपाळ पाटील यांच्या भव्य नागरी सत्कार सोहळ्यात त्या बोलत होत्या.



मागील १८ वर्षांपासून सिडकोच्या अखत्यारीत रखडलेल्या उरण बायपास रस्त्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नुकतेच दृश्यप्रणालीद्वारे उद्घाटन करण्यात आले. मात्र, या रस्त्याची संकल्पना मांडून सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या गोपाळ पाटील यांचा साधा नामोल्लेखही उद्घाटन कार्यक्रमात करण्यात आला नाही. उलट,भाजप आ. महेश बालदी यांनी रस्त्याचे श्रेय घेण्याचा प्रयत्न केल्याने उरणकरांमध्ये संताप व्यक्त करण्यात आला. याच पार्श्वभूमीवर रविवारी (३१) सायंकाळी उरण बायपास रस्त्यावरच गोपाळ पाटील यांचा जाहीर नागरी सत्कार आयोजित करण्यात आला होता. उरण सामाजिक संस्था, आधार सावली फाऊंडेशन, उरण उत्कर्ष समिती, युवा सामाजिक संस्था आणि उरण तालुका चेस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम झाला.

यावेळी सभापती महेश म्हात्रे यांनी गोपाळ पाटील यांच्या संघर्षाचा गौरव केला. कबड्डीपटू, राजकारणी, नाट्यकलाकार, गायक आणि समाजसेवक अशा विविध भूमिका निभावताना त्यांनी उरण बायपाससाठी प्रदीर्घ लढा दिला. श्रेय घेण्यासाठी लावलेले पोस्टर आणि बॅनर दोन दिवसांत उतरले; मात्र ५३ कोटींच्या बायपाससाठी गोपाळ पाटील यांनी केलेला पाठपुरावा जनतेच्या कायम स्मरणात राहील, असे त्यांनी सांगितले. लोकप्रतिनिधींपेक्षाही पलीकडे जाऊन त्यांनी काम केले आहे. नगरपरिषदेच्या हद्दीतील उर्वरित ४०० मीटर बायपास रस्ता १३ कोटींच्या निधीअभावी रखडला असून, त्यासाठी पुन्हा संघर्ष करावा लागणार आहे. या लढ्यात गोपाळ पाटील यांच्यासोबत सहभागी होण्याची तयारीही त्यांनी दर्शवली.

याप्रसंगी उरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुधाकर पाटील, उरण तालुका चेस असोसिएशनचे अध्यक्ष संदीप पाटील, उरण बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. विजय पाटील, कामगार नेते व माजी जेएनपीए कामगार ट्रस्टी भूषण पाटील यांनीही बायपासचे श्रेय घेण्याच्या प्रयत्नांवर टीका केली. खोपटा खाडी पुलाच्या जोडरस्त्यासाठी श्रमदानातून केलेले माती भरावाचे काम, करळ रेल्वे फाटक बंद करण्याच्या विरोधातील रेल्वे रोको आंदोलन, करळ उड्डाणपुलासाठी केलेला न्यायालयीन संघर्ष आणि उरण बायपाससाठी दिलेला लढा अशा गोपाळ पाटील यांच्या सामाजिक कार्यांना त्यांनी उजाळा दिला.

सत्काराला उत्तर देताना गोपाळ पाटील म्हणाले की, आपण केलेले काम पडद्याआड जाऊ नये आणि दुसऱ्यांच्या कामाचे श्रेय घेणाऱ्यांना पायबंद घालता यावा, यासाठीच नागरी सत्काराला संमती दिली.

यावेळी व्यासपीठावर आधार सावली फाऊंडेशनच्या अध्यक्षा रेश्मा म्हात्रे, उरण उत्कर्ष समितीचे दीपक गावंड, युवा सामाजिक संस्थेचे अध्यक्ष हर्षल ठाकूर, कोमसापचे अध्यक्ष एल. बी. पाटील, शेकाप तालुका चिटणीस रवींद्र घरत, संतोष पवार, शिक्षक नेते दा.चां. कडू, हेमलता पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

निवडक



अन्नत्याग आंदोलकांशी खा. सुळेंचा संवाद

उरण : रायगड जिल्ह्यातील सर्व १४ तालुके दुष्काळग्रस्त जाहीर करावेत, शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रुपये व शेतमजुरांना २५ हजार रुपये आर्थिक मदत द्यावी, रोजगार हमीची कामे सुरू करावीत आणि शेतकऱ्यांच्या मुलांचे शैक्षणिक शुल्क माफ करावे, या मागण्यांसाठी माणगाव तहसील कार्यालयासमोर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष राजू मोहन रोडेकर व विधानसभा अध्यक्ष संताजी पवार यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या जाहीर अन्नत्याग आंदोलनाला उरणच्या नगराध्यक्ष भावनाताई घाणेकर यांनी भेट देऊन आंदोलकांशी संवाद साधला. यावेळी भावना घाणेकर माणगावचे तहसीलदार विपिन लोकारे यांच्याशी चर्चा केली. तसेच खासदार सुप्रिया सुळे यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून आंदोलकांच्या मागण्या व व्यथा त्यांच्यापर्यंत पोहोचवल्या. भावनाताईंच्या पुढाकारातून सुप्रिया सुळे यांनी थेट आंदोलनकर्त्यांशी संवाद साधत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली आणि आंदोलकांच्या मागण्या जिल्हाधिकारी व शासनापर्यंत तातडीने पोहोचविण्याचे निर्देश दिले.

चाकरमान्यांच्या घरावर चोरट्यांचा डल्ला

पोलादपूर : गणेशोत्सवासाठी गावी आलेल्या चाकरमान्याच्या घरातून अज्ञात चोरट्याने तब्बल ६ लाख ६१ हजार ५० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना पोलादपूर तालुक्यातील आड-चांभारगणी बुद्रुक येथे घडली. याप्रकरणी पोलादपूर पोलिसांनी शुक्रवारी (दि. ३० ऑक्टोबर) अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी राकेश चंद्रकांत सोंडकर (३८) हे मिरारोड येथे नोकरीला असून गणेशोत्सवानिमित्त गावी आले होते. दीड दिवसांच्या गणपती विसर्जनानंतर अंगावरील सोन्याचे दागिने पिशवीत काढून ठेवले असता अज्ञात चोरट्याने घरातून पिशवी चोरून नेली. यामध्ये दोन सोन्याच्या चेन, गणपती लॉकेट, दोन सोन्याच्या अंगठ्या आणि सोन्याचे ब्रेसलेट असा ऐवज होता. पोलीस हवालदार म्हात्रे यांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलीस उपनिरीक्षक मंगेश मुंडे हे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करीत आहेत.

२४ लाख ७७ हजारांची फसवणूक

पनवेल : २७ लाखांपैकी २४ लाख ७७ हजार ९५० रुपये परत न देता फसवणूक केल्याप्रकरणी सिताराम मधुकर गीते (रा. पाले ठाकूरवाडी) यांच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. फिर्यादी रविकिरण नरसिंह मूर्ती येनामदला (रा. उलवे सेक्टर १७) यांनी आरोपीच्या ताब्यात कोळंबीची गाडी लोड करून पाठवली होती. या गाडीचे आरोपी यांना २९ लाख २२ हजार रुपयांचे बिल दिले होते. फिर्यादी यांनी २५ मे रोजी पाठवलेली गाडी गुजरात येथे कंपनीत खाली करण्यास सांगितली होती. ती गाडी गुजरात येथे खाली करून त्या मालाचे आरोपी याने कंपनीमधून बँक खात्यावर २७ लाख १६ हजार रुपये रक्कम घेतली. यावेळी त्यातील चार लाख ४५ हजार रुपये फिर्यादी यांना दिले आणि उर्वरित २४ लाख ७७ हजार ९५० रुपये त्यांना परत न देता त्यांची फसवणूक केली.



● (छायाचित्र : संजय गायकवाड)

तरुणांनी एकजुटीतून बांधला बंधारा

कर्जत : पावसाचे पाणी वाहून जाऊ न देता ते अडवून जमिनीत जिरविणे ही काळाची गरज बनली आहे. पाणीटंचाईवर मात करण्यासाठी शासनाच्या प्रयत्नांसोबतच लोकसहभागही महत्त्वाचा ठरत आहे. याच सामाजिक बांधिलकीतून बेकरे गावातील तरुणांनी एकत्र येत जलसंधारणाच्या कामासाठी पुढाकार घेतला आहे. श्रमदानातून बंधारा उभारण्याचे काम करत पाणी अडविण्याचा स्तुत्य प्रयत्न या तरुणांनी केला आहे. पाणी हेच जीवन असून, भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी जलसंधारण करणे अत्यंत आवश्यक आहे. पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अडवून त्याचा उपयोग उन्हाळ्यात करता यावा, या उद्देशाने तरुणांनी एकत्र येत जलसंधारणाच्या कामात सहभाग नोंदविला. माथेरानच्या पायथ्याशी असलेल्या निसर्गरम्य परिसरातील बेकरे गावातील ओढ्याच्या पाण्याचा प्रवाह अडविण्यासाठी माती, दगड आणि पिशव्यांचा वापर करून बंधाऱ्याची निर्मिती करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या उपक्रमात तरुणांनी प्रत्यक्ष श्रमदान करत सामाजिक एकतेचा आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. केवळ प्रशासनावर अवलंबून न राहता नागरिकांनी स्वतः पुढाकार घेतल्यास अनेक प्रश्न मार्गी लागू शकतात, हे या उपक्रमातून अधोरेखित झाले आहे.

सह्याद्री वृक्षतोडीविरोधात रोहेकर आक्रमक

तात्काळ कठोर कारवाईची तहसीलदारांकडे मागणी



| चणेरा | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील भीमाशंकर अभयारण्य परिसरातील सह्याद्रीच्या घनदाट जंगलात टोरेंट पॉवर कंपनीकडून होणाऱ्या वृक्षतोडीच्या विरोधात रोहेकर जनता व पत्रकारांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. या वृक्षतोडीमुळे पश्चिम घाटातील जैवविविधतेला धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करत वृक्षतोडीला तात्काळ स्थगिती द्यावी.संपूर्ण प्रकरणाची चौकशी करावी आणि संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशा मागणीचे पत्र तहसीलदार डॉ. किशोर देशमुख यांना देण्यात आले.

भीमाशंकर अभयारण्य या परिसरात राज्यप्राणी शेकरू, बिबट्या, अस्वल यांसह अनेक दुर्मिळ वन्यजीव आणि वनस्पतींचे अस्तित्व आहे. अशा संवेदनशील वनक्षेत्रात टोरेंट पॉवर कंपनीच्या प्रस्तावित हायड्रो अथवा वीज पारेषण प्रकल्पासाठी हजारो वृक्षांची कत्तल सुरू असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. या वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडण्याबरोबरच वन्यजीवांच्या अधिवासावरही गंभीर परिणाम होऊ शकतो, अशी चिंता पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केली आहे.

यावेळी प्रेस क्लब अध्यक्ष डॉ. श्याम लोखंडे, आप्पा देशमुख, पर्यावरणप्रेमी राजेंद्र जाधव, सुहास खरीवले, महेंद्र मोरे, रघुनाथ कडू, बळीराजा फाऊंडेशनचे अध्यक्ष विठ्ठल मोरे, सागर जैन, महेश बामुगडे, शरद जाधव आदी उपस्थित होते.

६३ हजारांची ऑनलाईन फसवणूक

| पनवेल | प्रतिनिधी |

ऑर्डर केलेल्या कच्च्या मालाकरता जास्त पैसे दिल्याचे भासवून लिंक ओपन करण्यास सांगितली आणि मोबाईल हॅक करून ६३ हजार रुपयांची ऑनलाईन फसवणूक केल्याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला. यातील आरोपी डीटीडीसी कस्टमर केअर क्रमांकवरील इसमाने रोडपाली येथील फिर्यादी यांचा विश्वास संपादन केला आणि त्यांनी ऑर्डर केलेल्या कच्च्या मालाकरता जास्तीचे पैसे दिल्याचे भासवले आणि त्यांना व्हाट्सअप वरून लिंक पाठवली व ती लिंक ओपन केली असता फिर्यादी यांचा मोबाईल हॅक झाला आणि त्यांच्या गुगल पे मधील बँक खात्यातून ६३ हजार रुपये रक्कम काढून त्यांची फसवणूक केली.

सिडकोच्या नोडमध्ये पाणीकपातीचे वेळापत्रक जाहीर

| पनवेल | प्रतिनिधी |

■ काही भागांत एक दिवसाआड पाणीपुरवठा

नवी मुंबई आणि पनवेल परिसरातील सिडकोच्या कार्यक्षेत्रात पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्यासाठी सिडको प्रशासनाने नोडनिहाय पाणी कपातीचे वेळापत्रक जाहीर केले आहे. या निर्णयामुळे खारघर, कळंबोली, कामोठे, नवीन पनवेल, उलवे, तळोजा, करंजाडे आणि द्रोणागिरी परिसरातील नागरिकांना फटका बसणार आहे.

सिडकोने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार, दर आठवड्याला २४ तासांची नियोजित पाणी कपात करण्यात येणार आहे. त्यानुसार खारघर आणि नवीन पनवेल पूर्व येथे सोमवारी, उलवेच्या काही सेक्टरमध्ये मंगळवारी, नवीन पनवेल पश्चिम येथे मंगळवारी, कळंबोली येथे बुधवारी, करंजाडे येथे गुरुवारी, तर तळोजा, कळुंद्रे आणि कामोठे येथे शुक्रवारी पाणी कपात राहणार आहे.

दरम्यान, उलवे परिसरातील सेक्टर ८, ९, १० बी, १५ सी, १६, १७ आणि १८ यांसह शेलघर, बामणडोंगरी, न्हावा, शिवाजीनगर आणि न्हावा खाडी परिसरात एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. द्रोणागिरी परिसरातील विविध सेक्टर तसेच धुतुम, भेंडखळ, पागोटे, नवघर, नवघर पाडा, बोकडवीरा आणि कुंडे या गावांनाही या नियोजनाचा फटका बसणार आहे.



गव्हाणच्या आरोग्य केंद्राला संगणकाची भेट

| चिरनेर | प्रतिनिधी |

पनवेल तालुक्यातील गव्हाण येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कामकाजाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळावी, या उद्देशाने शेलघर येथील यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेच्या वतीने संगणकाची भेट देण्यात आली. शनिवारी (दि.३१) सुखकर्ता बंगल्यावर आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत यांच्या हस्ते वैद्यकीय अधिकाऱ्यांच्याकडे हा संगणक सुपूर्द करण्यात आला. यावेळी डॉ. अचला पाटील, डॉ. अस्मिता बोबटेकर, संजय गावडे, प्रवीण कोळी, अभिजीत खंडागळे, शेखर घरत, स्वप्निल पाटील, भक्ती पालकर आदी उपस्थित होते. याआधी महेंद्र घरत यांनी रायगड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या शाळांना ७०० संगणक तसेच गरजूंना शेकडो संगणक भेट दिले आहेत. यावेळी महेंद्र घरत यांनी गव्हाण आरोग्य केंद्राच्या समितीचा अध्यक्ष म्हणून मी दहा वर्षांपूर्वी काम सांभाळले असल्याचे सांगून, शिस्तबद्ध कारभारसह रुग्णांच्या विनामूल्य उपचारांवर भर दिला होता. आता या आरोग्य केंद्राची नवीन इमारत बांधण्यासाठी माझे प्रयत्न सुरू असल्याचे ते म्हणाले.

अपघातात दोघेजण जखमी

| पनवेल | प्रतिनिधी |

टाटा सुमो जीप आणि मोटरसायकलच्या अपघातात दोघेजण जखमी झाले. या अपघाताप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात टाटा सुमो जीप चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला.

टाटा सुमो जीप वरील चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने चालवून सुखदेव माने यांच्या मोटरसायकलला नवकार कंपनी जवळील रस्त्यावर, कोनगाव येथे धडक दिली. यात सुखदेव माने आणि त्यांचा मित्र हे दोघेही गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर कोपरखैरणे येथील माथाडी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत.

उरणला दुष्काळग्रस्त यादीतून वगळल्याने शिवसेनेचा संताप

| चिरनेर | प्रतिनिधी |

महाराष्ट्रात दुष्काळाचे सावट असताना, रायगड जिल्ह्यात भात उत्पादक शेतकऱ्यांना हवामान बदलाचा मोठा फटका बसला आहे. रायगड जिल्ह्यातील काही तालुक्यांचा दुष्काळग्रस्त म्हणून समावेश केला असताना, उरण तालुक्याला वगळण्यात आल्याने येथील शेतकऱ्यांकडून संताप व्यक्त होत आहे. या निर्णयाचा ठाकरे शिवसेना पक्षाने तीव्र निषेध केला आहे.

उरण तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी. या मागणीसाठी २२ ऑक्टोबर रोजी शिवसेना पक्षाचे जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहर भोईर यांच्या नेतृत्वाखाली उरण तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. यावेळी तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांनी उरण तालुका दुष्काळग्रस्त घोषित करण्याबाबत वरिष्ठ पातळीवर अहवाल पाठविण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, शासनाच्या नव्या पत्रकातही उरणचा समावेश नसल्याने शेतकऱ्यांच्या या दुष्काळी गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप शिवसेनेने केला आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींनी या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देऊन शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी शिवसेने केली आहे. दरम्यान शिवसेना उरण तालुकाप्रमुख संतोष ठाकूर यांनी शासन आणि स्थानिक प्रशासनाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देऊन उरणचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करावा, अशी मागणी त्यांनी यावेळी पक्षातर्फे केली आहे.

आंबेवाडी येथे दुचाकीची चोरी

| कोलाड | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील आंबेवाडी समर्थ नगर येथून घरासमोर उभी केलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली असून, याप्रकरणी कोलाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोलाड पोलीस ठाण्यातून मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवार, दि.३० ऑक्टोबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास अनिल यशवंत ओव्हाळ यांच्या राहत्या घरासमोर उभी करून ठेवलेली होंडा कंपनीची काळ्या रंगाची युनिकॉर्न मोटारसायकल नं.एम. एच.०६,सी.ए.२६४० ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली. याविषयी कोलाड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून, सपोनि भारत फार्णे यांच्या मार्गदर्शखाली तपास सुरू आहे.

| रोहा | प्रतिनिधी |

रोह्यातील वाहतुकीची कोंडी फुटणार



यंदाच्या जून महिन्यात पडलेल्या मुसळधार पावसामुळे आलेल्या महापुरात रोहा-धाटाव मार्गावरील दमखाडी नाक्यावरील जयराम मार्केटसमोरील मुख्य नाला खचल्याची दुर्दैवी घटना घडली होती. नाल्याचे काम प्रलंबित असल्याने अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत असे. सध्या या नाल्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून, रस्त्याचे काम पूर्ण होताच रोहा-धाटाव मार्गावरील वाहतुकीचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

दमखाडी येथील जयराम मार्केट या व्यापारी आणि रहिवासी संकुलासमोरील मुख्य नाला मुसळधार पावसात जमीनदोस्त झाल्याची घटना घडली. या घटनेनंतर सदर नाल्याचे काम अनेक महिन्यांपासून प्रलंबित असल्याने दुकान मालक, ग्राहक व नागरिकांची गैरसोय होत असे. सदरचे काम तातडीने मार्गी लावण्याची मागणी जनतेतून जोर धरत आहेत.



चिमुकल्यांनी साकारले आकाशकंदील

पणती सजावट कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

| खांदेश्वर | प्रतिनिधी |

दिवाळीचा सण जसजसा जवळ येत आहे, तसतशी सर्वत्र सणाची लगबग सुरू झाली आहे. घराघरांत दिवाळीच्या तयारीला वेग आला असून, लहान मुलांमध्येही आकाशकंदील तयार करण्याचा उत्साह पाहायला मिळत आहे. याच उत्साहाला कलात्मकतेची जोड देण्यासाठी पनवेल कल्चरल सेंटरच्या वतीने लहान मुलांसाठी आकाशकंदील निर्मिती आणि पणती सजावट कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेला लहान मुलांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. केवळ तयार आकाशकंदील विकत न घेता तो स्वतःच्या हाताने कसा तयार करायचा, याचे प्रात्यक्षिक मुलांना देण्यात आले. रंगीत कागद, आकर्षक सजावटीचे साहित्य आणि विविध कलात्मक वस्तूंच्या मदतीने मुलांनी वेगवेगळ्या आकारांचे आणि प्रकारांचे आकाशकंदील तयार केले. आकाशकंदील तयार करताना मुलांच्या कल्पकतेला वाव मिळाला. तसेच मातीच्या साध्या पणत्यांना रंग, नक्षीकाम आणि विविध सजावटीच्या साहित्याच्या माध्यमातून आकर्षक रूप कसे द्यायचे, याचेही मार्गदर्शन करण्यात आले. मुलांनी स्वतःच्या हाताने पणत्या सजवून आपल्या कलागुणांचे दर्शन घडवले.

आठ तुकड्यांची किंमत तब्बल दहा हजार रुपये | शुगर फ्री मिठाईलाही मोठी पसंती

सोन्याचा वर्ख असलेल्या मिठाईची क्रेझ

| खांदेश्वर | प्रतिनिधी |

दिवाळीचा सण जसजसा जवळ येत आहे, तसतशी पनवेलमधील बाजारपेठेत खरेदीची लगबग वाढू लागली आहे. दिवाळी म्हटले की फराळ, फटाके, आकाशकंदील आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मिठाईचा गोडवा. यंदाच्या दिवाळीसाठी मिठाईच्या बाजारपेठेतही मोठी तयारी करण्यात आली असून, पारंपरिक मिठाईपासून ते आकर्षक आणि महागड्या प्रीमियम मिठाईपर्यंत अनेक प्रकार ग्राहकांच्या भेटीला आले आहेत.

यंदाच्या दिवाळीत सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे ती म्हणजे सोन्याचा वर्ख लावलेली खास मिठाई. या मिठाईची आकर्षक सजावट आणि



वेगळेपण ग्राहकांना भुरळ घालत आहे. विशेष म्हणजे, या मिठाईच्या केवळ आठ तुकड्यांच्या डब्याची किंमत सुमारे दहा हजार रुपयांच्या घरात आहे. त्यामुळे मिठाईच्या बाजारपेठेत सध्या या महागड्या मिठाईची विशेष चर्चा रंगू लागली आहे. काही ठिकाणी लाखो रुपयांच्या किमतीचे विशेष मिठाईचे प्रकारही ग्राहकांसाठी उपलब्ध करण्यात आले आहेत. दुसरीकडे, दिवाळीच्या निमित्ताने कंपन्या, कॉर्पोरेट कार्यालये आणि व्यावसायिक आस्थापनांमध्ये कर्मचारी, अधिकारी तसेच व्यावसायिक भागीदारांना मिठाई भेट देण्याची परंपरा आहे. हीच गरज ओळखून आकर्षक सजावट असलेले विविध प्रकारचे गिफ्ट पॅक बाजारात दाखल झाले आहेत. छोट्या बॉक्सपासून ते प्रीमियम गिफ्ट हॅम्परपर्यंत अनेक पर्याय उपलब्ध आहेत. बदलत्या जीवनशैलीचा विचार करून यंदा शुगरफ्री मिठाईलाही विशेष महत्त्व मिळत आहे. मधुमेह असलेल्या व्यक्तींसह साखरेचे प्रमाण नियंत्रित ठेवणाऱ्या ग्राहकांसाठी शुगरफ्री मिठाईचे पर्याय उपलब्ध झाले आहेत. त्याचबरोबर पारंपरिक साखरेच्या मिठाईलाही ग्राहकांकडून पसंती मिळत आहे.

काजू कतली, बदाम बर्फी, पिस्ता रोल, ड्रायफ्रूट मिठाई, मोतीचूर लाडू, बंगाली मिठाई अशा विविध प्रकारांनी मिठाईची दुकाने सजली आहेत. रंग, आकार, चव आणि आकर्षक पॅकिंग यामुळे ग्राहकांचे लक्ष दुकानांकडे वेधले जात आहे. काही कंपन्यांकडून तर दिवाळीच्या भेटवस्तूंच्या ऑर्डरची पूर्तता करण्यासाठी आतापासूनच मिठाईचे गिफ्ट पॅक पाठविण्यास सुरुवात झाली आहे. दिवाळीच्या निमित्ताने एखाद्याच्या घरी मिठाईचा डबा पोहोचवणे म्हणजे केवळ गोड पदार्थ देणे नव्हे, तर नात्यांमधील आपुलकी आणि आनंदाची देवाणघेवाण करणे होय. काळ बदलला, मिठाईचे प्रकार बदलले, पॅकिंगचे स्वरूप बदलले; मात्र दिवाळीच्या गोडव्याची परंपरा आजही कायम आहे. महागड्या सोन्याच्या वर्खापासून ते घरगुती चवीच्या पारंपरिक मिठाईपर्यंत सर्वच पर्यायांनी पनवेलची बाजारपेठ सजली असून, यंदाची दिवाळी मिठाईच्या गोडव्याने खास होणार आहे.

व्यर्थ गेला तुका...

नाशिकमध्ये शनिवारी म्हणे एक विश्वविक्रम झाला. सिंहस्थाच्या निमित्ताने झालेल्या गोदावरीच्या आरतीत तब्बल ६५०० आदिवासी लोकांचा सहभाग नोंदवण्यात आला. पेठ, सुरगणा, त्र्यंबकेश्वर, दिंडोरी, निफाड या तालुक्यातील ६५० आदिवासी पाड्यांमधून या लोकांना जमा करण्यात आले. त्यांना गेल्या तीन महिन्यांपासून या आरतीचे प्रशिक्षण दिले जात होते. गंमत म्हणजे या आरतीखेरीज स्थानिक पुरोहित संघाच्या स्वतःच्या दोन आरत्या झाल्या. म्हणजे आदिवासींची आरती ही खरी नव्हतीच. तो एक इव्हेंटचा भाग होता. याच नाशिक शहरामध्ये एक महिन्यापूर्वी याच तालुक्यातले तरुण आदिवासी उपोषणाला बसले होते. आश्रमशाळांची स्थिती सुधारावी, सेंट्रल किचन बंद करावे, शिष्यवृत्त्या वेळेत मिळाव्यात वगैरे त्यांच्या मागण्या होत्या. नंतर हेच तरुण मुंबईला पदयात्रेने गेले. तिथेही त्यांनी धरणे आंदोलन केले. आदिवासी मंत्र्यांचा राजीनामा मागितला. अजूनही त्यांच्या अनेक मागण्या पूर्ण झालेल्या नाहीत. शनिवारचा सोहळा म्हणजे त्याच आदिवासींना हिंदू धर्मामध्ये गुंडाळण्याची घाईगर्दी होती. पुढचे वर्षभर सिंहस्थ कुंभमेळा चालणार आहे. त्याच्या धर्मध्वजाची स्थापना शनिवारी नाशिक व त्र्यंबकेश्वरात झाली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना या सोहळ्याचे खास निमंत्रण होते. मोदी सरकारच्या काळात हिंदूंचे बारीकसारीक सण किंवा उत्सवही इव्हेंट म्हणून साजरे करण्याची पध्दत रूढ झाली आहे. सरकार आणि भाजपवाले याकडे हिंदूंचे शक्तीप्रदर्शन म्हणून पाहतात. या निमित्ताने आपली व्होट बँक मजबूत करून घेणे हा त्यातला मुख्य उद्देश असतो. यातही सोईस्करपणे हिंदू सगळे एक असा नारा दिला जातो. अयोध्येत राममंदिराचे उद्घाटन झाले तेव्हा सगळा फोकस मोदींवर होता. संसदेच्या नवीन इमारतीचे उद्घाटन झाले तेव्हाही ते मोदींनीच केले. वास्तविक तो कार्यक्रम देशाच्या पहिल्या नागरिक व घटनात्मक प्रमुख म्हणून राष्ट्रपतींच्या हस्ते व्हायला हवा होता. पण तिथे त्यांना बोलावणेही नव्हते. त्या महिला व आदिवासी असल्याने हे निमंत्रण टाळले गेले असा अनेकांचा अंदाज आहे. दुसरीकडे सिंहस्थाच्या ध्वजारोहणासारख्या दुय्यम आणि तद्दन धार्मिक कार्यक्रमाला मात्र राष्ट्रपतींना बोलावले गेले. मुर्मू या आदिवासी समाजातील आहेत. आदिवासी हे खरे तर हिंदू सनातन धर्मपरंपरा मानत नाहीत. त्यांचे देव, धर्म, कर्मकांडे हे निराळे आहे. मात्र देशभरातील आदिवासी आणि दलितांना आपल्या हिंदू चौकटीत बसवण्याचे भाजपचे जोरदार प्रयत्न गेली काही वर्षे चालू आहेत. कुंभ मेळ्याच्या निमित्ताने ती पर्वणी साधण्यात आली.

दुष्काळाची तरी लाज बाळगा

आता पुढचे बारा महिने सतत काही ना काही कार्यक्रमांनी हा परिसर दुमदुमत राहील. स्वतःला संतमहंत म्हणवणारे लोक भारतभरातून इथे येतील. नाशिक शहर आणि लगतच्या परिसराची लोकसंख्या २५ लाख असावी असा अंदाज आहे. शहर म्हटले तरी ते एक मोठे झालेले गावच आहे. तिथे खूप मोठ्या शहरांसारख्या सुविधा नाहीत. तरीही तेथे कुंभाची पर्वणी साधायला भारतभरातून कोट्यवधी लोक येतील. गोदावरीत आंघोळी करून पुण्य पदरात पाडून घेतील. एकीकडे महाराष्ट्रात गेल्या पन्नास वर्षांत पडला नाही असा दुष्काळ आहे. पाण्याची भीषण टंचाई आहे. खुद्द नाशिक जिल्ह्यातले जवळपास सर्व तालुके दुष्काळग्रस्त जाहीर झाले आहेत. धरणांमध्ये तूर्त पाणी असले तरी ते खाली ज्या मराठवाड्यात जाते तिथे पाण्याच्या एकेका थेंबासाठी मारामारी होणार आहे. अनेक शहरांना आठ-दहा दिवसांतून एकदा पाणीपुरवठा सुरू आहे. शेती बुडाली आहे. खरीप वाया गेला आहे. रब्बीमध्ये पेरणी करणेही शक्य नाही.चे निव्वळ जगण्यासाठी लोकांना बाहेर पडावे लागणार आहे. या कशाचीही पर्वा न करता नाशिकमध्ये थाटामाटात कुंभाचे सोहळे होणार आहेत. कालच्या निव्वळ ध्वजस्थापनेच्या सोहळ्यावर कोट्यवधींचा खर्च झाला. सोहळा संपेपर्यंत हा खर्च हजारो कोटींच्या घरात जाईल. तिकडे शेतकऱ्यांना मात्र पाच हजार मदत देताना देखील हजारो अटी घातल्या जातील. शनिवारी राष्ट्रपती येणार म्हणून रस्ते रोखले गेले. त्र्यंबकेश्वरमध्ये आलेल्या भाविकांना याची काहीच कल्पना नव्हती. त्यामुळे त्यांना दिवसभर आहे त्याच जागी डांबून ठेवले गेले. नाशिकमध्येही संचारबंदीसारखी स्थिती होती. पुढच्या काळात वेळोवेळी इथे मोदी, शहा, योगी आणि इतर असंख्य तथाकथित व्हीआयपी येतील. ते आले की रस्ते आणि सगळे व्यवहार बंद केले जातील. म्हणजे भाजपचा सरकारी खर्चाने प्रचार होईल आणि स्थानिक नागरिकांचे मात्र मरण ओढवेल.

हे म्हणे आध्यात्म...

भारतीय आध्यात्मामध्ये मनाशी संवादाला फार महत्व आहे. एकांतात एकट्याने परमेश्वराचे चिंतन करणे ही सर्वोच्च साधना मानलेली आहे. सार्वजनिक रीतीने उत्सव साजरे करणे, महाआरत्या किंवा भजने म्हणत, गोंगाट करणे याचा धर्माला फायदा असेल, माणसाला आध्यात्मिक फायदा होत नाही. सध्या देशात हिंदुत्ववादी सरकार आहे. पण आध्यात्माची अस्सल हिंदू भूमिका डावलून आता गोंगाट आणि आडदांड उत्सवालाच महत्व आलेले आहे. कुसुमाग्रजांनी आपल्या प्रसिध्द सिंहस्थ या कवितेत म्हटल्याप्रमाणे, रस्तोरस्ती साठे/ बैराग्यांचा ढीग/दंभ शिगोशीग/तुडुंबला/ असे दृश्य पुढील वर्षभर पाहावे लागणार आहे. अशा कुंभमेळ्यावर महाराष्ट्रात तुकाराम महाराजांपासून ते गाडगेमहाराजांपर्यंत अनेकांनी तीक्ष्ण प्रहार केले आहेत. असल्या कर्मकांडांना नाकारणे ही मराठीची वेगळी बुध्दीवादी परंपरा आहे. पण मराठी लोक आता हिंदी गायपट्ट्याच्या मागे चालले आहेत. किंवा त्यांनी तसे जावे असा भाजपचा प्रयत्न आहे. वारकरी परंपरेत पूर्ण पायी चालून पंढरपुरात गेले तरी तिथून देवळाच्या कळसाचे दर्शन घेऊन माघारी फिरणारे अनेक जण आहेत. विठ्ठलाचे दर्शन झाल्याखेरीज किंवा चंद्रभागेत आंघोळ केल्याखेरीज पुण्य मिळत नाहीत असल्या कल्पना ते मानत नाहीत. मात्र आता या खऱ्या मराठी हिंदू आध्यात्मिक परंपरेला गोदावरीत बुडवण्याचे काम चालू आहे. पुढच्या वर्षात नाना प्रकारचे साधू येतील. यातले बहुसंख्य केवळ नावालाच संतमहंत असतील. भाले खड्ग हाती/नाचती गोसावी/म्हणे वाट यांस पुसावी/अध्यात्माची/यांच्या लंगोटीला/झालर मोत्याची/चिलीम सोन्याची/त्यांच्यापाशी/असे त्यांचे वर्णन कुसुमाग्रजांनी करून ठेवले आहे. पहिली आंघोळ कोणी करायची, पहिली दिंडी कोणाची यांच्यावरून हाणामारी करणारे हे तथाकथित साधू म्हणजे निव्वळ गुंड असतात. एरवी त्यांच्यावर पोलिसी कारवाईच व्हायला हवी. पण मोदी आणि फडणवीसांच्या हिंदूराज्यात त्यांना पूर्ण संरक्षण दिले जाईल. कोट्यवधी लोक येत असल्याने नाशिकच्या रस्त्यारस्त्यांवर प्रचंड घाण होत असते. कचरा व पर्यावरणाची हानी होते. हे सगळे धर्माच्या नावाखाली सहन केले जात असते. यंदा निदान दुष्काळी स्थिती लक्षात घेऊन याचा आकार कमी करता आला असता. किंवा कुंभ मेळा रद्द करता आला असता किंवा दुसऱ्या जागी भरवता आला असता. पण तसे नुसते कोणी सुचवले तरी आमच्या भावना दुखावल्या म्हणून हे लोक बोंब ठोकतील. वास्तविक दुष्काळात जे मरणार आहेत ते हिंदू आणि याच देशाचे नागरिक आहेत. त्यांच्या हिताची काळजी घेणे हा खरा धर्म आहे, हे सांगणारी शेकडो वचने वेदांपासून आपल्या धर्मग्रंथांमध्येही आढळतील. पण सध्या भाजपला वेगळाच हिंदू आणि वेगळेच हिंदूराष्ट्र घडवायचे आहे. कुसुमाग्रजांनी त्या कवितेत म्हटल्याप्रमाणे खरोखर....

व्यर्थ गेला तुका/ व्यर्थ ज्ञानेश्वर/ संतांचे पुकार/ वांझ झाले.

विचार

दुटप्पी ट्रम्पची पुतीन यांच्यापुढे नांगी

स्वतःच्या देशातील इंधनदर कमी करण्यासाठी रशियाशी व्यवहार करणाऱ्या अमेरिकेने इतर देशांवर मात्र रशियन तेल खरेदीबाबत दबाव आणणे हा आंतरराष्ट्रीय राजकारणातील दुटप्पीपणाचा नमुना आहे. युक्रेन युद्ध, आर्थिक निर्बंध, ऊर्जा सुरक्षा आणि अमेरिकेतील मध्यावधी निवडणुका यांच्या कचाट्यात सापडलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांच्या निर्णयातून 'अमेरिका फर्स्ट' या धोरणाचा खरा अर्थ पुन्हा एकदा स्पष्ट झाला आहे.



प्रा. जयसिंग यादव

आंतरराष्ट्रीय राजकारणात तत्त्वे, नैतिकता आणि लोकशाही मूल्ये यांना महत्त्व असल्याचे वारंवार सांगितले जाते; मात्र प्रत्यक्ष व्यवहारात आर्थिक हितसंबंध आणि राजकीय गरजा प्रबळ झाल्या, की ही तत्त्वे किती सहज बाजूला ठेवली जातात, याचे उदाहरण अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या ताज्या निर्णयातून समोर आले आहे. रशिया-युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर रशियावर आर्थिक निर्बंध लादणाऱ्या आणि रशियन तेल खरेदी करणाऱ्या देशांवर शुल्क लादण्याची भूमिका घेणाऱ्या अमेरिकेने आता स्वतःच रशियन डिझेलच्या खरेदीसाठी निर्बंध शिथिल करण्याचा निर्णय घेतला आहे. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर ट्रम्प यांनी ही घोषणा केली. हा निर्णय केवळ इंधन व्यापारापुरता मर्यादित नसून अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणातील विसंगती, आर्थिक स्वार्थ आणि निवडणुकीच्या राजकारणाचे दर्शन घडवणारा आहे. अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेसाठी इंधनाच्या किमती हा संवेदनशील विषय आहे. वाहतूक, उत्पादन, शेती आणि दैनंदिन जीवनातील खर्चावर इंधनदरांचा थेट परिणाम होतो. पेट्रोलियम उत्पादनांच्या किमती वाढल्या, की महागाईचा दबाव वाढतो आणि त्याचा परिणाम सरकारच्या लोकप्रियतेवरही होतो. सध्या इराणशी सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेला इंधनाच्या वाढत्या किमतींचा सामना करावा लागत असल्याचे वृत्त आहे. त्यातच नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या मध्यावधी निवडणुकांची पार्श्वभूमी असल्यामुळे इंधनदर कमी ठेवणे ट्रम्प प्रशासनासाठी राजकीयदृष्ट्या महत्त्वाचे ठरले आहे. त्यामुळे रशियासारख्या मोठ्या ऊर्जा उत्पादक देशाशी व्यवहार करण्याचा निर्णय घेण्यात आला, अशी शक्यता दिसते.

या निर्णयामुळे ट्रम्प यांच्या धोरणातील विरोधाभास ठळकपणे समोर आला आहे. रशिया-युक्रेन युद्ध थांबवण्याची भूमिका मांडणारे ट्रम्प रशियाच्या ऊर्जाक्षेत्रावर निर्बंध कायम ठेवण्याच्या आंतरराष्ट्रीय धोरणाचा भाग होते. रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या देशांवर दबाव आणण्याची भूमिकाही अमेरिकेने घेतली. भारतासारख्या देशांच्या रशियाशी असलेल्या ऊर्जा व्यापारावरही या धोरणाचे सावट पडले; परंतु आता अमेरिकेच्या स्वतःच्या गरजा निर्माण झाल्यानंतर रशियन डिझेलच्या खरेदीसाठी मार्ग मोकळा केला जात असल्याचे चित्र आहे. स्वतःच्या गरजेसाठी अपवाद निमाण करायचा आणि इतर देशांकडून मात्र कठोर निर्बंधांचे पालन अपेक्षित धरायचे, हा आंतरराष्ट्रीय व्यवहारातील दुहेरी निकष ठरतो. अमेरिकेने रशियावर लादलेल्या निर्बंधांचा प्रमुख उद्देश त्याच्या अर्थव्यवस्थेवर दबाव आणणे आणि युक्रेनविरुद्ध सुरू असलेल्या युद्धासाठी आवश्यक आर्थिक संसाधने मर्यादित करणे हा आहे. तेल आणि नैसर्गिक वायूची निर्यात हा रशियाच्या उत्पन्नाचा महत्त्वाचा स्रोत असल्यामुळे ऊर्जा व्यापारावर निर्बंध लादण्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले. रशियाच्या ऊर्जा उत्पन्नावर मर्यादा आणल्यास त्याच्या युद्धखर्चावर परिणाम होईल, असा या धोरणामागील तर्क होता; मात्र जागतिक अर्थव्यवस्थेतील परस्परावलंबनामुळे निर्बंधांची अंमलबजावणी सोपी नसते. रशिया हा मोठ्या प्रमाणात ऊर्जा उत्पादन करणारा देश आहे. त्याच्या तेल आणि पेट्रोलियम उत्पादनांचा जागतिक पुरवठ्यात महत्त्वाचा वाटा आहे. अशा देशाच्या निर्यातीवर निर्बंध आणल्यास बाजारातील पुरवठा कमी होऊ शकतो. परिणामी, इंधनाच्या किमती वाढण्याची शक्यता असते. या वाढीचा फटका केवळ रशियाला नव्हे, तर ऊर्जा आयातीवर अवलंबून असलेल्या अनेक देशांनाही बसतो.

युक्रेनमधील युद्धामुळे रशियाच्या काही तेलशुद्धीकरण प्रकल्पांवर हल्ले झाल्याच्या बातम्या आहेत. त्याचबरोबर पश्चिम आशियातील संघर्षामुळे ऊर्जा पुरवठ्याबाबत अनिश्चितता वाढली आहे. या परिस्थितीत जागतिक बाजारपेठेत डिझेलचा पुरवठा आणि किमती यांचा प्रश्न अधिक गंभीर बनतो. त्यामुळे अमेरिकेला रशियन डिझेलची गरज भासणे हे पूर्णपणे अनपेक्षित नाही; परंतु गरज निर्माण झाली म्हणून पूर्वीच्या निर्बंधांच्या धोरणातील विसंगतीकडे दुर्लक्ष करता येणार नाही. ट्रम्प यांनी रशियाकडून तातडीने तीन लाख टनांपेक्षा अधिक डिझेल पुरवठ्याची घोषणा केली आहे. त्यानंतर नोव्हेंबरमध्ये पाच लाख टन आणि पुढील टप्प्यात आणखी दहा लाख टन डिझेल पुरवठ्याचा उल्लेख करण्यात आला. पुढे रशियाच्या तेलशुद्धीकरण प्रकल्पांची परिस्थिती लक्षात घेऊन आणखी तीस लाख टन डिझेल पुरवण्याची घोषणाही करण्यात आल्याचे वृत्त आहे. या आकडेवारीतील टप्पे, कालमर्यादा आणि एकूण पुरवठ्याचे स्वरूप यांची अधिकृत कागदपत्रांवरून पडताळणी आवश्यक असली, तरी या घोषणेमुळे अमेरिका आणि रशिया यांच्यात ऊर्जा व्यापाराबाबत व्यवहार्य सहकार्याचा मार्ग खुला होत असल्याचे दिसते. अमेरिकेच्या वित्त विभागाने रशियात उत्पादित डिझेलच्या विक्री, वितरण, उतराई आणि आयातीशी संबंधित काही व्यवहारांना ७ एप्रिल २०२७ पर्यंत परवानगी दिल्याचे वृत्त आहे. या निर्णयामुळे निर्बंधांच्या अंमलबजावणीत तात्पुरती सूट मिळत असेल, तर त्याचा उद्देश आणि व्याप्ती स्पष्ट होणे आवश्यक आहे. ताजी सूट सर्व प्रकारच्या रशियन तेल व्यापाराला लागू आहे, की विशिष्ट डिझेल व्यवहारांपुरती मर्यादित आहे, यातील फरकही महत्त्वाचा आहे. कारण निर्बंधांमध्ये मर्यादित सवलत देणे आणि रशियावरील संपूर्ण ऊर्जा निर्बंध उठवणे या दोन वेगळ्या बाबी आहेत. 'अमेरिका फर्स्ट' हा ट्रम्प यांच्या राजकारणाचा केंद्रबिंदू राहिला आहे. अमेरिकेचे आर्थिक हित, रोजगार, औद्योगिक उत्पादन आणि नागरिकांच्या खर्चाला प्राधान्य देणे, हा या भूमिकेचा मुख्य दावा आहे. या दृष्टीने पाहिले तर इंधनदर कमी करण्यासाठी स्वस्त किंवा सहज उपलब्ध होणाऱ्या डिझेलचा पुरवठा मिळवण्याचा प्रयत्न त्यांच्या धोरणाशी सुसंगत वाटू शकतो. कोणत्याही सरकारने आपल्या नागरिकांच्या आर्थिक हिताचे रक्षण करणे चुकीचे नाही; परंतु प्रश्न अमेरिकेने रशियाकडून डिझेल खरेदी करावे की करू नये, एवढाच नाही. प्रश्न असा आहे की, अमेरिकेने स्वतःच्या हितासाठी ज्या देशाशी व्यवहार केला, त्याच देशाशी व्यापार करणाऱ्या इतर राष्ट्रांवर दबाव आणण्याचा नैतिक आणि राजनैतिक अधिकार ती कसा वापरणार? भारतासारख्या देशांनी आपल्या ऊर्जा गरजा, देशांतर्गत महागाई आणि आर्थिक स्थैर्य लक्षात घेऊन रशियाकडून तेल खरेदी केल्यास त्यांच्यावर निर्बंध किंवा अतिरिक्त शुल्क लादण्याची धमकी द्यायची आणि स्वतःच्या बाजारपेठेत इंधनाची गरज भासल्यावर रशियाशी व्यवहार करायचा, ही भूमिका विश्वासार्हतेला धक्का देणारी आहे.

आंतरराष्ट्रीय व्यापारात प्रत्येक देशाला आपले हित जपण्याचा अधिकार आहे. भारतासारख्या विकसनशील देशासाठी स्वस्त ऊर्जा मिळवणे हे केवळ व्यापारी गणित नसते. त्याचा संबंध महागाई, उद्योगांची स्पर्धात्मकता, वाहतूक खर्च आणि कोट्यवधी नागरिकांच्या जीवनमानाशी असतो. त्यामुळे ऊर्जा व्यापाराबाबत एकाच प्रकारचे निकष सर्व देशांना लागू केले जातील, अशी अपेक्षा करणे रास्त आहे. निर्बंध लादणाऱ्या देशाने स्वतःसाठी अपवाद निर्माण केला, तर त्या निर्बंधांच्या वैधतेवर आणि विश्वासार्हतेवर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. ट्रम्प यांच्या निर्णयाकडे अमेरिकेतील अंतर्गत राजकारणाच्या संदर्भातही पहावे लागेल. मध्यावधी निवडणुकांमध्ये सत्ताधारी पक्षाच्या कामगिरीचे मूल्यमापन करताना मतदार महागाई, रोजगार, घरगुती खर्च आणि इंधनाच्या किमती यांसारख्या मुद्द्यांना प्राधान्य देतात. इंधनदर वाढल्याचा परिणाम नागरिकांच्या दैनंदिन खर्चावर तातडीने जाणवतो. त्यामुळे इंधनाचा पुरवठा वाढवून किमतींवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न राजकीयदृष्ट्या फायदेशीर ठरू शकतो. यामुळेच रशियाशी झालेल्या व्यवहारावर अमेरिकेतील काही राजकीय नेत्यांनी टीका केली आहे. डेमोक्रॅटिक पक्षाचे सिनेटर रिचर्ड ब्लुमेंथल यांनी रशियन डिझेलवरील निर्बंध शिथिल करण्याच्या निर्णयाला निर्लज्जपणा म्हटले आहे. त्यांच्या मते, अशा निर्णयामुळे युक्रेनविरुद्धच्या युद्धात रशियाला आर्थिक मदत मिळू शकते. त्यांनी या व्यवहाराला विरोध करत निर्बंधांबाबत काँग्रेसने व्यक्त केलेल्या भूमिकेशी हा निर्णय विसंगत असल्याचा आरोप केला आहे. या टीकेमागील मुद्दा दुर्लक्षित करता येणार नाही. रशियाला डिझेल विक्रीतून मिळणारे उत्पन्न त्याच्या अर्थव्यवस्थेला हातभार लावू शकते. त्यातून युद्धासाठी संसाधने उपलब्ध होण्याची शक्यता नाकारता येत नाही; मात्र एखाद्या व्यवहारातून रशियाला नेमका किती आर्थिक लाभ होईल आणि त्याचा युद्धखर्चावर किती परिणाम होईल, हे ठरवण्यासाठी अधिक माहिती आवश्यक आहे. राजकीय आरोप आणि आर्थिक परिणाम यांची सरमिसळ न करता अशा निर्णयाचे स्वतंत्र मूल्यमापन करणे गरजेचे आहे.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

चर्चा आजची

पाण्याचा प्रत्येक थेंब अनमोल

राकेश लोहार

यंदा पावसाने लवकरच माघार घेतली आणि त्याचे परिणाम आतापासूनच जाणवू लागले आहेत. अनेक भागांत पाणीपुरवठ्यावर मर्यादा आल्या असून, काही ठिकाणी एक दिवसाआड पाणी देण्याची वेळ प्रशासनावर आली आहे. अजून उन्हाळ्याला सुरुवातही झालेली नाही, तोच विहिरी, तलाव आणि धरणांमधील पाणीसाठा खालावू लागला आहे. ही परिस्थिती केवळ पाणीटंचाईची पूर्वसूचना नाही, तर येणाऱ्या काळातील मोठ्या संकटाची नांदी आहे. पाणी नसेल तर शेतीपासून उद्योगापर्यंत आणि घरापासून पर्यटनापर्यंत सर्वच व्यवहार ठप्प होऊ शकतात, याची जाणीव आतापासूनच होणे गरजेचे आहे.

खरे तर पाणी हे केवळ निसर्गाने दिलेले साधन नाही, तर मानवी जीवनाचा आधार आहे. माणसाला जगण्यासाठी अन्नाइतकेच पाणी आवश्यक आहे. मात्र, पाण्याचे महत्त्व माहीत असूनही त्याचा वापर करताना आपण किती बेफिकीर आहोत, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. पावसाने लवकर निरोप घेतल्याने सर्वप्रथम फटका बसणार आहे तो शेतीला. भातशेतीतील दाणे भरण्याच्या महत्त्वाच्या टप्प्यावर पाण्याची कमतरता निर्माण झाल्याने दाणे भरण्याऐवजी पळींज राहण्याची भीती आहे. काही ठिकाणी पिके उभी असतानाच करपली असून, ती कापण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. त्यामुळे केलेली मेहनत, बियाणे, खते, औषधे आणि मजुरीचा खर्च वाया जाण्याची शक्यता आहे. उत्पादन घटले की उत्पन्न घटणार आणि आधीच आतबट्ट्याचा ठरलेला शेतीचा व्यवसाय आणखी तोट्यात जाणार. निसर्गाच्या लहरीपणापुढे शेतकरी पुन्हा एकदा हतबल होणार आहे.

याचा परिणाम केवळ भातशेतीपुरता मर्यादित राहणार नाही. आंबा आणि काजू यांसारख्या फळपिकांना मोहर येण्यासाठी विशिष्ट प्रकारचे हवामान आवश्यक असते. यंदा थंडीचे प्रमाण कमी राहिल्यास या पिकांच्या मोहरावर आणि पर्यायाने उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. नारळ, सुपारीच्या बागांना उन्हाळ्यात पाणी देणे बागायतदारांसमोर मोठे आव्हान ठरणार आहे. आताच विहिरी आणि तलावांची पातळी खालावत असेल, तर मार्च-एप्रिलमध्ये काय परिस्थिती असेल, याची कल्पनाच न केलेली बरी. शेती आणि बागायती संकटात आल्या तर शेतकऱ्यांसह शेतमजुरांच्या रोजगारावरही त्याचा परिणाम होईल.

दुसरीकडे, पाणीटंचाईचा फटका बांधकाम व्यवसायालाही बसू शकतो. वीटभट्ट्यांना पाणी आवश्यक असते. बांधकामांसाठीही मोठ्या प्रमाणावर पाणी लागते. पाण्याअभावी वीटभट्ट्या बंद पडल्या किंवा बांधकामे रखडली, तर त्यावर अवलंबून असलेल्या मजुरांचा रोजगार हिरावला जाईल. नवीन घर बांधण्याचे स्वप्न पाहणाऱ्यांची स्वप्ने लांबणीवर पडतील. पर्यटन व्यवसायाचेही असेच आहे. पर्यटकांना निवास, स्वच्छता, भोजन आणि इतर सुविधांसाठी पाणी आवश्यक असते. पाण्याची उपलब्धता नसेल तर पर्यटन व्यावसायिकांना व्यवसाय चालवणे कठीण होईल. परिणामी, स्थानिकांना मिळणारा रोजगारही कमी होईल. या सगळ्या पार्श्वभूमीवर एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो, तो म्हणजे सध्या सुरू असलेल्या रस्त्यांच्या कामांवर होणारा पाण्याचा भरमसाठ वापर! रस्ते चांगले झाले पाहिजेत, दळणवळण सुधारले पाहिजे, विकासकामांना विरोध असण्याचे कारण नाही. मात्र, पिण्याच्या पाण्याचा आणि शेतीच्या गरजेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असताना रस्त्यांच्या कामांसाठी मोठ्या प्रमाणावर पाणी वापरणे कितपत योग्य आहे? सिमेंट काँक्रिटच्या रस्त्यांना पाणी देणे आवश्यक असते. काँक्रिटची गुणवत्ता आणि मजबुती टिकवण्यासाठी त्यावर ठराविक काळ पाणी मारावे लागते. मात्र, त्यासाठी पाण्याचा स्रोत कोणता, किती पाणी वापरले जात आहे आणि त्याचा स्थानिक पाणीपुरवठ्यावर काय परिणाम होतो, याचा विचार केला जात आहे का? एकीकडे नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन करायचे आणि दुसरीकडे विकासकामांच्या नावाखाली पाण्याचा अमर्याद वापर सुरू ठेवायचा, हा विरोधाभास नाही का? रस्ते महत्त्वाचे आहेतच; पण रस्त्यांपेक्षा माणसाचे जगणे महत्त्वाचे नाही का? पाणीच नसेल तर त्या रस्त्यांचा उपयोग तरी काय? रस्ते बांधताना पाण्याची उपलब्धता, पाण्याचे नियोजन आणि पर्यायी स्रोत यांचा विचार करणे आवश्यक आहे. प्रक्रिया केलेले सांडपाणी, बांधकामासाठी योग्य असलेले बिगरपिण्याचे पाणी तसेच साठवलेले पावसाचे पाणी वापरण्याचा पर्याय तपासला पाहिजे. पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांवर ताण येणार नाही, याची जबाबदारी संबंधित यंत्रणांनी घेतली पाहिजे. पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी बांधकाम स्थळी नियमित देखरेखही आवश्यक आहे.

पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर टँकरने पाणीपुरवठा करणे, विहिरींचे अधिग्रहण करणे आणि तात्पुरत्या उपाययोजना करणे, एवढ्यापुरते प्रशासनाचे काम मर्यादित राहू नये. पावसाळ्यात उपलब्ध होणारे पाणी किती साठवले जाते, किती वाहून जाते आणि त्याचा भविष्यातील वापर कसा करता येईल, याचे नियोजन आधीपासूनच झाले पाहिजे. गावोगावी जलस्रोतांचे संवर्धन, गाळ काढणे, बंधारे बांधणे आणि पाणलोट क्षेत्र विकासाला प्राधान्य देणे गरजेचे आहे.

निसर्गाचा लहरीपणा आपल्या हातात नाही; मात्र उपलब्ध पाण्याचे नियोजन करणे नक्कीच आपल्या हातात आहे. यंदा पाऊस लवकर गेला म्हणून हातावर हात ठेवून बसण्याची ही वेळ नाही. उलट, संभाव्य पाणीटंचाईचे संकट ओळखून आतापासूनच उपाययोजना करण्याची गरज आहे. कारण पाणीटंचाई आली की सर्वप्रथम त्याचा फटका गरीब, शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य कुटुंबांना बसतो. श्रीमंत पाणी विकत घेऊ शकतात; पण प्रत्येकाला ते शक्य नसते. पाणी असेल तर शेती असेल, शेती असेल तर अन्न असेल, रोजगार असेल आणि गावांचे अर्थकारण टिकून राहील. म्हणूनच आता पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे मोल ओळखण्याची वेळ आली आहे. कारण, पाणी नाही तर जीवन नाही आणि जीवनच नसेल तर विकास तरी कोणासाठी?

लोकसंसद

फटाके बंदीची कठोर अंमलबजावणी करणे गरजेचे

एकीकडे वायू आणि ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्रात सर्व उत्सवांमध्ये वर्षभर सार्वजनिक ठिकाणी आणि रस्त्यांवर फटाके वाजवण्यास पूर्णपणे बंदी घातली असताना दुर्दैवाने दरवर्षीप्रमाणे यंदाही ही बंदी केवळ कागदावरच राहिल्याचे पाहायला मिळत आहे. गणेशोत्सव आणि नवरात्रीनंतर आता उत्साहाचा आणि आनंदाचा दिवाळीचा सण तोंडावर आला आहे. आता या दिवसातही रात्री उशीरापर्यंत कानठळ्या बसवणारे, १२५ डेसिबलपेक्षा जास्त आवाजाचे फटाके फोडण्याचे प्रमाण टिपेला पोहोचेल. १२५ डेसिबलपेक्षा जास्त आवाजाचे फटाके फोडल्यामुळे मोठ्या प्रमाणात ध्वनि प्रदूषण, वायू प्रदूषण होतेच, परंतु रुग्णांना, लहान बालकांना तसेच ज्येष्ठ नागरिकांना प्रचंड त्रास होतो. कानठळ्या बसवणाऱ्या फटाक्यांमुळे कान बधीर होतात. कायमचा बहिरेपणा येण्याचीही शक्यता असते. तसेच डोकेदुखी, रक्तदाब, हृदयविकार, दमा आणि फुफ्फुसाचे विकार यांसारखे आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात. पशुपक्षीही या आवाजाने घाबरून सैरावैरा पळत सुटतात व अपघातग्रस्त होऊन मृत्यूमुखी पडतात. फटाक्यांमुळे सर्वत्र कचरा, धूळ साठून पर्यावरणाचीही मोठ्या प्रमाणात हानी होते. कधी कधी आगीही लागतात. अशावेळी प्रशासनाने केवळ आदेश देऊन चालणार नाही, तर त्याची कठोर अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. प्रशासकीय उदासीनता आणि लोकांची बेफिकिरी यामुळे ही बंदी केवळ कागदावर राहू नये एवढीच अपेक्षा आहे.

– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी

दिनविशेष

पहिले संगीत नाटककार अण्णासाहेब किर्लोस्कर



अण्णासाहेब किर्लोस्कर हे मराठीतील पहिले श्रेष्ठ संगीत नाटककार. संपूर्ण नाव बळवंत पांडुरंग किर्लोस्कर. त्यांचा जन्म ३१ मार्च १८४३ रोजी धारवाड जिल्ह्यात गुर्लहोसूर या गावी झाला. वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत कानडी व मराठी भाषेचा अभ्यास त्यांनी घरीच केला. नंतर कोल्हापूर व धारवाड येथे शिक्षणासाठी राहून मुलकी परीक्षेपर्यंत ते शिकले. त्यापुढील शिक्षणासाठी पुण्यास असताना त्यांना नाटकांची आवड निर्माण झाली व ते नाटक मंडळ्यांस पदे रचून देऊ लागले. स्वतःची नाटक मंडळी काढून त्यांनी काही नाटकेही केली. तथापि ही नाटक मंडळी मोडली आणि ते गुर्लहोसूर येथे येऊन राहिले. त्यानंतर त्यांनी वकिलीची परीक्षा देण्याचा प्रयत्न केला पण तो यशस्वी न झाल्यामुळे ते नोकरी करू लागले. शिक्षक, जमादार आणि महसूल आयुक्तांच्या कचेरीतील कर्मचारी अशा विविध प्रकारच्या नोकऱ्या त्यांनी केल्या. अण्णासाहेबांनी प्रारंभी 'अल्लाउद्दिनाची चितुडगडावरील स्वारी' हे नाटक लिहावयास घेतले होते ते अपुरेच राहिले. शिक्षक असताना शांकरदिग्जय हे गद्य नाटक त्यांनी लिहिले (१८७३).

पुणे येथे १८८० साली एका पारशी नाटक मंडळीचे ऑपेराच्या धर्तीवरील एक नाटक त्यांच्या पाहण्यात आले. तसे नाटक मराठीत करून दाखविण्याची इच्छा त्यांस होऊन त्यांनी कालिदासाच्या अभिज्ञानशाकुंतल या नाटकाचे भाषांतर केले. त्यामध्ये स्वतःची पदेही घातली आणि उत्तम नटसंच मिळवून ते रंगभूमीवर आणले (१८८०). या नाटकास लाभलेले अपूर्व यश आणि लोकप्रियता पाहून १८८० मध्ये 'किर्लोस्कर नाटक मंडळी'ची त्यांनी स्थापना केली. त्यानंतर सुभद्राहरणावरील संगीत सौभद्र हे नाटक स्वतंत्रपणे त्यांनी लिहिले (१८८२). प्रणयभावनेचे मनोहर चित्रण त्यांनी ह्या नाटकात केले आहे. त्यांच्या सर्व नाटकांत हेच नाटक अधिक लोकप्रिय आहे. सुसंघटिक कथानक, अकृत्रिम संवाद, विलोभनीय व्यक्तिरेखा, प्रासादिक पदे आणि नाट्योपरोधावर आधारलेल्या विनोदाचा अखंडपणे वाहणारा अंतःप्रवाह या वैशिष्ट्यांमुळे या नाटकाचे आकर्षण मराठी प्रेक्षकांच्या मनात आजही टिकून आहे. अण्णासाहेब स्वतः चांगले नट व दिग्दर्शक होते.

जुन्या विष्णुदासी नाटकांतील सूत्रधार, विदूषक, गणपती व सरस्वती यांच्या अनुक्रमाने होणाऱ्या प्रवेशाची परंपरा सोडून देऊन संस्कृत नाटकातील सूत्रधार, परिपार्श्वक व नटी यांच्या संवादांनी नाटकांची प्रस्तावना करण्याची त्यांनी प्रथा पाडली. नाटक मंडळ्या व नट यांच्याविषयी समाजात असलेली अनुदारपणाची भावना त्यांनी रसिकांना उदात्त करमणुकीचे नवे माध्यम उपलब्ध करून दिले. परिणामी समाजातील उच्च वर्गात मोडणारे लोकही त्यांच्या नाटक मंडळीशी जिव्हाळ्याचे संबंध ठेवू लागले. अण्णासाहेबांनी काव्यरचनाही बरीच केली आहे. पौराणिक नाटक मंडळ्या व कीर्तनकार यांना त्यांनी आख्याने रचून दिली. त्यांना कानडी, उत्तर हिंदुस्थानी आणि मराठी (लावणी इ.) गाण्यांच्या अनेक चाली अवगत होत्या व ते शीघ्रपणे कवने रचू शकत असत. त्यांनी 'दक्षिणा प्राइझ कमिटी'ने बक्षीस लावल्यावरून स्पर्धेसाठी शिवाजी महाराजांवर पाचशे आर्यांचे एक दीर्घकाव्य रचिले होते. अशा या महान संगीत नाटककाराचे २ नोव्हेंबर १८८५ रोजी निधन झाले.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२ नोव्हेंबर

१) श्रीम. अनघा ज्योतिप्रकाश मुकादम
अलिबाग, २-११-१९५०

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

भेरव ग्रामस्थांचा एकोप्याचा आदर्श

पाली : पाणीटंचाईवर मात करण्यासाठी आणि गावाला समृद्ध बनवण्यासाठी भेरव गावातील ग्रामस्थांनी रविवारी उत्स्फूर्तपणे श्रमदान केले. एक दिवस गावासाठी चला, श्रमदानातून गाव समृद्ध या संकल्पनेतून रविवारी सुट्टीच्या दिवसाचा सदुपयोग करत गावकऱ्यांनी बंधाऱ्याच्या लोखंडी प्लेट्स बसवून आंबा नदीवरील पाणी अडवण्याचे महत्त्वाचे काम पूर्ण केले.आज पाणी अडवले, तर उद्याच्या काळात आपल्या गावाला तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागणार नाही, या दूरदृष्टीने गावकऱ्यांनी एकत्र येऊन हा उपक्रम हाती घेतला.

या मोहिमेत केवळ पुरुष मंडळीच नाही, तर युवकांनी आणि ज्येष्ठ नागरिकांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.सकाळपासूनच सर्व ग्रामस्थांनी श्रमदानातून मातीच्या पिशव्या भरून बंधाऱ्याच्या लोखंडी प्लेटमध्ये टाकल्या, ज्यामुळे लोखंडी प्लेट मजबुतीने बसुन जास्तीत जास्त पाणी अडवणे शक्य होणार आहे.

अनधिकृत मासेमारीला घातला आळा

१,०४५ प्रकरणांत १५ कोटी ४६ लाख रुपयांचा दंड; नियमित गस्त, विशेष पथके आणि ड्रोनद्वारे देखरेख

। रायगड । प्रतिनिधी ।

राज्याच्या सागरी हद्दीत अनधिकृत मासेमारीला आळा घालण्यासाठी मत्स्यव्यवसाय विभागामार्फत नियमित गस्त, विशेष पथकांद्वारे देखरेख आणि कायद्यानुसार कारवाई करण्यात येत आहे. नोव्हेंबर २०२१ ते ऑक्टोबर २०२६ या कालावधीत अनधिकृत मासेमारीविरुद्ध एकूण १,०४५ प्रतिवेदने दाखल करण्यात आली असून, त्यापैकी ९७६ प्रतिवेदने निकाली काढण्यात आली आहेत. या प्रकरणांमध्ये एकूण १५.४६ कोटी रुपयांचा दंड आकारण्यात आला असून, ९.३९ कोटी रुपये वसूल करण्यात आले असल्याची माहिती म त्स्यव्यवसाय आयुक्त भानुदास पालवे यांनी दिली.



विभागामार्फत एलईडी व एलईडी पर्ससीन, पर्ससीन व मिनी पर्ससीन, ट्रॉलिंग तसेच परप्रांतीय म ासेमारी नौकांविरुद्ध कारवाई करण्यात येत आहे. उपलब्ध नोंदीनुसार, पर्ससीन व मिनी पर्ससीन मासेमारीच्या प्रकारात ३६४ प्रतिवेदने दाखल करण्यात आली आहेत. एलईडी व एलईडी पर्ससीन मासेमारीच्या प्रकरणांमध्ये ७.४९ कोटी रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. तसेच, परप्रांतीय मासेमारी नौकांविरुद्ध १०३ प्रतिवेदने दाखल करून ३.१५ कोटी रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

नवीन मासेमारी हंगामात ३१ नौकांवर कारवाई

नवीन मासेमारी हंगामात अनधिकृत मासेमारी करणाऱ्या ३१ नौकांविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. जिल्हानिहाय कारवाईमध्ये रत्नागिरी जिल्ह्यात १२, मुंबई शहर जिल्ह्यात ९, सिंधुदुर्ग जिल्ह्यात ७, रायगड जिल्ह्यात २, तर ठाणे-पालघर जिल्ह्यात १ प्रकरण नोंदविण्यात आले आहे. अनधिकृत मासेमारीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी ड्रोनद्वारे प्राप्त माहितीच्या आधारेही कारवाई करण्यात येत आहे. उपलब्ध अहवालानुसार, ड्रोनद्वारे नोंदविण्यात आलेल्या प्रकरणांमध्ये एकूण ३,४२४ प्रतिवेदने दाखल करण्यात आली आहेत. या प्रकरणांमध्ये २.३० कोटी रुपयांचा दंड आकारण्यात आला असून, ६२.६२ लाख रुपये वसूल करण्यात आले आहेत. सागरी मत्स्यसंपत्तीचे संरक्षण, कायदेशीर मासेमारी पद्धतींना प्रोत्साहन आणि अनधिकृत मासेमारीला प्रतिबंध करण्यासाठी विभागामार्फत नियमित गस्त, विशेष पथकांद्वारे देखरेख आणि कायद्यानुसार कारवाई सुरू रा-हणार आहे. सर्व मच्छीमारांनी लागू असलेल्या कायद्यांचे व नियमांचे पालन करून विभागाच्या कार्यवाहीस सहकार्य करावे, असे आवाहन म त्स्यव्यवसाय विभागामार्फत करण्यात आले आहे. अनधिकृत सागरी मासेमारीला आळा घालण्यासाठी मत्स्यव्यवसाय विभागामार्फत करण्यात येत असलेली कारवाई ही मच्छीमारांसाठी सुरक्षा कवच आहे. या कक्षाने अतिशय उत्तम कामगिरी केली असून यामुळे अधिकृत मासेम ारी करणाऱ्यांचे अधिकार सुरक्षित ठेवण्याचे मोठे काम केले आहे.

निजामपुरात कायदेविषयक जनजागृती शिबीर उत्साहात

। माणगाव । प्रतिनिधी ।

विद्यार्थ्यांना कायद्याचे ज्ञान व्हावे, त्यांना आपल्या मूलभूत हक्कांसह कर्तव्यांची जाणीव व्हावी आणि अन्याया विरुद्ध दाद मागण्यासाठी उपलब्ध असलेल्या न्यायव्यवस्थेची माहिती मिळावी, या उद्देशाने तालुका विधी सेवा समिती, माणगाव आणि माणगाव बार असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने निजामपूर येथे कायदेविषयक जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



विद्यार्थ्यांमध्ये कायद्या विषयी जागरूकता निर्माण करणे, कायद्याने प्रदान केलेल्या अधिकारांची माहिती देणे, बालकांच्या संरक्षणासाठी अस्तित्वात असलेल्या विविध कायद्यांची ओळख करून देणे तसेच न्यायव्यवस्था सर्वसामान्य नागरिकांसाठी कशा प्रकारे कार्य करते, याची माहिती पोहोचविणे हा या शिबिराचा प्रमुख हेतू होता. या कार्यक्रमाला माणगाव जिल्हा व सत्र न्यायालयाच्या जिल्हा न्यायाधीश श्रीमती पी. बी. झिरपे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी माणगाव बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. मोहन मेथा, सहसचिव ॲड. सुजित मेहता, ॲड. मनोज गायकवाड, ॲड. ऋषी मोरे, निजामपूर विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष दत्तु पवार, सुधीर पवार, दत्ताराम नाडकर, शरद दोशी, रसिकलाल मेहता, संदीप मोदी, प्राचार्या महाळुंगे आदी उपस्थित होते.

शिबिरामध्ये ॲड. संदीप जाधव यांनी बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण करणाऱ्या पोक्सो कायद्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. बालकांचे संरक्षण, त्यांचे कायदेशीर अधिकार, अनुचित प्रकारांपासून स्वतःचे संरक्षण आणि अशा घटनांच्या प्रसंगी कायदेशीर मदत कशी मिळवावी, याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

ॲड. श्रुती गुरव यांनी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ या विषयावर मार्गदर्शन करताना शिक्षणाचा अधिकार, त्यासंदर्भातील कायदेशीर तरतुदी आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्कांची माहिती विशद केली. जिल्हा न्यायाधीश पी. बी. झिरपे यांनीही मार्गदर्शन केले.

सोन्याच्या चेनची केली चोरी

नवीन पनवेल : महिलेच्या गळ्यातील १८ ग्राम वजनाची सोन्याची चैन खेचून चोरून नेल्याप्रकरणी मोटरसायकल वरील अनोळखी इसमाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात २९ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. यातील फिर्यादी आणि त्यांचे पती हे मोटर स्कूटर वरून करवा चौथ पूजा करून परत येत होते. यावेळी संजीवनी स्कूलच्या मागे, खारघर या ठिकाणी मोटरसायकल वरून आलेल्या इसमाने फिर्यादीच्या गळ्यातील १८ ग्राम वजनाची सोन्याची चैन जबरदस्तीने खेचून चोरी करून पळून गेला.

उरण बायपास की मृत्यूचा सापळा?

। उरण । प्रतिनिधी ।

उरणकरांची वाहतूक कोंडीतून सुटका करण्यासाठी उभारण्यात आलेला बायपास रस्ता आता नागरिकांच्या जिवावर उठणार आहे की काय, असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.



वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी तयार केलेल्या या रस्त्यावरच अपघातांचा धोका वाढत असेल, तर हा विकास नेमका कोणाच्या सोयीसाठी? रस्त्याचे उद्घाटन आणि श्रेय लाटण्याची घाई करताना नागरिकांच्या जीवितसुरक्षेचा बळी दिला जात आहे का, असा संतप्त सवाल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे रायगड जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर यांनी उपस्थित केला आहे.

बायपास म्हणजे वाहतुकीचा अडथळा दूर करून प्रवास सुरक्षित आणि सुखकर करणारा मार्ग! मात्र, उरणच्या बायपासची रचना पाहता सुरक्षिततेच्या निकषांना हरताळ फासला गेला आहे की काय, अशी शंका निर्माण होत आहे. धोकादायक वळणे, वळणांवर उभारलेले गतिरोधक आणि रस्त्याची संशयास्पद रचना पाहता वाहनचालकांनी या मार्गावरून प्रवास करायचा की जीव मुठीत धरून मार्ग काढायचा, असा प्रश्न पडत आहे.घाईघाईत उद्घाटन उरकण्यासाठी हा बायपास थेट उरणच्या स्मशानभूमीजवळच आणून सोडण्यात आला आहे का? नागरिकांना सुरक्षित प्रवास देण्याऐवजी त्यांना स्मशानभूमीचा रस्ता दाखवायचा आहे काय, असा बोचरा सवालही आता उपस्थित होत आहे.



मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

। कर्जत । प्रतिनिधी ।

जेष्ठ पत्रकार स्व. वसंत ठाकूर यांच्या स्मरणार्थ मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिर व मोफत औषधे वाटप शिबिराचे आयोजन केले होते. या चिकित्सा शिबिरात २२० रुग्णांची तपासणी करून त्यांना मोफत औषधे देण्यात आली.

कर्जत शहरातील श्री धापया महाराज मंदिराच्या सभागृहात मोफत आयुर्वेदिक शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन नगराध्यक्ष पुष्पा दगडे यांच्या हस्ते यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून करण्यात आले. याप्रसंगी ज्योविस आयुर्वेदाचे डॉ. राज सातपुते, उपनगराध्यक्ष संतोष पाटील, नगरसेवक अशोक राऊत, राजाभाऊ कोठारी, महेंद्र चंदन, प्रशांत पाटील, सुचिता खोत, नेहा शिंदे, मानसी कानिटकर, सरपंच तानाजी पाटील, प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश सुर्वे, अभियंता अरुण गुरव, कृषी विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ रवींद्र मर्दाने, ॲड. अमोल साखरे, मनीषा सुर्वे, वसुधा ठाकूर शलाका नाईक, काजल गुप्ता आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना मुकेश सुर्वे यांनी, आम्ही कर्जत तालुक्यासह अन्य ठिकाणी मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिरे आयोजित करून आरोग्य आपल्या दारी ही संकल्पना घेऊन काम करीत आहोत. तसेच आयुर्वेदाचा खेडोपाडी प्रसार व प्रचार करण्याचा आम्ही संकल्प केला आहे. डॉ. राज सातपुते यांनी ग्रामीण भागाबरोबरच शहरातही आयुर्वेदिक चिकित्सा शिबिरांना प्रतिसाद मिळत असून आयुर्वेदाची खरी ओळख होत आहे. आयुर्वेदाचा प्रचार आणि प्रसार करण्याचा संकल्प स्पष्ट केला.

पुई येथील वीटभट्टीवर आढळला अजगर

। पाली /बेणसे । प्रतिनिधी ।

सुधागड तालुक्यातील पुई गावाजवळील एका वीटभट्टीवर तब्बल ५ फूट लांबीचा अजगर आढळल्याने कामगारांमध्ये काही काळ भीतीचे व घबराटीचे वातावरण पसरले होते. मात्र, पालीतील सर्पमित्र अमित निंबाळकर यांनी अत्यंत शिताफीने या अजगराला पकडले. त्यानंतर वनविभागाच्या मार्गदर्शनाखाली या अजगराला त्याच्या सुरक्षित नैसर्गिक अधिवासात सुखरूप सोडून देण्यात आले.



पुई येथील वीटभट्टीवर नेहमीप्रमाणे काम सुरू होते. अचानक ५ फूट लांबीचा अजगर निदर्शनास आल्याने कामगार चांगलेच हादरले. अजगराचा आकार मोठा असल्यामुळे घबराट उडाली आणि त्यांनी त्वरित काम बाजूला सारून सुरक्षित अंतर राखले.

वीटभट्टीवर अजगर आल्याची माहिती मिळताच परिसरातील आशिष यादव यांनी तात्काळ सर्पमित्र अमित निंबाळकर यांच्याशी संपर्क साधून माहिती दिली. माहिती मिळताच अमित निंबाळकर यांनी कुठलाही विलंब न करता तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी कोणतीही जोखीम न पत्करता अत्यंत शिताफीने अजगराला आपल्या ताब्यात घेतले. अजगराला सुरक्षित जेरबंद केल्यानंतर वीटभट्टीवरील कामगारांनी व स्थानिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला. अमित निंबाळकर यांनी याची माहिती तत्काळ वनविभागाला दिली. त्यानंतर वनविभागाच्या अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली या अजगराला हानी न पोहोचवता त्याच्या सुरक्षित नैसर्गिक अधिवासात सुखरूप सोडण्यात आले.

१७० विद्यार्थी व प्राध्यापकांचा सहभाग | **आयबीएम क्विस्किट फॉल फेस्ट उत्साहात संपन्न**

क्वांटम तंत्रज्ञानाच्या दिशेने बाटूची भरारी

। माणगाव । प्रतिनिधी ।

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे येथे आयबीएमच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेला तीन दिवसीय आयबीएम क्विस्किट फॉल फेस्ट उत्साहात संपन्न झाला. २६ ते २८ ऑक्टोबर दरम्यान पार पडलेल्या या रहोत्सवातून क्वांटम तंत्रज्ञानाच्या नव्या क्षितिजांचा वेध घेण्यात आला.



विविध शैक्षणिक संस्था आणि उद्योगक्षेत्रातील एकूण १७० निवडक विद्यार्थी व प्राध्यापकांनी या महोत्सवात सहभाग नोंदविला. शिक्षण आणि उद्योगक्षेत्रातील आठ तज्ज्ञ वक्त्यांनी क्वांटम संगणनातील अद्ययावत घडामोडी, संशोधनाच्या दिशा, औद्योगिक उपयोग आणि भविष्यातील रोजगार व करिअरच्या संधी यांवर मार्गदर्शन केले. क्वांटम संगणनाची मूलभूत तत्त्वे, क्वांटम अल्गोरिदम, क्वांटम तंत्रज्ञानाचे औद्योगिक क्षेत्रातील उपयोग आणि क्वांटम एरर करेक्शन यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर या महोत्सवात सविस्तर चर्चा झाली. केवळ सैद्धांतिक ज्ञानापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांना आयबीएमच्या क्विस्किट फ्रेमवर्कच्या माध्यम ातून प्रत्यक्ष प्रशिक्षण आणि प्रयोग करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली. तज्ज्ञांची व्याख्याने, संवादात्मक सत्रे आणि प्रात्यक्षिकांमुळे विद्यार्थ्यांना क्वांटम संगणनाच्या गुंतागुंतीच्या संकल्पना समजून घेण्यास मदत झाली. या महोत्सवाचे वैशिष्ट्य ठरले ते हॅकाथॉन आणि पोस्टर सादरीकरणासारखे तांत्रिक उपक्रम. या माध्यम ातून विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेला वाव देत सम स्या सोडविण्याची क्षमता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि संशोधनाभिमुख विचार विकसित करण्याचा प्रयत्न केला.

विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळाल्याने क्वांटम तंत्रज्ञानाचा उद्योग, संशोधन आणि भविष्यातील तंत्रज्ञान विकासासाठी कसा उपयोग होऊ शकतो, याचीही विद्यार्थ्यांना जाणीव झाली. या महोत्सवाच्या यशस्वी आयोजनात मुख्य आयोजक प्रा. अरविंद डब्ल्यू. किवेळेकर यांची महत्त्वपूर्ण भूमिका होती. सहआयोजक डॉ. लक्ष्मण नेटक आणि डॉ. हर्षा गायकवाड यांनीही आयोजनाची जबाबदारी प्रभावीपणे पार पाडली.

आधुनिक तंत्रज्ञानाधारित शिक्षण, संशोधन आणि नवोपक्रम यांना प्रोत्साहन देत डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाने आपल्या शैक्षणिक बांधिलकीचे दर्शन घडविले. क्वांटम तंत्रज्ञानाच्या नव्या युगात विद्यार्थ्यांना सक्षम बनविण्यासाठी अशा उपक्रमांची भूमिका निश्चितच मोलाची ठरणार आहे.

निवडक

प्रेमा तरवडे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

श्रीवर्धन : श्रीवर्धन तालुक्यातील प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या सातगाव माध्यमिक विद्यालय, वडशेत-वावे येथील मुख्याध्यापिका प्रेमा व्यंकटराव तरवडे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित सत्कार व निरोप समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमाला



शिक्षणप्रेमी, मान्यवर, सहकारी शिक्षक आणि माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे चेअरमन मनोहर वि. सावंत होते. दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी प्रेमा तरवडे यांच्या शैक्षणिक कार्याचा आणि विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत त्यांनी दिलेल्या योगदानाचा गौरव केला. मुख्याध्यापिका म्हणून कार्यरत असताना त्यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच शिस्त, संस्कार आणि व्यक्तिमत्त्व विकासाला महत्त्व दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रवासात प्रगती साधली. त्यांच्या सेवाभावी वृत्तीचा आणि विद्यार्थ्यांप्रती असलेल्या जिव्हाळ्याचा उल्लेख उपस्थितांनी आपल्या मनोगतातून केला. यावेळी प्रेमा तरवडे यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार आणि स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. आपल्या लाडक्या शिक्षिकेप्रती कृतज्ञता व्यक्त करताना उपस्थितांच्या भावना अनावर झाल्या. अनेकांनी शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या कार्याबद्दल आदर व्यक्त केला.



आकाशकंदीलांनी बाजारपेठा उजळल्या

खांदा : दिवाळी सणाला अवघा आठवडा शिल्लक राहिल्याने पनवेल आणि नवी मुंबईतील बाजारपेठांमध्ये सणाच्या खरेदीची लगबग सुरू झाली आहे. दिवाळीच्या स्वागतासाठी घरोघरी तयारी सुरू झाली असून, आकर्षक आकाशकंदील, रंगीबेरंगी विद्युत रोषणाई आणि लाईटच्या तोरणांनी बाजारपेठा सजल्या आहेत. विविध प्रकारचे आकाशकंदील आणि सजावटीच्या साहित्याच्या खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी होत आहे.दिवाळी म्हटली की घराच्या अंगणात पणत्यांची आरास, दारात आकाशकंदील आणि घराभोवती आकर्षक रोषणाई हे समीकरण ठरलेले असते. यंदाही पारंपरिक आकाशकंदिलांसोबतच आधुनिक डिझाइनच्या आकाशकंदिलांना ग्राहकांकडून पसंती मिळत आहे. कापडी, कागदी, बांबूच्या पट्ट्यांपासून तयार केलेले तसेच विविध रंगांच्या आकर्षक नक्षीकामाचे आकाशकंदील बाजारात उपलब्ध आहेत. विशेष म्हणजे, यंदा विद्युत रोषणाईच्या तोरणांना अधिक मागणी दिसून येत आहे. रंग बदलणाऱ्या एलईडी माळा, पडद्यासारखी दिसणारी लाईट, चमकणारे स्टार लाईट, दरवाजांसाठी आकर्षक तोरणे आणि घराच्या बाल्कनीसाठी विशेष रोषणाईचे साहित्य ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहे.



पोटलज खुर्द येथे ग्रामस्थांचा आदर्श

पाली : पाण्याची वाढती टंचाई आणि घटती भूजल पातळी या पार्श्वभूमीवर सुधागड तालुक्यातील पोटलज खुर्द येथील ग्रामस्थांनी एक आदर्श निर्माण केला आहे. गावाच्या वतीने लोकसहभाग व श्रमदानातून बंधारा बांधणे आणि बंधाऱ्यातील गाळ काढण्याचे काम उत्साहात पूर्ण करण्यात आले.गेल्या काही वर्षात बंधाऱ्यात मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने पाणी साठवण क्षमता कमी झाली होती. त्यामुळे उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्यासह शेतीच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला होता. ही बाब लक्षात घेऊन ग्रामस्थांनी एकत्र येत स्वतःच्या मेहनतीने बंधारा दुरुस्तीचा निर्णय घेतला. आज सकाळपासूनच गावातील महिला, पुरुष आणि तरुणांनी हातात खोरे, टोपले घेऊन कामाला सुरुवात केली. महिलांचा सहभाग लक्षणीय होता. जेसीबीच्या सहाय्याने मोठा गाळ काढण्यात आला, तर ग्रामस्थांनी वाळूच्या गोण्या भरून बंधाऱ्याला मजबुती देण्याचे काम केले.या कामामुळे यंदाच्या पावसाळ्यात बंधाऱ्यात मोठ्या प्रमाणात पाणी अडवले जाणार असून, त्याचा फायदा परिसरातील विहिरींची पाणी पातळी वाढण्यासाठी आणि रब्बी हंगामातील शेतीसाठी होणार आहे.शासनाच्या मदतीची वाट न पाहता ग्रामस्थांनी दाखवलेली ही एकजूट इतर गावांसाठी प्रेरणादायी असून, पाणी अडवा, पाणी जिरवा हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून राबवल्याबद्दल पोटलज खुर्द ग्रामस्थांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

पाच्छापूर रस्त्याचे काम सुरू होणार

पाली/वाघोशी : पाच्छापूर फाटा ते पाच्छापूर या रस्त्याच्या कामाचा प्रश्न आता मार्गी लागण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. मात्र, या रस्त्याच्या कामासाठी आवश्यक असलेली वनविभागाची पूर्वपरवानगी प्राप्त झाल्याने काम सुरू होण्याचा म ार्ग मोकळा झाला आहे. रस्त्याचा बहुतांश भाग वनविभागाच्या हद्दीतून जात असल्याने काम सुरू करण्यासाठी वनविभागाची परवानगी आवश्यक होती. रस्त्याचे काम यापूर्वीच विविध कारणांमुळे लांबणीवर पडल्याने परिसरातील नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे आता कोणतीही दिरंगाई न करता प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली. या निवेदनावेळी बळीराम निंबाळकर, राजू पातेरे, भगवान दिघे, विश्वास चांदे, भावेश दिघे, उमेश तांबट, राहुल महाडिक यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

ढगाळ वातावरणामुळे आंबा पीक संकटात

|| मोहर, फळधारणेवर परिणाम होण्याची भीती || बागायतदारांची चिंता वाढली

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

तालुक्यात आधीच दुष्काळी परिस्थिती झालेली असताना आता ढगाळ हवामान आणि पावसाच्या रिपरिपीमुळे आंबा बागायतदारांसमोर नवे संकट उभे राहिले आहे. आंब्याचा पालवी व मोहर फुटण्याचा महत्त्वाचा हंगाम सुरू असतानाच बदलत्या हवामानामुळे मोहर प्रक्रिया आणि आगामी फळधारणेवर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे.

ऑक्टोबर-नोव्हेंबर हा आंबा झाडांना नैसर्गिक ताण मिळण्याचा आणि थंडीची चाहूल लागण्याचा काळ असतो. चांगल्या मोहरासाठी हे वातावरण पोषक मानले जाते. मात्र, सध्याच्या ढगाळ आणि दमट हवामानामुळे भुरी, करपा



यांसारख्या बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. तसेच तुडतुडे किडीचा हल्ला होऊन कोवळी पालवी आणि मोहर सुकण्याचा धोका निर्माण झाला आहे.

सततच्या ढगाळ वातावरणामुळे परागीभवन प्रक्रियेत अडथळे येऊ शकतात. परिणामी, मोहर गळणे आणि फळधारणा कमी होण्याची शक्यता आहे. दुष्काळामुळे जमिनीतील ओलावा कमी असताना हवामानातील या बदलांचा झाडांच्या नैसर्गिक चक्रावरही परिणाम होऊ शकतो.

तालुका कृषी अधिकारी श्रध्दा डुंबरे यांनी अधिक माहिती देताना सांगितले की, कीड व रोगाचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून शेतकऱ्यांनी कृषी विद्यापीठाच्या शिफारशीप्रमाणे कीटकनाशक व बुरशीनाशक औषधांची फवारणी करणे आवश्यक आहे.

पेंढ्याच्या टंचाईमुळे आंबा पॅकिंगचा खर्च वाढणार

दुष्काळाचा परिणाम आंबा पॅकिंग व्यवस्थेवरही होण्याची शक्यता आहे. पावसाअभावी यंदा भात उत्पादन घटण्याचा अंदाज असल्याने आंबा पॅकिंगसाठी लागणारा पेंढा कमी प्रमाणात उपलब्ध होणार आहे. त्यामुळे पेंढ्याची टंचाई निर्माण होऊन पर्यायी साहित्याचा वापर करावा लागेल. परिणामी, पॅकिंगचा खर्च वाढून आंबा बागायतदारांच्या अडचणीत भर पडणार आहे.

"सध्या आंब्याला पालवी आणि मोहर फुटण्याचा महत्त्वाचा काळ आहे. मात्र, ढगाळ वातावरण आणि पावसाच्या रिपरिपीमुळे कीड व रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. याचा मोहर आणि पुढील फळधारणेवर परिणाम होऊ शकतो.आधीच दुष्काळाचा सामना करत असताना हवामानातील या बदलांमुळे बागायतदारांची चिंता वाढली आहे. - वैभव कर्णेकर, आंबा बागायतदार, श्रीवर्धन"

रेवदंडा पोलिसांचा अवैध धंद्यांविरोधात धडाका

■ जुगारप्रकरणी ७, दारूबंदीसाठी ३० कारवाया

| रेवदंडा | प्रतिनिधी |

रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्यांविरोधात पोलिसांनी धडक कारवाई मोहीम हाती घेतली असून, मटका जुगार आणि अवैध दारू व्यवसाय करणाऱ्यांविरोधात सातत्याने कारवाई सुरू आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक सुजित गडदे यांनी रेवदंडा पोलीस ठाण्याचा कार्यभार स्वीकारल्यानंतर अवैध धंद्यांवर विशेष लक्ष केंद्रित केले असून, त्यांच्या नेतृत्वाखाली पोलीस पथकाने कारवाईचा धडाका लावला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मटका जुगाराविरोधात आतापर्यंत सात कारवाया करण्यात आल्या



आहेत. यामध्ये महेंद्र एकनाथ माहीमकर याच्याकडून ६४५ रुपयांचा मटका माल जप्त करण्यात आला. तसेच रामराज, खानाव, चौल आणि थेरोंडा परिसरात करण्यात आलेल्या कारवायांमध्ये १२ हजार ६४० रुपयांपासून ते २९ हजार ७०० रुपयांपर्यंतचा मटका माल व मोबाईल जप्त करण्यात आले. मुक्तार युसुफ पटेल आणि गजानन हरिश्चंद्र दिवकर यांच्याकडून २६ हजार ५३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याशिवाय पत्ता जुगार खेळणाऱ्या पाच जणांविरोधातही कारवाई करून ३ हजार १०० रुपये जप्त करण्यात आले.

मटका जुगारासोबतच अवैध गावठी व विदेशी दारू विक्री आणि वाहतुकीविरोधातही पोलिसांनी मोठी मोहीम राबवली आहे. आतापर्यंत एकूण ३० कारवाया करण्यात आल्याची माहिती आहे.

या कारवाईत गावठी दारू, विदेशी दारू, दारू तयार करण्यासाठी वापरण्यात येणारा कच्चा माल, रबरी ट्यूब, ड्रम तसेच वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली वाहने जप्त करण्यात आली आहेत. यामध्ये भालगाव (रोहा) येथील प्रमोद हरिश्चंद्र परडळे याच्याविरोधातील कारवाईत कारसह ८ लाख ३४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच सुडकोली येथील दीपक परशुराम म्हात्रे याच्याकडून कारसह ३ लाख ४२ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. राम राज येथील शुभम सुरेश वाघमारे याच्याकडून स्कूटीसह ४० हजार ३०० रुपयांचा, तर कुदे येथील बाळू पांडुरंग वाडेकर याच्याकडून गावठी दारू तयार करण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालासह ३७ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याशिवाय कोकण परिसरातील कुणाल मेघनाथ वाडकर याच्याकडून दुचाकीसह २१ हजार रुपयांचा मुद्देमाल, तर मोरंडे येथील अनंत नारायण पाचंगे याच्याकडून गावठी दारू तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल व टाकीसह १८ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. विविध ठिकाणी करण्यात आलेल्या कारवायांमध्ये गावठी दारूच्या साठ्यांसह विदेशी दारूही जप्त करण्यात आली आहे.

अश्लील शिवीगाळप्रकरणी गुन्हा दाखल

| पनवेल | प्रतिनिधी |

अश्लील वक्तव्य करून शिवीगाळ केल्या प्रकरणी सुरेश श्रीधर चिकणे (३८, रा. सेक्टर १६ खारघर) याच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यातील पीडित पंचवीस वर्षीय तरुणी शिल्प चौक, सेक्टर १३, खारघर येथे कामावर असताना सुरेश चिकणे याने त्यांच्यासोबत अश्लील वक्तव्य केले. यावेळी तिने या गोष्टीला नकार दिल्याने त्याने तिचा हात धरला आणि अश्लील शिवीगाळ केली. याबाबतचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

निवडक

कळंबोलीत ७ नोव्हेंबरला रंगणार दिवाळी पहाट

पनवेल : दिवाळीच्या मंगलमय पहाटेला संगीत आणि मनोरंजनाची सुरेल मेजवानी कळंबोलीकरांना अनुभवायला मिळणार आहे. बबन मुकादम युवा मंचाच्या वतीने शनिवार, ७ नोव्हेंबर रोजी सकाळी ६.३० वाजता सेक्टर ५ मधील बाबा गार्डन, प्लॉट क्रमांक ३ येथे भव्य 'दिवाळी पहाट २०२६' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात इंडियन आयडॉल विजेते सागर म्हात्रे, उपविजेत्या श्वेता शिंदेकर, अभिनेते पुष्कर श्रोत्री, झी मराठी सारेगमप फेम मुग्धा वैशंपायन आणि प्रशमेश लघाटे हे कलाकार आपली कला सादर करणार आहेत. त्यामुळे कळंबोलीकरांना गायन, संगीत आणि अभिनयाची अनोखी पर्वणी मिळणार आहे. कार्यक्रमात 'एकच वाक्य' हे विशेष आकर्षणही असणार आहे. दिवाळीच्या निमित्ताने नागरिकांनी एकत्र येत सांस्कृतिक कार्यक्रमाचा आनंद घ्यावा, या उद्देशाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. उत्तर रायगड जिल्हा महिला मोर्चाच्या अध्यक्षा प्रिया बबन मुकादम आणि पनवेल महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती बबन नामदेव मुकादम यांच्या पुढाकारातून हा कार्यक्रम होत आहे.



जलवाहिनी दुरुस्तीच्या कार्याची पुस्तिका खा. राऊतांना सादर

खरोशी : कोरोना महामारीच्या कठीण काळात मुंबईचा पाणीपुरवठा अखंडित ठेवण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जल अभियंता विभागाने केलेल्या जलवाहिनी दुरुस्तीच्या उल्लेखनीय कार्याची माहिती देणारी पुस्तिका खासदार संजय राऊत यांना सादर करण्यात आली. ही माहिती निवृत्त सहाय्यक अभियंता इंजिनिअर जीवन शंकर पाटील यांनी दिली.महापालिकेच्या जल अभियंता विभागात तब्बल ३६ वर्षे सेवा बजावलेल्या जीवन पाटील यांनी कोरोना काळातील जलवाहिनी दुरुस्तीची महत्त्वपूर्ण कामे, छायाचित्रे आणि तांत्रिक माहिती या पुस्तिकेत संकलित केली आहे. कोरोना संकटातही मुंबईकरांचा पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी अधिकारी, कर्मचारी आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांनी केलेल्या समर्पित कार्याचा या पुस्तिकेतून आढावा घेण्यात आला आहे. या कार्याचा दस्तऐवज खासदार संजय राऊत यांच्यापर्यंत पोहोचविणे हा आपल्यासाठी संस्मरणीय क्षण असल्याचे जीवन पाटील यांनी सांगितले.

मटका जुगारप्रकरणी दोघांवर गुन्हा



पनवेल : कल्याण मटका जुगार प्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी सुनील महेंद्र राजभर (रा. सुकापुर) आणि रवी लेखराज राजपाल (रा. खारघर) यांच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. कर्नाळा भाजी मार्केट, गाळा नंबर ७, जय जय रघुवीर समर्थ फुलाचे दुकान, पनवेल येथे पनवेल शहर पोलिसांनी छापा टाकत कल्याण मटका जुगारावर कारवाई केली. त्यांच्याकडून ३५ हजार ११० रुपये जप्त करण्यात आले.

लैंगिक शोषण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

पनवेल : फिर्यादी यांना लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक शोषण केल्याप्रकरणी सोहम प्रदीप आरोसकर (सेक्टर एक, पुष्पकनगर) याच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ऑक्टोबर २०२४ ते ऑक्टोबर २०२६ पर्यंत सोहम आरोसकर (वय ३०) याने फिर्यादी यांना लग्नाचे आमिष दाखवले आणि त्याच्या राहत्या घरी व फिर्यादी यांच्या राहत्या घरी त्यांच्यासोबत शारीरिक संबंध ठेवून त्यांचे लैंगिक शोषण केले.

रस्त्यांच्या काँक्रिटीकरणासाठी ३३ कोटींचा निधी

दशरथ म्हात्रेंच्या पाठपुराव्याला यश

पनवेल | विशेष प्रतिनिधी |

पनवेलमधील रस्त्यांच्या विकासाला आता गती मिळणार असून, रस्त्यांच्या काँक्रिटीकरणासाठी जवळपास ३३ कोटी रुपयांची विविध विकासकामे मंजुरीच्या प्रतीक्षेत आहेत. नगरसेवक दशरथ बाळू म्हात्रे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ही कामे पनवेल महानगरपालिकेच्या आगामी महासभेच्या मंजुरीसाठी ठेवण्यात आली आहेत. यामुळे प्रभागातील नागरिकांना दर्जेदार रस्ते आणि सुधारित गटार व्यवस्था उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

यामध्ये खांदेश्वर वसाहतीमधील आगरी शाळा सेक्टर ६ ते तुलसी हार्मोनी सेक्टर १, साई रामा वन वर्ल्ड सेक्टर ७ ते वीर हॉस्पिटल सेक्टर १ (छत्रपती शिवाजी महाराज चौक) तसेच इंद्रगार्ण सोसायटी सेक्टर १० ते सीकेटी कॉलेज या तीन प्रमुख रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाचा समावेश आहे. रस्त्यांसोबतच गटार व्यवस्थेचेही नूतनीकरण करण्यात येणार आहे. त्यामुळे या मार्गांवरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.नगरसेवक दशरथ म्हात्रे यांनी प्रभागाच्या विकासाला प्राधान्य दिल्याने परिसरातील नागरिकांकडून त्यांचे आभार मानण्यात आले.

बारा तासांत चोरटे जेरबंद

■ ९० हजार १०० रुपयांचा मुद्देमाल केला जप्त
■ नागोठणे पोलिसांची दमदार कामगिरी

| नागोठणे | प्रतिनिधी |

नागोठण्याजवळील बाळसई (ता. रोहा) गावाच्या हद्दीतील मोबाईल टॉवरच्या ठिकाणी झालेल्या चोरीप्रकरणी नागोठणे पोलिसांनी चार चोरट्यांना अवघ्या बारा तासांत जेरबंद केले आहे. सर्व आरोपींना ताब्यात घेऊन चौकशी करून सदर गुन्ह्याची उकल करण्यात आली. चोरट्यांकडून पोलिसांनी एकूण ९० हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नागोठणे पोलिसांच्या या दमदार कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

आरोपींमध्ये सागर गणेश बनकर (२८), त्याचे साथीदार सुनिल रघुनाथ लोखंडे (३२), दिनेश गणेश बनकर (२६), सर्व रा. रामनगर नागोठणे, ता. रोहा यांचा समावेश आहे. तसेच त्यांच्यासोबत विधीसंघर्षीत बालक



(१७) रा. रामनगर नागोठणे हादेखील सहभागी असल्याचे आरोपींनी कबूल केले आहे. यासंदर्भात नागोठणे पोलीस ठाण्यातून उपलब्ध झालेल्या माहितीनुसार बाळसई गावाचे हद्दीतील मुंबई-गोवा महामार्गालगत असलेल्या इंडस कंपनीच्या एअरटेल मोबाईल टॉवरच्या शेल्टर केबीनचा कडी कोयंडा व लॉक तोडून चोरट्यांनी शेल्टर केबीनमधील पॉवर केबल व ॲमरॉन कंपनीची बॅटरी असा एकूण ४० हजारांचा मुद्देमाल चोरून नेल्याप्रकरणी इंडस कंपनीचे सुपरवायझर रोशन मांडे (३४), रा. मेघना सिटी, वरसगाव, ता.रोहा त्यांच्याकडून पोलीस ठाण्यात चोरी व घरफोडीची तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानुसार नागोठणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून सदर गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार राजेंद्र भोनकर यांच्याकडे देण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी, रोहा प्रसाद गोकुळे व नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि रविंद्र पारखे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार राजेंद्र भोनकर व पथकातील पो.ह. राकेश राऊळ, पो.शि. विक्रांत बांधणकर, पो.शि. बळी पुटेवाड यांनी यशस्वीपणे केला.

कामगारांना ४५ हजारांचे सानुग्रह अनुदान

■ वाशीत वचनपूर्ती मेळावा

| नवी मुंबई | प्रतिनिधी |

नवी मुंबई महापालिका आणि परिवहन उपक्रमातील कंत्राटी कामगारांना ७ हजार ५०० रुपयांचा विशेष सानुग्रह लाभ आणि दिवाळीनिमित्त सरसकट ४५ हजार रुपयांचे सानुग्रह अनुदान देण्याच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर श्रमिक सेनेच्या वतीने वाशी येथील सिडको प्रदर्शनी केंद्रात भव्य वचनपूर्ती कामगार मेळावा आयोजित करण्यात आला. यावेळी कामगारांच्या वतीने राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. नागरिकांवर करवाढीचा बोजा न टाकता काम गारांना चांगले वेतन आणि जनतेला दर्जेदार नागरी सुविधा देण्याची भूमि का कायम राहील. पुढील २० वर्षे



मालमत्ता कर आणि पाणीपट्टीत वाढ होऊ देणार नाही, अशी ग्वाही गणेश नाईक यांनी दिली.

श्रमिक सेना युनियनचे अध्यक्ष डॉ. संजीव नाईक, उपाध्यक्ष संदीप नाईक, महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत, सभागृहनेते सागर नाईक, भाजप जिल्हाध्यक्ष राजेश पाटील, सरचिटणीस चरण जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी डॉ. संजीव नाईक यांनी कंत्राटी कामगारांच्या वेतनवाढीचा प्रश्न मार्गी लागल्याबद्दल समाधान व्यक्त केले. देशातील एकमेव नवी मुंबई महापालिकेने कंत्राटी काम गारांच्या वेतनात केलेली वाढ विशेष उल्लेखनीय असल्याचे सांगत त्यांनी गणेश नाईक यांचे आभार मानले.

महापौर सुजाता पाटील यांनीही हा निर्णय कामगारांच्या स्वप्नांची पूर्तता करणारा असून, त्यांच्या कुटुंबाला मोठा आधार देणारा असल्याचे सांगितले. ४५ हजारांच्या सानुग्रह अनुदानामुळे कामगारांसाठी आजपासूनच दिवाळी सुरू झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

गणेश नाईक यांनी यावेळी महिलांना मोफत प्रवास आणि ज्येष्ठ नागरिकांना मोफत परिवहन प्रवासाच्या सुविधेचाही उल्लेख केला. नवी मुंबईत पाणीकपात होऊ देणार नाही. पाणीगळती आणि पाणीचोरी रोखण्याबरोबरच बांधकाम व औद्योगिक क्षेत्रासाठी पर्यायी पाण्याचा वापर करण्यावर भर देण्यात येईल, असेही नाईक यांनी सांगितले.



दिवेआगरच्या नव्या पुलाचे सांधे खचले

■ अपघाताचा धोका वाढला
■ तातडीने दुरुस्तीची मागणी

| बोर्ली पंचतन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन-शेखाडीमार्गे दिघीकडे जाणाऱ्या मुख्य मार्गावरील दिवेआगर येथील नव्याने बांधण्यात आलेल्या पुलाचे दोन्ही सांधे खचल्याने रस्त्यावर मोठ्या खाचा पडल्या आहेत. त्यामुळे वाहनचालकांसाठी हा पूल धोकादायक ठरत असून, गंभीर अपघाताची भीती व्यक्त होत आहे. वेगाने येणाऱ्या वाहनांना अचानक खाचांचा अंदाज येत नसल्याने वाहने जोरात आदळत आहेत.

गेल्या दोन ते तीन दिवसांत रात्रीच्या वेळी खचलेले सांधे न दिसल्याने काही दुचाकीस्वारांचे अपघात झाल्याची माहिती आहे. नवीन पुलाची अल्पावधीतच दुरवस्था झाल्याने बांधकामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. संबंधित कामाच्या गुणवत्तेची तपासणी करण्याची मागणीही वाहनचालकांकडून होत आहे.

दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये पुणे, मुंबईसह विविध भागांतून दिवेआगरला मोठ्या संख्येने पर्यटक येण्याची शक्यता आहे. अशा वेळी पुलावरील धोकादायक खाचा मोठ्या अपघाताला निमंत्रण देऊ शकतात. त्यामुळे संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने लक्ष घालून संबंधित ठेकेदाराकडून पुलाच्या दोन्ही सांध्यांची दर्जेदार दुरुस्ती करून घ्यावी, अशी मागणी वाहनचालकांनी केली आहे. संबंधित विभागाच्या कामाबाबत नाराजी व्यक्त होत आहे.

आदर्श तळेकरचे बीएचएमएस परीक्षेत यश | सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव

टेलरच्या मुलाची डॉक्टर होण्याची भरारी

| तळा | प्रतिनिधी |

जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर गरिबीवर मात करता येते, हे तळा शहरातील परीट आळी येथील आदर्श मनीष तळेकर याने सिद्ध करून दाखवले आहे. टेलरिंगचे काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या वडिलांच्या कष्टांना यशाची जोड देत आदर्शने बी.एच.एम.एस. परीक्षेत घवघवीत यश संपादन केले असून, डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण केले आहे.

आदर्श हा लहानपणापासूनच



अभ्यासात हुशार होता. तळा येथील महाविद्यालयातून बारावीच्या परीक्षेत त्याने तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला होता. त्यानंतर संगम नेर येथील आश्विन रूरल आयुर्वेद कॉलेजमध्ये प्रवेश घेऊन साडेचार वर्षांचे वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले. नुकत्याच झालेल्या परीक्षेत यश मिळवत त्याने आपल्या मेहनतीचे चीज केले.

आदर्शच्या यशामागे त्याचे वडील मनीष तळेकर यांचा मोठा त्याग आहे. टेलरिंगचा व्यवसाय करून अत्यंत प्रतिकूल आर्थिक परिस्थितीतही त्यांनी मुलाच्या शिक्षणात कोणतीही कमतरता पडू दिली नाही. स्वतःच्या गरजा बाजूला ठेवून मुलाला डॉक्टर बनवण्याचे स्वप्न त्यांनी उराशी बाळगले. आज आदर्शने मिळवलेल्या यशातून वडिलांच्या कष्टांचे सार्थक झाले आहे.

आदर्शच्या यशाबद्दल तळा शहरासह संपूर्ण तालुक्यातून त्याचे अभिनंदन होत असून, परीट आळीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्याच्या यशाने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसमोर जिद्द आणि मेहनतीचा आदर्श निर्माण केला आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- नागाव येथील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी खालील पदांसाठी स्टाफची आवश्यकता आहे : रिसेप्शनिस्ट २ जागा, रेस्टॉरंट कॅप्टन १ जागा, हाऊसकीपर फक्त पुरुष (२ जागा), इंडियन चायनीज कुक १ जागा, मोरी - १ जागा, वेटर - १ जागा. इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ या वेळेत संपर्क साधावा किंवा वर मेसेज करावा. संपर्क क्रमांक: ७५५९१८४६१२
- नोकरीची सुवर्णसंधी! - अलिबाग येथील ऑफिससाठी स्टाफ पाहिजे!, ऑफिसमध्ये काम करण्यासाठी कर्मचारी आवश्यक, आकर्षक पगार, नोकरीचे ठिकाण: अलिबाग, रायगड मुलाखतीसाठी आजच संपर्क साधा! ९९२३७५०५३९/९१०५७१७०३८ इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा! चांगल्या पगारासह नोकरीची उत्तम संधी!
- कामासाठी माणसे गरजु मुले पाहिजे
१) मोबाईल डिलेव्हरीसाठी -पेण, पोयनाड, वडखळ, रेवदंडा, मुरूड, इतर मोटारसाईकलने बाईक आमची (लाईसन्स पाहिजे) २) कॉम्प्युटर ऑपरेटर लेडीज/जेन्टस, ३)पार्ट/ फुल टाईम पाहिजे. मो. ८८८८२२०२२१
- Vacancy in Office Education- Bsc/ Bcom, Salary - 15000 Per month, Location - Bamansure, Contacat- 9823585321
- Vacancy in Furniture Showroom Education- Bsc/Bcom, Experience -2 Years, Salary - 20,000 Per month, Location - Zirad, Contacat- 9823585321
- दुकानगाळा भाड्याने देणे आहे. विक्री करणे आहे. २० गुंठे जागा अलिबागपासून २ किमीवर ९७६४५४८६७९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

ग्रामपंचायत अधिकाऱ्याला मारहाण

। पनवेल । प्रतिनिधी ।

ग्रामपंचायतीच्या कामाचे थकीत बिल मंजूर न केल्याच्या कारणावरून पनवेल पंचायत समितीच्या आवारात ग्रामपंचायत अधिकाऱ्याला शिवीगाळ करून मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. या मारहाणीत ग्राम पंचायत अधिकारी रेवन्नाथ मारुती ढेरे यांच्या डाव्या हाताचे बोट फ्रॅक्चर झाले आहे. याप्रकरणी निलेश म्हात्रे आणि संदेश कदम यांच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रेवन्नाथ ढेरे हे कोळखे आणि पिपळे ग्रामपंचायतीचे अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. ते कामाचा अहवाल सादर करण्यासाठी पनवेल पंचायत समिती कार्यालयात गेले होते. शासकीय कामकाज आटोपून सकाळी ११.३० ते दुपारी १२ वाजण्याच्या दरम्यान ते कार्यालयाबाहेर पडत असताना कंत्राटदार अतुल मालकर यांचे सहकारी असल्याचे सांगितले जाणारे निलेश म्हात्रे आणि संदेश कदम यांनी त्यांना अडवले.

कोळखे पेठ येथील अंतर्गत गटार आणि मुख्य आरसीसी पाइपलाइनच्या बांधकामाचे थकीत बिल का काढले नाही, तसेच फोन का उचलत नाही, असा जाब आरोपींनी ढेरे यांना विचारला. यावेळी निलेश म्हात्रे याने ढेरे यांचा हात पकडून त्यांना जबरदस्तीने सोबत नेण्याचा प्रयत्न केला. ढेरे यांनी नकार दिल्यानंतर दोघांनी त्यांना शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

घटनेच्या वेळी पंचायत समिती कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी मध्यस्थी करून ढेरे यांची सुटका केली. त्यानंतर दोन्ही आरोपी घटनास्थळावरून निघून गेले. जखमी ढेरे यांनी पनवेल उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय तपासणी केली असता, त्यांच्या डाव्या हाताच्या करंगळीजवळील बोटाला फ्रॅक्चर झाल्याचे निष्पन्न झाले.

ढेरे यांच्या तक्रारीवरून पनवेल शहर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (बीएनएस), २०२३ च्या कलम १३२, १११(२) आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक सुनील वाघ या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

दरम्यान, पंचायत समितीच्या आवारातच शासकीय अधिकाऱ्याला मारहाण झाल्याने प्रशासकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. या प्रकरणी वरिष्ठ अधिकारी कोणती भूमिका घेतात आणि ग्रामपंचायत अधिकारी संघटनेकडून पुढील काय पावले उचलली जातात, याकडे लक्ष लागले आहे.

अनोळखी व्यक्तीचा मृत्यू

। पनवेल । प्रतिनिधी ।

उरण परिसरात पनवेलकडून जेएनपीटीकडे जाणाऱ्या महामार्गालगत उरण वाहतूक शाखेच्या चौकीजवळ एक अनोळखी व्यक्ती बेशुद्ध अवस्थेत आढळून आली होती. त्याला उपचारासाठी इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. या व्यक्तीची अद्याप ओळख पटलेली नसून, उरण पोलिसांनी नातेवाइकांचा शोध घेण्यासाठी आवाहन केले आहे.

अंदाजे ४५ ते ५० वर्षांचा एक पुरुष महामार्गालगत बेवारस अवस्थेत आढळून आला. त्याचे संपूर्ण शरीर मातीने माखलेले होते. डाव्या हाताच्या कोपरावर जुनी जखम असून, त्यामध्ये किडे पडल्याचेही नमूद करण्यात आले आहे. रुग्णवाहिकेच्या मदतीने त्याला इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. याप्रकरणी उरण पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. पोलीस उपनिरीक्षक सुरेश कुऱ्हाडे तपास करत असून, सहायक पोलीस निरीक्षक अर्चना कुदळे यांनी ओळख पटविण्यासाठी नातेवाईकांचा शोध घेण्याचे आवाहन केले आहे.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. केतन बाळु गावडे, श्री. भगवान नारायण गोळेकर, श्री. राहुल रमेश शेलार यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

जमिन मिळकतीचे वर्णन

मौजे चांदई, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ७९/१२ एकुण ०.८६.०० गुंठे जागा पैकी लिहुन देणार यांचे हिश्याचे क्षेत्र ०.१९.०० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक २/११/२०२६

ॲड. देविदास यशवंत देवघरे
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

मौजे भुतिवली, ता. कर्जत, जि.रायगड.

मालकाचे नाव	स. नं./हि.नं.	एकुण क्षेत्र हे. आर. पॉ.	आकार रू. पैसे
श्री. अनंता भागा तावरे व इतर	३०/३	खाता नं. २९ मधील एकुण क्षेत्र ००-५६-७० हे. आर. पॉ. पैकी विकत घेत असलेले क्षेत्र ००-१६-०० हे. आर. पॉ.	६-१०

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, कुळमुखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, मृत्युपत्र, पोटगी, अदलाबदल वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. ०२/११/२०२६

ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे
पत्ता - बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक श्रीराम वसंत जोशी व इतर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

मौजे गौरकामत तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत

सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर	क्षेत्र (हे. आर. पॉ.)	आकार रु पैसे
१/७	एकुण क्षेत्र ०-०३-५० हे आर पॉ	०-४७
३/५	एकुण क्षेत्र ०-१६-२० हे आर पॉ	२-३७

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०२/११/२०२६

खरेदीदारातर्फे वकील ॲड. निलेश कान्हु मोरे
मोबा.९८२२६९११०९
पत्ता - दहिवली तर्फे नीड तालुका कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१

जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल श्री. पराग तानाजी चव्हाण यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री प्रविण बापू औटी यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

जमिन मिळकतीचे वर्णन

मौजे जांभिवली ता कर्जत जि रायगड येथील मिळकत

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ३१/१/अ एकुण ०.८६.९० गुंठे पैकी लिहुन देणार यांचे हिश्याचे क्षेत्र ०.२५.०० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हित संबध त्यांनी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक ०२/११/२०२६

ॲड. देविदास यशवंत देवघरे
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे सर्वांना कळविण्यात येते की.

मौजे वाघोडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग क्र. ५, एकूण क्षेत्र २-००-०० हे.आर., आकार रुपये ३.१८ पैसे, या मिळकतीपैकी श्री. बकुळ रामदास पाटील यांच्या हिश्श्याचे क्षेत्र १-३३-०० हे.आर. ही मिळकत श्री बकुळ रामदास पाटील यांचे मालकी हक्कात व ताबे कब्जा वहिवाटीत आहे.

सदर वर वर्णन केलेली मिळकत माझ्या अशिलांनी विद्यमान मालकांकडून कायम खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकतीबाबत कोणत्याही व्यक्तीचा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, बोजा, गहाण, ताबा, वारसाहक्क, करार अथवा अन्य कोणताही दावा किंवा हरकत असल्यास त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत त्याबाबतची सर्व मूळ कागदपत्रे व पुराव्यांसह खालील पत्त्यावर लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी.

विहित मुदतीत कोणतीही लेखी हरकत प्राप्त न झाल्यास सदर मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, दावा अथवा हरकत नाही असे समजून माझे अशिल पुढील कायदेशीर कार्यवाही करतील. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही व त्याची सर्व जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील, याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०२/११/२०२६

ॲड. समाधान रविंद्र पाटील
मुक्काम पोस्ट वेश्वी,
तालुका अलिबाग, जिल्हा रायगड.
मो. ८९८३०११९६९

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांना मौजे अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली वर्णन केलेली बिनशेती मिळकत, त्यामधील बांधकाम यामधील मालकी हक्क हितसंबंध विद्यमान मालक सिल्व्हर सॅन्ड्स रियल इस्टेट प्रा. लि. तर्फे संचालक मेहराज रजबअली मर्चंट आणि फिरबोज रजबअली मर्चंट यांचकडुन संपादन/खरेदी घेण्याच्या वाटाघाटी सुरू केल्या आहेत. विद्यमान मालकांनी मिळकतीवरील त्यांचा मालकीहक्क निर्वेध असल्याचा भरवसा दिलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे अलिबाग ता. अलिबाग, जि. रायगड येथील

नगर भुमापन क्र.	क्षेत्र चौ.मी.	आकार रू. पैसे.
१२३३/बी ज्याचा भूमापन क्र. १७६/४	३२८८ ००-३२-६३ हे.आर.चौ.मी	९१३.६८

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल मिळकत खरेदी घेण्याचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : ०१/११/२०२६

ॲड. रविंद्र विनायक ओक
''गुरुकृपा'' महर्षी कर्वे रोड,
ता. अलिबाग, जि. रायगड

जाहीर नोटीस

माझे अशिल यांनी खाली नमूद केलेली अकृषिक जमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक प्रियाल असोसिएट तर्फे जयेश भुपेंद्र गांधी व मनिष जवाहरलाल गिलडा यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

गावाचे नाव	भुमापन क्र. व उपविभाग	क्षेत्रफळ आर.चौ.मी	आकार रू. पै.
मौजे दहिवली तर्फे निड, ता. कर्जत, जि. रायगड	४०/२/१	१३७.००	२.७४
	४०/२/२	९५.९०	६.३०३
	४०/२/३	९५.९०	६.३०३
	४०/२/४	९५.९०	६.३०३
	४०/२/५	१४९.००	९.८३४
	४०/२/६	१३७.००	९.०४२
	४०/२/७	९५.९०	६.३३६
	४०/२/८	९५.९०	६.३३६
	४०/२/९	९५.९०	६.३३६
	४०/२/१०	१३५.२७	८.९४३
	४०/२/११	३१८.७५	२१.०५४
	४०/२/१२	३२७.१३	२१५८२
	४०/२/१३	३८१.५३	२५.१७९
	४०/२/१४	५३७.९२	३५.४७५
	४०/२/१५	३५४.४१	२३.३९७
	४०/२/१६	५२५.००	०
	४०/२/१७	१८६.२१	१२.२७६

वरील वर्णनाच्या अकृषिक जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : /१०/२०२६

ॲड. उमेश आनंद भगत
अधिवक्ता
मु. पो. चिंचवळी ता. कर्जत
जि. रायगड
मो. नं. ९०४९४८६८०५

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**

जाहिर नोटिस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली जमीन मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालक श्री. दिलीप पंढरीनाथ गोरेगावकर वगैरे २१ यांचेसोबत चालु आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट क्रमांक व उपविभाग	क्षेत्र हे. आर.	आकार. रू. पै.
भोईघर, ता. मुरूड	१६७	०-६९-०० पो.ख. ०-०५-०० एकूण ०-७४-००	०.७२

वर नमुद केलेली मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ०७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधन कारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग,
दिनांक : ३१/१०/२०२६

सही/-
ॲड. राकेश नारायण पाटील
रा. आगरी पॅलेस, मु. पो. चिंचोटी
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९२७२६२०००५

कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अलिबाग

कमळ भवन, शिवाजी चौक, अलिबाग, जि. रायगड
नोंदणी क्रमांक आरजीडी/एबीजी/आरएसआर/सीआर/३०८/९२

विशेष सर्वसाधारण सभेची सुचना
(फक्त सभासदांसाठी)

दिनांक :- ३१-१०-२०२६

कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अलिबाग या संस्थेच्या सभासदांना कळविणेत येते की, संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा सोमवार दि. ०९-११-२०२६ रोजी टिल्लू वाडा, युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी, अलिबाग येथे सायंकाळी ०४-३० वाजता, सभेच्या कार्यक्रम पत्रिकेतील कामकाजासंबंधी विचार करण्यासाठी होणार आहे. तरी सदर सभेस अगत्यपूर्वक वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

सभेची विषय पत्रिका

१. संस्थेचे कार्यक्षेत्र विस्तार करणे संबंधी विचार विनिमय करुन निर्णय घेणे, तसेच त्या अनुषंगाने सदर उपविधी दुरुस्ती प्रस्ताव तयार करुन मा. सहकार आयुक्त तथा निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे व तद्संदर्भातील अधिकारी यांच्याकडे मंजुरीकरिता पाठविणे.
२. जनसेवक नागरी सहकारी पतसंस्था मर्या. डोंबिवली ही संस्था विलिनीकरण/ सम्मिलीकरण करणेबाबत निर्णय घेणे. व मा. सहकार खात्याकडे या संदर्भातील प्रस्ताव सादर करणे.
३. मुंबई व्यापारी नागरी सहकारी पतसंस्था मर्या., दादर ही संस्था विलिनीकरण/ सम्मिलीकरण करणेबाबत निर्णय घेणे. व मा. सहकार खात्याकडे या संदर्भातील प्रस्ताव सादर करणे.

सभा : सोमवार दिनांक ०९-११-२०२६
स्थान : टिल्लूवाडा, युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी, अलिबाग

श्री. लक्ष्मण जुंधारे
सेक्रेटरी

PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public at large that my client has entered into an agreement with (1) Mr. Rajesh Ratanchand Jain Gandhi, (ii) Smt. Kanchan Bhavarlal Jain, (iii) Mr. Nilesh Bhavarlal Jain, (iv) Mr. Rahul Suresh Jain, (v) Smt. Lalita Suresh Jain, (vi) Mr. Santosh Ratanchand Jain, (vii) Mr. Suresh Ladmal Jain, (viii) Smt. Reshma Nilesh Jain and (ix) Mr. Vinit Santosh Jain ("Owners") who are the owners of the property more particularly described in the First Schedule hereunder written ("Property") and is proposing to purchase/acquire all their rights, title and interest in the said Property. Therefore, on instructions, I am issuing this public notice as under:

All persons entities, including any lender, bank or financial institution or entity having any claim and/or demand and/or objection against or in respect of the right, title, share or interest of the Owners in / to the Property or any part thereof, in furtherance to or under any sale, transfer, assignment, gift, exchange, lease, leave and license, tenancy, possession, use, occupation, trust, maintenance, easement, acquisition, requisition, power of attorney, lis pendens, mortgage, lien, charge, hypothecation (including by way of receivables), pledge, guarantee, loans, debts, advances, inheritance, devise, bequest, partition, settlementor under any attachment, injunction, decree, order, judgment, or award by any court of law, tribunal, revenue or statutory authority or arbitration or under any agreement, memorandum of understanding, term sheet and/or any other deed or document (either agitated in any litigation or otherwise) or any claim or demand which is adverse to or inconsistent with the right, title or interest of the Owners or even otherwise any other right, title, demand, claim or interest whatsoever to or in respect of or concerning the Property or any part thereof ("Claim") are hereby required to make the same known in writing to the undersigned at the address mentioned herein within 14 (fourteen) days from the date of publication

hereof, with notarised documentary evidence on which they are basing and asserting their rights/interest with respect to the said Property or any part thereof, failing which, such claim, demand, right, title, interest, dispute, demand or objection, if any, shall be deemed to have been waived and/ or abandoned to all intents and purposes.

THE FIRST SCHEDULE ABOVE REFERRED TO:
(Description of the Property)

All that piece and parcel of land admeasuring 0.20.00 Akak H.R. Sq. Mtrs. from and out of land admeasuring 1.23.03 Akak H.R. Sq. Mtrs,, Assessing at Rs. 1.38 Ps. (which is owned by Vendors) forming part of land bearing Bhumapan Kramank / Upavibhag 25/3 admeasuring in total 2.89.00 Akak H.R. Sq. Mtrs,, Assessing at Rs. 3.01 Ps., being, lying and situate at Village Mahalunge Budruk, Taluka Murud, District Raigad.

Adv. S. Y. Bartake
Adv. S. S. Bartake
Office At B/202, Kuberakshe C.H.S., Near Maruti Naka, Alibag, Tal. Alibag, Dist. Raigad, 402 201.

जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाचे मिळकतीबाबत मिळकतीचे मालक श्री. अमर तुलसिदास वाधवानी, रा. सोना अपार्टमेंट, फ्लॅट नं.७०७, गोल मैदान, कैलाश परभत हॉलजवळ, उल्हासनगर, श्री. मनिष रमेश जैन, रा. ओझोन रेसीडेन्सी, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड, श्री. शौकीन वसंत राणे रा. नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेसोबत मिळकत खरेदी करण्याची बोलणी केलेली असुन तसा साठेकरार देखील केलेला आहे. सदर मिळकत कायम फरोक्त खरेदीखताने विकत घेण्याचे आमचे अशिलांनी ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.चौ.मि.)	पो.ख. (हे.आर.चौ.मि.)	आकार (रु.पै.)
नागाव	२०६८/३	०-१३-९०	०-००-५०	२.७५

वरील वर्णनाची मिळकत व त्यातील दगड, धोंडा, पाणी, जाणे-येण्याचा मार्ग सर्व वहिवाटी, सर्व हक्क दरोबस्त अशी मिळकत ही या नोटीसीचा विषय असुन सोयीकरीता तिला यापुढे सदर मिळकत असे संबोधिले जाईल.

सदर मिळकत ही विद्यमान मालक यांचे ताबेकब्जाची, वहीवाटीची, निर्वेध, बोजारहीत, विकण्यायोग्य असल्याची हमी मिळकतीचे मुळ मालक यांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तरी सदर मिळकतीवर अथवा तिचे कोणतेही भागा-वर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहीवाट ताबेकब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बक्षिस, बोजा, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, भागीदारी, खरेदीखत या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी योग्य त्या प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १५ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे लेखी स्वरुपात नोंदवाव्यात. या कालावधीत कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकती संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहीत मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

पेण
ता. ०१/११/२०२६

ॲड. पुष्कर धनदास मोकल
रा. ईशान्य को ऑप. हौ. सोसायटी,
बी - विंग, पहिला मजला, फ्लॅट नं. १०३,
महाजन हॉस्पिटलचे बाजुला, चिंचपाडा,
पेण, ता. पेण, जि. रायगड.
मो.नं. ९८५०३६११७२, ७७७००९५८३३

जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, मौजे मुंगोशी तालुका- पेण, जिल्हा-रायगड गावच्या हद्दीतील गट नंबर व उपविभाग २ एकुण क्षेत्र २०.१२.०० (हे. आर. पॉ) सदर मिळकत हि मुंगोशी गावचे मालकीची असुन सदर मिळकतीवर मुंगोशी गावचे सर्व ग्रामस्थांचा सामाईक मालकी हक्क आहे. परंतु सदर मिळकतीबाबत कोणतेही शासकिय वा निमशासकिय काम करणे, सदर मिळकत विक्री करणे अगर सदर मिळकतीसंदर्भात कोणतेही काम करण्यासाठी प्रत्येकवेळी सर्व ग्रामस्थ एकत्र येणे शक्य नाही. सबब सर्व ग्रामस्थांच्या वतीने नारायण जानु गोळे वगैरे १४ यांस पंच म्हणुन वर नमुद केलेली कामे करण्यासाठी गावकीतर्फे नेमण्यात आले असुन तसा फेरफार घडवुन त्यांची नावे पंच म्हणुन सदर मिळकतीच्या सातबाऱ्याच्या उताऱ्यावर लावण्यात आलेली आहेत. परंतु सदर पंचापैंकी काही पंच यांनी वर नमुद केलेली मिळकत विक्री करणेसंदर्भात गावकीसोबत अगर सदर सातबारावरील पंच श्री. नारायण जानु गोळे यांचे सोबत कोणताही विचार विनिमय न करता विक्रिस काढली आहे हे श्री. नारायण जानु गोळे व मुंगोशी ग्रामस्थ यांस खात्रीलायक समजले आहे. सदर मिळकत विक्रीस दिलेल्या ता.२१/०९/२०२६ रोजीचे पेपर नोटिसीस श्री. नारायण जानु गोळे यांनी सबंधित वकिल यांचेकडे लेखी हरकत ही नोंदविलेली आहे.

तरी वर नमुद मौजे मुंगोशी गावच्या हद्दीतील गट नंबर व उपविभाग २ एकुण क्षेत्र २०.१२.०० (हे. आर. पॉ) या मिळकतीचा विक्री व्यवहार सदर मिळकतीचे सातबारावरील नमुद पंच यांचेसोबत न करता प्रत्यक्ष गावाकीसोबत मिळकतीचा व्यवहार करावा अगर खाली सही करणार ॲडव्होकेट किंवा मुंगोशी गावचे ग्रामस्थ व सदर सातबारावरील पंच श्री. नारायण जानु गोळे यांचेसोबत संपर्क साधावा.

याउपरहि कोणीही सदर जागेचा व्यवहार सातबारावरील नमुद पंच यांचेसोबत परस्पर केल्यास अगर त्यांस बयाणा रक्कम दिल्यास त्यास मुंगोशी गावचे ग्रामस्थ व सदर सातबारावरील पंच श्री. नारायण जानु गोळे जबाबदार राहणार नाहीत व त्यांचे होणारे नुकसानीची सर्वस्वी जबाबदारी ही व्यवहार करणाऱ्यांची राहिल याची नोंद घ्यावी.

हि जाहिर नोटिस आज ता. ०२/११/२०२६ रोजीची.

सही/-
ॲड. मीना ल. बांधणकर.
पत्ता - ५०२, पृथ्वी कॉम्प्लेक्स, झिराळ आळी,
गणपती मंदिराजवळ, पेण, रायगड
मो. ८८८८१८१५३३, ७०६६०४१०१९

PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public at large that my client has entered into an agreement with (1) Mr. Rajesh Ratanchand Jain Gandhi, (ii) Smt. Kanchan Bhavarlal Jain, (iii) Mr. Nilesh Bhavarlal Jain, (iv) Mr. Rahul Suresh Jain, (v) Smt. Lalita Suresh Jain, (vi) Mr. Santosh Ratanchand Jain, (vii) Mr. Suresh Ladmal Jain, (viii) Smt. Reshma Nilesh Jain and (ix) Mr. Vinit Santosh Jain (“Owners”) who are the owners of the property more particularly described in the First Schedule hereunder written (“Property”) and is proposing to purchase/acquire all their rights, title and interest in the said Property. Therefore, on instructions, I am issuing this public notice as under:

All persons entities, including any lender, bank or financial institution or entity having any claim and/or demand and/or objection against or in respect of the right, title, share or interest of the Owners in/ to the Property or any part thereof, in furtherance to or under any sale, transfer, assignment, gift, exchange, lease, leave and license, tenancy, possession, use, occupation, trust, maintenance, easement, acquisition, requisition, power of attorney, lis pendens, mortgage, lien, charge, hypothecation (including by way of receivables), pledge, guarantee, loans, debts, advances, inheritance, devise, bequest, partition, settlementor under any attachment, injunction, decree, order, judgment, or award by any court of law, tribunal, revenue or statutory authority or arbitration or under any agreement, memorandum of understanding, term sheet and/or any other deed or document (either agitated in any litigation or otherwise) or any claim or demand which is adverse to or inconsistent with the right, title or interest of the Owners or even otherwise any other right, title, demand, claim or interest whatsoever to or in respect of or concerning the Property or any part thereof (“Claim”) are hereby required to make the same known in writing to the undersigned at the address mentioned herein within 14 (fourteen) days from the date of publication.

hereof, with notarised documentary evidence on which they are basing and asserting their rights/interest with respect to the said Property or any part thereof, failing which, such claim, demand, right, title, interest, dispute, demand or objection, if any, shall be deemed to have been waived and/ or abandoned to all intents and purposes.

THE FIRST SCHEDULE ABOVE REFERRED TO:
(Description of the Property)

All that piece and parcel of land admeasuring 0.20.00 Akak H.R. Sq. Mtrs. from and out of land admeasuring 1.23.03 Akak H.R. Sq. Mtrs,, Assessing at Rs. 1.38 Ps. (which is owned by Vendors) forming part of land bearing Bhumapan Kramank / Upavibhag 25/3 admeasuring in total 2.89.00 Akak H.R. Sq. Mtrs,, Assessing at Rs. 3.01 Ps., being, lying and situate at Village Mahalunge Budruk, Taluka Murud, District Raigad.

Adv. S. Y. Bartake
Adv. S. S. Bartake
Office At B/202, Kuberakshe C.H.S., Near Maruti Naka, Alibag, Tal. Alibag, Dist. Raigad, 402 201.

निवडक

रोहित-विराटची जोडी पुन्हा जमणार

नवी दिल्ली : भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील एकदिवसीय मालिकेला सुरुवात होणार आहे. यासाठी, भारतीय संघाचे दोन दिग्गज खेळाडू विराट कोहली आणि रोहित शर्मा न्यूझीलंडमध्ये दाखल झाले आहे. भारत आणि न्यूझीलंड यांच्यात कधी आणि केव्हा रंगणार एकदिवसीय मालिकेचा थरार, जाणून घेऊयात.रोहित शर्मा



आणि विराट कोहली एकदिवसीय मालिकेसाठी न्यूझीलंडमध्ये दाखल झाले आहेत. त्यांनी दोन दिवसांपूर्वी ऑकलंडमध्ये तयारीला सुरुवात केली. त्यांच्या नेट सरावाचे फोटो आणि व्हिडिओ समोर आले आहेत, ज्यात दोघेही कसून तयारी करताना दिसत आहेत. एका व्हिडिओमध्ये रोहित आणि विराट हसतानाही दिसत आहेत. दोघेही न्यूझीलंडच्या परिस्थितीशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करत असून दीर्घकाळ सराव करत आहेत. भारत आणि न्यूझीलंड यांच्यात पाच एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळली जाईल. रोहित शर्मा आणि विराट कोहली ४ नोव्हेंबर २०२६ रोजी ऑकलंडमधील ईडन पार्कवर न्यूझीलंडविरुद्ध खेळताना दिसतील. रोहित शर्मा आणि विराट कोहली सध्या तंदुरुस्त असून संपूर्ण पाच सामन्यांसाठी उपलब्ध आहेत. काही खेळाडू पहिल्या तीन एकदिवसीय सामन्यांनंतर कसोटी मालिकेची तयारी सुरू करतात. परंतु, रोहित आणि विराट यांनी कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली असून ते चौथ्या आणि पाचव्या एकदिवसीय सामन्यासाठी संघासोबत राहतील.

रवींद्र जडेजाचे करिअर धोक्यात?

मुंबई : भारतीय क्रिकेटचा दिग्गज अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजाचे एकदिवसीय सामन्यातील करिअर संपुष्टात आल्याच्या वावड्या उठल्या आहेत. न्यूझीलंडविरूद्ध ५ सामन्यांच्या वनडे सिरीजमध्येही भारतीय संघाचा रविंद्र जडेजा भाग नाही. आता जडेजाचा जुना सहकारी चेतेश्वर पुजारानेदेखील याबाबत आपले मत मांडत रवींद्रचे करिअर संपुष्टात आल्याचे म्हटलं आहे. २०२७ मध्ये खेळणाऱ्या जाणाऱ्या वर्ल्ड कपच्या भारतीय संघात रविंद्रला जागा मिळणे कठीण असल्याचं त्याचं म्हणणं आहे. तर अभिषेक नायरच्या म्हणण्यानुसार, रविंद्र जडेजाला बॅकअप खेळाडू म्हणून संघात नक्कीच जागा मिळू शकते.



वर मुलाखतीदरम्यान चेतेश्वर पुजाराने आपले मत व्यक्त करत म्हटले की, व्यवस्थापनाला जर रवींद्रला संघात स्थान द्यायचे असते तर त्यांनी न्यूझीलंडच्या दौऱ्यात त्याला नक्की स्थान दिले असते. पुजारानुसार, संघ व्यवस्थापनाचे प्राधान्य आता अक्षर पटेल आहे. त्याला नियमितपणे संधी देण्यात येत आहे आणि अष्टपैलू स्पिनर स्वरूपात व्यवस्थापनाच्या दृष्टीने अक्षर हा आता पहिली पसंती होताना दिसून येत आहे. पुजाराने मुलाखतीदरम्यान असेही सुचवले की, संघ व्यवस्थापनाने जडेजाला सांगितले असेल की त्याने आता कसोटी क्रिकेटवर लक्ष केंद्रित करावे आणि संघ त्याच्याकडे व्हाईट-बॉल क्रिकेटसाठी पाहत नाही. जडेजा आधीच टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झाला आहे.अभिषेक नायरने जडेजाच्या भविष्याबद्दल थोडे वेगळे मत मांडले. तो म्हणाला की, जडेजाचे संघात पुनरागमन कठीण असले तरी, अक्षर पटेल जखमी झाल्यास किंवा अनुपलब्ध असल्यास, संघात परत बोलावला जाणारा तो पहिला खेळाडू असेल. नायरने जडेजाचे वर्णन संघासाठी विमा पॉलिसी असे केले. तो म्हणाला की, संघाकडे अक्षरच्या रूपात एक अनुभवी पर्याय आहे. विश्वचषकापूर्वी अक्षरला दुखापत झाल्यास, जडेजा संघात परत येऊ शकतो.

यशस्वी जयस्वालची धावांसाठी धडपड

ऑकलँड : न्यूझीलंड दौऱ्यावर असलेल्या भारतीय कसोटी संघाचा भाग असलेला सलामीवीर यशस्वी जयस्वाल खराब फॉर्मशी झुंजत आहे. पहिल्या कसोटीत त्याने दोन्ही डावांत अनुक्रमे १७ आणि ५ धावा केल्या. दुसऱ्या कसोटीत त्याला खातेही उघडता आले नाही. यशस्वी शून्यावर बाद झाला हे आश्चर्यकारक नाही, तर त्याच्या फॉर्मबद्दल चिंता आहे. अलीकडेच वेगवेगळ्या सामन्यांमधील नऊ डावांमध्ये यशस्वी चार वेळा शून्यावर बाद झाला आहे. यशस्वी जायस्वालने या वर्षी ऑगस्टपासून कसोटी क्रिकेटमध्ये एकही अर्धशतक झळकावलेले नाही. या महिन्याच्या सुरुवातीला, चंदीगडविरुद्ध मुंबईकडून देशांतर्गत रणजी ट्रॉफी सामन्यात सलामी देताना तो १३ चेंडूंमध्ये शून्यावर बाद झाला होता. गॉल येथे श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या कसोटीच्या दुसऱ्या डावातही जयस्वाल शून्यावर बाद झाला होता. अनिर्णित राहिलेल्या त्या मालिकेत जयस्वालने तीन डावांत एकूण ७७ धावा केल्या होत्या. त्या कसोटीपूर्वी, तो एसएलसी इलेव्हनविरुद्धच्या सराव सामन्यातही शून्यावर बाद झाला होता.



भारत ठरला पहिला राष्ट्रकुल कबड्डी विजेता

पुरुष संघाने श्रीलंकेचा ५४-२० ने केला पराभव; महिला संघाने युगांडाला ३५-१५ ने हरवून गोल्ड जिंकले

। अहमदाबाद । वृत्तसंस्था ।

भारताने अहमदाबादमध्ये शनिवारी (दि.३१) पहिल्या कॉमनवेल्थ कबड्डी चॅम्पियनशिप २०२६ मध्ये दुहेरी विजेतेपद मिळवले. भारतीय पुरुष संघाने अंतिम सामन्यात श्रीलंकेचा ५४-२० असा पराभव करून पहिला कॉम नवेल्थ चॅम्पियन होण्याचा मान मिळवला. तर, महिला संघाने युगांडावर ३५-१५ अशी मात करत सुवर्णपदक पटकावले. पुरुष आणि महिला दोन्ही संघांनी संपूर्ण स्पर्धेत अपराजित राहत विजेतेपद मिळवले. पुरुष संघाने सलग ८ सामने जिंकले, तर महिला संघाने आपले सर्व ६ सामने जिंकले.



पुरुषांच्या अंतिम सामन्यात आशियाई चॅम्पियन भारताने सुरुवातीपासूनच श्रीलंकेवर दबाव कायम ठेवला. भारताचा स्टार रेडर आदित्य शिंदेने १४ रेडमध्ये १० गुण मिळवत सुपर १० पूर्ण केला. यात ४ बोनस गुणांचाही समावेश होता.भारत हुड्डाने दुसऱ्या हाफमध्ये शानदार कामगिरी करत ७ रेडमध्ये ८ गुण मिळवले. संपूर्ण सामन्यात त्याला एकदाही टॅकल करता आले नाही. पंकज मोहितेने ६, तर उपकर्णधार नवीन कुमारने ५ गुणांचे योगदान दिले.

डिफेन्समध्ये योगेश दहियाने ५ टॅकल प्रयत्नांमध्ये ५ यशस्वी टॅकल करत हाय-५ नोंदवला. शुभम शिंदे, कर्णधार सुरजीत सिंह, प्रवेश मलिक आणि दीपक शंकर यांनीही प्रत्येकी २ टॅकल पॉइंट्स मिळवले.भारतीय संघाने सामन्यात ३० रेड आणि १४ टॅकल पॉइंट्स मिळवले. संघाने श्रीलंकेला ४ वेळा ऑल-आउट केले, तर स्वतः एकदाही ऑल-आउट झाला नाही.पहिल्या हाफमध्ये भारताने १५-८ अशी आघाडी घेतली. त्यानंतर संघाने सतत दबाव कायम ठेवत हाफ-टाइमपर्यंत स्कोअर ३०-१० केला. दुसऱ्या हाफमध्येही भारताने २४ गुण मिळवले, तर श्रीलंकेला केवळ १० गुण करता आले.श्रीलंकेच्या संघाने संपूर्ण सामन्यात ४१ रेडमध्ये केवळ ७ यशस्वी रेड केल्या. त्यांच्यासाठी मदुवंताने सर्वाधिक ६ टॅकल पॉइंट्स मिळवले. श्रीलंकेचे रेडर्स भारतीय बचावफळीसमोर संघर्ष करताना दिसले.

भारताने कर्णधार निधी शर्माच्या नेतृत्वाखाली युगांडाचा ३५-१५ असा पराभव केला. भारताकडून साक्षीने १० रेडमध्ये ९ गुण मिळवले. यात २ बोनस गुणांचा समावेश होता. तिने पहिल्या हाफमधील सर्व ६ रेडमध्ये गुण मिळवले.कर्णधार निधी शर्माने ५ गुण मिळवले, ज्यात ३ बोनस गुणांचा समावेश होता. अनुने ६ रेड गुणांची भर घातली. बचावफळीत रितू आणि सुमन यांनी प्रत्येकी ४ टॅकल गुण मिळवले.

युगांडाकडून नकायंगो शिराटने सर्वाधिक ११ गुण मिळवले. तिने संघाच्या ३५ रेडपैकी २४ रेड केल्या, मात्र इतर खेळाडूंकडून पुरेसे सहकार्य मिळाले नाही.महिला अंतिम सामन्याच्या पहिल्या हाफमध्ये भारतीय संघाने शानदार खेळ केला. सुरुवातीला भारत ७-३ असा आघाडीवर होता. त्यानंतर संघाने १५-४ अशी आघाडी घेत ती २२-७ पर्यंत वाढवली.पहिल्या हाफमध्ये भारतीय खेळाडूंनी एकही रेड गमावली नाही.

युगांडाच्या बचावपटूंनी त्यांच्या सर्व ९ टॅकल प्रयत्नांत अपयश पत्करले. दुसऱ्या हाफमध्ये युगांडाने रेड पॉइंट्समध्ये ७-६ अशी आघाडी घेतली, पण भारताने आणखी एक ऑल-आउट करत सामना ३५-१५ असा जिंकला. साक्षीने संपूर्ण स्पर्धेत ६ सामन्यांत ५२ गुण मिळवले. महिला संघाने गट फेरीत मलेशिया, सिंगापूर, युगांडा आणि नायजेरियाचा पराभव केला. त्यानंतर उपांत्य फेरीत श्रीलंकेचा ३९-१४ असा पराभव करून अंतिम फेरीत स्थान मिळवले.

न्यूझीलंडने भारताला ७ विकेटने हरवले



हॅमिल्टन : भारतीय संघ न्यूझीलंडविरुद्धचा पाचवा टी सामना ७ गडी राखून हरला. मात्र, भारतीय संघाने मालिका ३-२ अशी जिंकली. हॅमिल्टन येथे, किवी संघाने १८ षटकांत ३ गडी गमावून १९२ धावांचे लक्ष्य पूर्ण केले.टिम सायफर्टने ५० चेंडूंमध्ये ९३ धावा केल्या. ग्लेन फिलिप्सने नाबाद ६५ धावांची खेळी केली. भारताकडून अर्शदीप सिंग, वरुण चक्रवर्ती आणि नितीश रेड्डी यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

यापूर्वी शुक्रवारी, नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना, भारतीय संघाने २० षटकांत ८ गडी गमावून १९१ धावा केल्या. इशान किशनने ३२ चेंडूंमध्ये ६१ धावा केल्या. कर्णधार श्रेयस अय्यरने २३ चेंडूंमध्ये ५० धावांची खेळी केली. न्यूझीलंडच्या ॲडम मिल्नेने ४ बळी घेतले.

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

। रायगड। प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनची वार्षिक सर्वसाधारण सभा पेण येथील लक्ष्मीनारायण हॉल म्हाडा कॉलनी येथे उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाली.

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हि सभा घेण्यात आली असून सदरच्या सभेमध्ये आरडीसीएचे सचिव प्रदिप नाईक यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचून केलेले ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले.



आरडीसीएच्या नियम नियमावली घटनेत तांत्रिक व योग्य पद्धतीने सुधारणा करण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. येणाऱ्या क्रिकेट हंगामात आरडीसीच्या वतीने मुलामुलींचे सर्व वयोगटातील निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती सचिव प्रदिप नाईक यांनी दिली. सभेच्या अखेरीस रायगड जिल्ह्यातील गुणवान खेळाडूंनाचा व एमसीए पंच परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या पंचांचा व प्रशिक्षकांचा सत्कार जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने करण्यात आला.तसेच रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या सर्व आश्रयदाते, आजीवन सभासद यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.सर्वसाधारण सभेसाठी आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदिप नाईक, यशवंत साबळे, राजेश पाटील, प्रशांत ओक, संजय तावडे, जयंत नाईक, बशीर चिचकर आदी उपस्थित होते.

मायरा शेखला दुहेरी मुकुटाची संधी

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

ईएमएमटीसीच्या वतीने आयोजित आणि एआयटीए व एमएसएलटीए यांच्या मान्यतेखाली सुरू असलेल्या ईएमएमटीसी १४ वर्षांखालील राष्ट्रीय टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत महाराष्ट्राच्या मायरा शेख हिला दुहेरी मुकुटाची संधी आहे.

या स्पर्धेच्या मुख्य ड्रॉमध्ये मुलांच्या एकेरीच्या उपांत्य फेरीत चौथ्या मानांकित तेलंगणाच्या सुजई पोथुला याने तेराव्या मानांकित कर्नाटकच्या आदित्य कामतचा टायब्रेकमध्ये पराभव करून अंतिम फेरी गाठली.

दुसऱ्या मानांकित तेलंगणाच्या



सत्या चिंतागुंता याने सातव्या मानांकित तामिळनाडूच्या जेगन सेंथिलचा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला.

मुलींच्या एकेरीच्या उपांत्य फेरीत अव्वल मानांकित उत्तर प्रदेशच्या सिद्धी पांडेने आपली विजयी मालिका कायम राखत कर्नाटकच्या शर्वी गहलोटचा पराभव करून अंतिम फेरीत धडक मारली. दुसरी मानांकित महाराष्ट्राची मायरा शेख हिने महाराष्ट्राच्याच नवव्या मानांकित रिशिता यादवचा संघर्षपूर्ण पराभव करून अंतिम फेरीत स्थान मिळवले.

मुलींच्या दुहेरी गटात महाराष्ट्राच्या रिशिता यादव आणि मायरा शेख या तिसऱ्या मानांकित जोडीने अव्वल मानांकित हरियाणाच्या आराधना तेहलन आणि उत्तर प्रदेशच्या सिद्धी पांडे या जोडीचा पराभव करून अंतिम फेरी गाठली. अन्य सामन्यात शौर्या पाटील आणि अस्मी पित्रे यांनी रायमा चव्हाण व शर्वी गहलोट यांचा पराभव केला.



जिल्हास्तरीय आंतरशालेय नेटबॉल स्पर्धा

ग्रेगोरियन पब्लिक स्कूलचे वर्चस्व

। खांब । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हास्तरीय आंतरशालेय नेटबॉल स्पर्धेत ग्रेगोरियन पब्लिक स्कूल, रोहा येथील खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत स्पर्धेवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले.

सदरील स्पर्धेचे उद्घाटन ग्रेगोरियन पब्लिक स्कूल, रोहाचे प्रा. फादर ॲलेन जोसेफ यांच्या हस्ते करण्यात आले. तर ग्रेगोरियन पब्लिक स्कूलच्या संघांनी विविध वयोगटांत उल्लेखनीय यश संपादन करून रोहा तालुक्याच्या क्रीडा क्षेत्राचा नावलौकिक वाढविला. या स्पर्धेत ग्रेगोरियन पब्लिक स्कूलच्या १४ वर्षे वयोगट मुले व मुली प्रथम क्रमांक, १७ वर्षे वयोगट मुले व मुली प्रथम क्रमांक, १९ वर्षे वयोगट मुले प्रथम क्रमांक तर मुलीनी द्वितीय क्रमांक पटकावला.

विद्यार्थी वर्गाच्या या यशामध्ये शाळेचे नेटबॉल प्रशिक्षक सुधीर जंगम यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि खेळाडूंची मेहनत, शिस्त व सांघिक भावना महत्त्वपूर्ण ठरली. प्रशिक्षकांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी मैदानावर उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले.

मागील काही वर्षांपासून ग्रेगोरियन पब्लिक स्कूल, रोहा येथील खेळाडू विविध क्रीडा स्पर्धांमध्ये विभागीय तसेच राज्यस्तरावर आपली चमक दाखवत आहेत. शाळेने क्रीडा क्षेत्रात निर्माण केलेली ही यशस्वी परंपरा यंदाही कायम राखली आहे. तर या स्पर्धेच्या वेळी म०हस्के आणि अमर सलागरे यांची विशेष उपस्थिती होती. या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व विजयी खेळाडू, प्रशिक्षक, प्राचार्य आणि शाळेचे व्यवस्थापन यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

मेदवेदेव व्हिएन्ना ओपनच्या उपांत्य फेरीत

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

रशियाच्या डॅनिल मेदवेदेवने व्हिएन्ना एटीपी ५०० टेनिस स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. जगातील क्रमांक-५चा खेळाडू मेदवेदेवने शुक्रवारी उपांत्यपूर्व फेरीत फ्रान्सच्या एड्रियन मन्नारिनोचा पराभव केला. या विजयासह त्याने हंगामातील अखेरच्या एटीपी फायनल्स स्पर्धेसाठीही पात्रता मिळवली. ही स्पर्धा १५ ते २२ नोव्हेंबरदरम्यान इटलीतील ट्यूरिन येथे खेळवली जाणार आहे.आता उपांत्य फेरीत मेदवेदेवचा सामना स्पेनच्या कार्लोस अल्काराझशी होणार आहे.



जगातील ७३व्या क्रमांकाच्या मन्नारिनोविरुद्ध मेदवेदेवने सुरुवातीपासूनच वर्चस्व राखले. त्याने पहिला सेट ६-२ आणि दुसरा सेट ६-३ असा जिंकून सामना आपल्या नावावर केला. रशियन खेळाडूने मन्नारिनोच्या सर्व्हिसवर दुसऱ्या मॅच पॉइंटवर विजय मिळवला.मेदवेदेव २०१९ नंतर केवळ एकदाच फायनल्ससाठी पात्र ठरण्यात अपयशी ठरले आहेत. यावेळी त्यांनी अलेक्झांडर झ्वेरेव्ह, कार्लोस अल्काराझ आणि बेन शेल्टन यांच्यासोबत हंगामाच्या अखेरीस होणाऱ्या स्पर्धेत आपले स्थान पक्के केले आहे.

सप्टेंबरमध्ये ओपनच्या चौथ्या फेरीत अमेरिकेच्या फ्रान्सिस टियाफोकडून पराभूत झाल्यानंतर मेदवेदेवने शानदार पुनरागमन केले आहे. त्याने हांगझोऊ आणि अल्माटी येथे विजेतेपदे मिळवली. याशिवाय तो शांघाय मास्टर्स आणि बीजिंग ५०० स्पर्धेच्या उपांत्य फेरीपर्यंतही पोहोचला.आता व्हिएन्ना येथे विजेतेपद मिळवण्यासाठी त्याला आणखी दोन सामने जिंकावे लागतील. उपांत्य फेरीत मेदवेदेवसमोर स्पेनच्या कार्लोस अल्काराझचे आव्हान असेल. अल्काराझने उपांत्यपूर्व फेरीत अमेरिकेच्या टॉमी पॉलचा पराभव केला.

या विजयासह एटीपी ५०० स्तरावरील स्पर्धेत या हंगामात अल्कारेझचा विजय-पराजयाचा विक्रम १४-० असा झाला. सामन्यानंतर त्यांनी सांगितले की, त्यांनी शानदार टेनिस खेळले आणि सरळ सेटमध्ये विजय मिळवल्याने ते समाधानी आहेत.

युएईने केला भारताचा पराभव

। हाँगकाँग । वृत्तसंस्था ।

नुकताच भारतीय संघाने पाकिस्तानविरुद्ध सामना गमावला. यामुळे भारतीय संघाची आधीच नाचक्की होत होती, यातच आता भारतीय संघाचा युएईकडून ६ गडी राखून पराभूत झाला. हाँगकाँग सिक्सर्स स्पर्धेतील भारताचा हा सलग दुसरा पराभव असल्याने आता चिंतेची बाब उपस्थित होत आहे.

प्रथम फलंदाजी करताना, कृणाल पांड्याच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने निर्धारित ६ षटकांत ९४ धावा केल्या. युएईच्या फलंदाजांनी धुमाकूळ घालत अवघ्या



२६ चेंडूंमध्ये सामना संपवला. भारतासाठी टी. नटराजनने १४ चेंडूंमध्ये ३८ धावा केल्या.

भारतीय संघाचे सर्वच फलंदाज अपयशी ठरले. नितीश राणा, राहुल त्रिपाठी आणि राहुल तेवतिया, हे सर्व दिग्गज खेळाडू पाकिस्तानविरुद्ध अपयशी ठरले होते. युएईविरुद्धही त्यांच्यापैकी कोणीही चांगली कामगिरी केली नाही. नितीशने केवळ ६ धावा केल्या, तर राहुल तेवतिया आणि शशांक सिंग प्रत्येकी एका धावेवर बाद झाले.

यूथ ऑलिम्पिकचा शानदार शुभारंभ | सेनेगलच्या राष्ट्राध्यक्षांच्या हस्ते उद्घाटन

भारताचे १७ खेळाडू पदकांसाठी सज्ज!

। सेनेगल । वृत्तसंस्था ।

आफ्रिका खंडात पहिल्यांदाच ऑलिम्पिक स्पर्धेचे आयोजन होत असून, सेनेगलमध्ये यूथ ऑलिम्पिक गेम्सचा दिमाखदार शुभारंभ झाला आहे. सेनेगलचे राष्ट्राध्यक्ष बासिरू डियोमाये फाये यांनी स्पर्धेच्या उद्घाटनाची अधिकृत घोषणा केली. या ऐतिहासिक सोहळ्यामुळे आफ्रिकेच्या क्रीडा विश्वात नव्या पर्वाची सुरुवात झाली आहे. या स्पर्धेत भारताचे १७ खेळाडू सहभागी झाले असून, त्यांच्याकडून पदकांची



अपेक्षा आहे.

डकार येथील स्टेड अब्दुलाय वेडमध्ये झालेल्या उद्घाटन सोहळ्यात विविध देशांतील शेकडो युवा खेळाडूंनी संचलनातून आपल्या देशाचे प्रतिनिधित्व केले. संपूर्ण सोहळ्यात आफ्रिकेचा समृद्ध भूतकाळ, वर्तमान आणि भविष्य यांचे दर्शन घडवण्यात आले. सेनेगलच्या तेरंगा म्हणजेच पाहुणचाराच्या परंपरेचा विशेष गौरव करण्यात आला.

या सोहळ्यात अल्केबुलन, केब आणि सिटो या तीन प्रतीकात्मक पात्रांच्या माध्यमातून सांस्कृतिक वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होण्याचा प्रवास दाखवण्यात आला. तसेच आफ्रिका खंडाचे भविष्य घडवण्यात तरुणांची भूमिका किती महत्त्वाची आहे, यावरही प्रकाश टाकण्यात आला.

खेळामुळे आपल्या आयुष्यात अनेक संधी निर्माण झाल्या आणि स्वतःवर विश्वास ठेवण्याची प्रेरणा मिळाली, असेही त्यांनी सांगितले. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक खेळाडूने स्वतःवर विश्वास ठेवावा, मोठी स्वप्ने पाहावीत आणि आपले सर्वोत्तम प्रदर्शन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

यूथ ऑलिम्पिक गेम्स २०२६ ही स्पर्धा ३१ ऑक्टोबर ते १३ नोव्हेंबरदरम्यान डकार, साली आणि डायम्नियाडियो या तीन शहरांमध्ये रंगणार आहे. एकूण २५ क्रीडा प्रकारांमध्ये २०५ देशांच्या प्रतिनिधी मंडळांतील २,६५५ युवा खेळाडू सहभागी झाले आहेत.भारताने या स्पर्धेसाठी १७ खेळाडूंचा संघ पाठवला आहे. यामध्ये ११ महिला आणि सहा पुरुष खेळाडूंचा समावेश आहे. भारतीय खेळाडू ११ क्रीडा प्रकारांमध्ये आपले कौशल्य पणाला लावणार आहेत.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)